१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, रविवार ७ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-९४, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 94 Marathi - Daily - Mumbai, 7 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
अभिजित दीपकेंना आई-बाबांचाच विरोध?
navakal.in
@navakal.news | Navakal Digital Network | @_NDN_Offical | @NavakalNews

# ‘कॉकरोच पार्टी’चे पहिले आंदोलन अयशस्वी
## अपेक्षित गर्दी झाली नाही! विस्कळीत नियोजन



■ नवी दिल्ली

**अभिजित** दीपके आज सकाळी ७.४५ वाजता अमेरिकेतून दिल्लीला परतला. विमानतळावर त्याच्या स्वागतासाठी काही समर्थक हजर होते. आंदोलन दडपण्यासाठी विमानतळावर उतरताच अभिजितला अटक होईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मात्र, विमानतळावर तशी कोणतीही कारवाई झाली नाही. विमानतळाबाहेर पडल्यावर अभिजित म्हणाला की, माझे विमान दिल्लीच्या धावपट्टीवर उतरण्यापूर्वीचे काही क्षण मला असे वाटत होते की, हे माझ्या स्वातंत्र्याचे अखेरचे क्षण आहेत.



**कॉकरोच जनता पार्टीचा संस्थापक अभिजित दीपके आज सकाळी ७.४५ वाजता अमेरिकेहून दिल्लीत दाखल झाला. त्याच्या स्वागताला विमानतळावर गर्दी होती. तो तिथून मोर्चाची परवानगी मागायला पोलीस स्टेशनला जाणार होता. पण दिल्ली पोलिसांनी प्रथमच लेखी निवेदन न घेता मोर्चाला परवानगी देऊन टाकली. त्यामुळे दीपके थेट जंतरमंतरवर पोहोचला, पण कोट्यवधी लोकांचा ऑनलाईन पाठिंबा मिळालेल्या या पार्टीला प्रत्यक्ष आंदोलनात पाठिंबा मिळाला नाही. जंतरमंतरवर अपेक्षित अशी तुडुंब गर्दी झाली नाही. शिवाय या आंदोलनाची तयारी नीट केली नव्हती. सुरुवातीला स्पीकर नव्हता, मंच नव्हता. त्यामुळे एकूणच हे आंदोलन अपयशी ठरले आणि सायंकाळी ५ पर्यंत होणारे हे आंदोलन दुपारी ३ वाजताच गुंडाळण्यात आले. शेवटी दीपके याने इशारा दिला की, केंद्रिय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पुढील पाच दिवसांत राजीनामा दिला नाही तर पुढील शनिवारी पुन्हा आंदोलन केले जाईल.**

मला विमानतळावरच अटक होण्याची दाट शक्यता होती. मात्र, या देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि या पवित्र हेतूसाठी मी माझ्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा त्याग करायला पूर्णपणे तयार होतो. आज अनेक मोठ्या व्यक्ती केवळ तुरुंगवासाच्या आणि कायदेशीर कारवाईच्या भीतीने सत्तेसमोर झुकल्या आहेत, त्यांनी स्वतःचा स्वाभिमान विकला आहे. या देशातील तरुण अजून विकले गेलेले नाहीत.

विमानतळावरून बाहेर पडताना अभिजितच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मचरित्र होते. ते त्याने उंचावून दाखवले. त्यानंतर अभिजितने थेट जंतरमंतर मैदान गाठले. त्यावेळी पोलीस गाड्या त्याच्या सोबत होत्या. जंतरमंतरवर कोकरोच पार्टीच्या समर्थकांची गर्दी जमली होती. काही आंदोलक विद्यार्थी चेहऱ्यावर,

» पान २ वर

## थोडक्यात...

### मान्सून महाराष्ट्रात दाखल तळकोकणाला झोडपले

**सिंधुदुर्ग** - संपूर्ण राज्यातील नागरिक उकाड्याने हैराण झाले असतानाच मान्सून अखेर महाराष्ट्रात दाखल झाला आहे. तळकोकणात पावसाने हजेरी लावली असून, उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. कोकण किनारपट्टीवर काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडत असून, सिंधुदुर्ग, देवगड, दोडामार्ग परिसरात पावसाची नोंद झाली आहे. मान्सूनमुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

उद्या राज्यात विविध भागांत पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. कोकणात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, किनारपट्टीवर वाऱ्याचा वेग वाढू शकतो. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडेल, तर मराठवाड्यात हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून काही भागांत मेघगर्जना आणि वादळी वारे वाहू शकतात.

धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी इ. विकारांवर प्रभावी !
9422011723
www.dhoutiyog.in

Ideal Educational & Welfare Trust's
MODERN HIGH SCHOOL
(URDU MEDIUM-MINORITY INSTITUTE)
PARTIALLY AIDED:40%
CLEAR VACANCY ASSISTANT TEACHERS
1. B.Sc. B.Ed.-1 (Aided)
2. B.A. B.Ed.-1 (Unaided) (Urdu & Social Studies)
TET/CTET Qualified Candidates Preferred
Interested candidates may mail their resume on email Id
idealtrust@yahoo.com
Apply within 7 days of the advertisement.
PARKSITE VIKHROLI, MUMBAI

# बॅलटवर निवडणुका नाही तोवर बहिष्कार टाका
## राज ठाकरे यांची भूमिका

**विधान परिषद निवडणुकीतील बिनविरोध निवडीवरून वाद सुरू असतानाच मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या जात नाहीत, तोपर्यंत निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याची भूमिका मांडली आहे. उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज ठाकरे यांच्या भेटीनंतर ही माहिती दिली आहे. मात्र, राज ठाकरे यांनी ही भूमिका सर्व निवडणुका पार पडल्यावर मांडली आहे. राज्याच्या पुढील निवडणुका २०२९ मध्ये होणार आहेत. या निवडणुका येईपर्यंत हा मुद्दा कितपत कायम राहील, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.**



■ मुंबई

**संजय** राऊत यांनी काल राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीबाबत बोलताना आज राऊत म्हणाले की, आमची एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाली. यावेळी बॅलट पेपरवर निवडणुका होत नाहीत तोपर्यंत निवडणुकांवर बहिष्कार टाकावा, असे राज ठाकरे यांनी सांगितले. हा मुद्दा ते वारंवार मांडत आहेत. राज ठाकरे यांचे हे मत मला पटले आहे. मी उद्धव ठाकरे यांना भेटून त्यांना राज ठाकरे यांची भूमिका सांगितली आहे. उद्धव ठाकरे यांनाही ही भूमिका मान्य असून, त्यावर चर्चा होणे आणि निर्णय घेणे आवश्यक आहे, असे त्यांचे मत आहे. आमदार-खासदार फोडले जात आहेत. त्यामुळे जोपर्यंत बॅलट पेपरवर निवडणुका होत नाहीत, तोपर्यंत निवडणुकांवर बहिष्कार टाकावा, असे आम्हाला वाटते.

ते पुढे म्हणाले की, विधान परिषद बरखास्त करावी असे सुधीर मुनगंटीवार यांना का वाटते? यासंदर्भात त्यांनी आपल्या पक्षाच्या नेत्यांसोबत पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट करावी. त्यांच्या या मतामागे कारण आहे. काही लोकांनी घोडेबाजार सुरू केला आहे. एका दिवसात १५० कोटी रुपये खर्च करणाऱ्यांविषयी मी बोलत आहे. या पैशांच्या जोरावर विधान परिषद आणि राज्यसभेच्या निवडणुका लढवल्या जात आहेत. त्यामुळे लोकांना अशा निवडणुका नको आहेत. राज्यसभेप्रमाणेच विधान परिषद

» पान २ वर

# शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात संपन्न
## रायगडावर शिवभक्तांची अलोट गर्दी

■ रायगड

**छत्रपती** शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त रायगड किल्ल्यावर आज उत्साहपूर्ण वातावरणात सोहळा पार पडला. राज्यभरातून तसेच देश-विदेशातून हजारो शिवभक्तांनी गडावर हजेरी लावली होती. महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सोहळ्याची सुरुवात ध्वजवंदनाने झाली. त्यानंतर पारंपरिक वाद्यांच्या गजरात शिवपालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. शिवरायांच्या पुतळ्यावर अभिषेक आणि सुवर्णमुद्रांचा वर्षाव करण्यात आला.

राजसदरेवरील मेघडंबरीला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. गडावर सर्वत्र भगवे झेंडे, पताका, पोवाडे, ढोल-ताशे, लेझीम आणि पारंपरिक सादरीकरणांमुळे शिवकालीन वातावरण निर्माण झाले होते. पहाटेपासूनच गडावर



मोठी गर्दी झाली होती. या सोहळ्याला संभाजीराजे छत्रपती, युवराज कुमार शहाजी राजे, तसेच विविध मान्यवर आणि शिवप्रेमींनी उपस्थिती लावली. त्यांच्या उपस्थितीत राजसदर ते जगदीश्वर मंदिर अशी पालखी मिरवणूक काढण्यात आली.

# महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा स्थगित! नव्या मसुद्याची तयारी सुरू

■ नागपूर

**राज्य** सरकारने महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याचे प्रारूप सध्या स्थगित करण्याचा निर्णय घेतला असून, १५ सप्टेंबरपर्यंत नव्या कायद्याचा मसुदा तयार करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही घोषणा केली.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

नागपुरात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे म्हणाले की, राज्यात सुमारे ५.५ लाख हेक्टर देवस्थान इनाम जमिनी आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून विविध देवस्थानांना या जमिनी देण्यात आल्या होत्या. कालांतराने या जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून, अनेक ठिकाणी देवस्थानांचा प्रत्यक्ष ताबा राहिलेला नाही. अनेक प्रभावशाली व्यक्तींनी जमिनींवर अतिक्रमण केल्याने देवस्थानांना आपले हक्क प्रस्थापित करण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे महसूल विभागाने देवस्थानांच्या जमिनींसाठी स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेतला होता.

» पान २ वर

# अमेरिकेच्या शेअर बाजारात चार टक्क्यांची मोठी घसरण

**वॉशिंग्टन** - अमेरिकेच्या शेअर बाजारात शुक्रवारी मोठी घसरण झाली. अमेरिकेच्या प्रमुख निर्देशांकांपैकी एक असलेल्या नॅसडॅकमध्ये तब्बल ४.१८ टक्क्यांची मोठी घसरण झाली. नॅसडॅकने ४.१८ टक्के घसरणीसह २५,७०९.४३ अंकांवर लोळण घेतली. एप्रिल २०२५ नंतरची नॅसडॅकमधील ही सर्वात मोठी घसरण ठरली. नॅसडॅकप्रमाणेच एसअँडपी-५०० निर्देशांक २.६४ टक्क्यांनी घसरून ७,३८३.७४ अंकांवर स्थिरावला. तर डाऊ जोन्समध्ये ६९५.१५ अंकांची म्हणजे सुमारे १.३५ टक्के घसरण नोंदवली गेली. आजच्या घसरणीत एका दिवसांत गुंतवणूकदारांचे तब्बल २ ट्रिलियन डॉलर्सचे नुकसान झाले.

# भारतीय संघातून सूर्यकुमारला डच्चू श्रेयस अय्यर कर्णधार! वैभवला संधी

■ मुंबई

**आयर्लंड** व इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिका व जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी बीसीसीआयने आज भारतीय संघाची घोषणा केली. तीन महिन्यांपूर्वी भारताला टी-२० विश्वचषक जिंकून देणारा कर्णधार सूर्यकुमार यादवला संघातून वगळण्यात आले आहे. श्रेयस अय्यरकडे पुनरागमनासह कर्णधारपद सोपवले, तर तिलक वर्माला उपकर्णधार म्हणून नियुक्त केले. त्यासोबत आयपीएलमध्ये धडाकेबाज फलंदाजी करणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला पहिल्यांदाच संघात संधी देण्यात आली आहे.

या संघातून हार्दिक पंड्याला वगळण्यात आले. गोलंदाज बुमराहला आयर्लंड व इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिकांसाठी विश्रांती देण्यात आली आहे. मात्र त्याला आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी संघात सहभागी केले आहे. अभिषेक शर्मा, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप, मोहम्मद सिराज, ईशान किशन व संजू सॅमसन, अक्षर पटेल यांनी संघात आपले स्थान कायम राखले. तर फिरकी गोलंदाज रवी बिश्नोई, वेगवान गोलंदाज हर्षित राणाचे टी-२० संघात पुनरागमन झाले आहे. नितीश कुमार रेड्डी, प्रिन्स यादव यांना संधी देण्यात आली आहे. मात्र प्रिन्स यादवला आशियाई क्रीडा स्पर्धेतून वगळण्यात आले आहे.

# समभाग हस्तांतरण अनियमित नाही टाटा ट्रस्टने आरोप फेटाळले

■ नवी दिल्ली

**१९८९ मध्ये** नवाजबाई रतन टाटा ट्रस्टने (एनआरटीटी) दिवंगत नवल एच टाटा यांच्या नावे केलेल्या समभाग हस्तांतरणात अनियमितता झाल्याचे आरोप धादांत खोटे आणि तथ्यहीन आहेत, असे टाटा ट्रस्टच्या वतीने जारी करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

महाकाय टाटा उद्योग समूहातील कंपन्यांची दोन तृतियांश मालकी टाटा ट्रस्टकडे आहे. सुरेश पाटीलखेडे नामक एका भागधारकाने १९८९ मध्ये एनआरटीटी आणि नवल टाटा यांच्यामध्ये झालेल्या ८३३ समभागांच्या हस्तांतरण व्यवहारावर आक्षेप घेत धर्मादाय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली असून, या व्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून टाटा ट्रस्टने हे निवेदन जारी केले आहे.

# मुंबईतील पहिला झोपडपट्टी समूहविकास रिलायन्स, पालनजी, जेएसडब्ल्यूची निविदा

■ मुंबई

**मुंबईतील** पहिल्या झोपडपट्टी समूह विकास प्रकल्पासाठी (स्लम क्लस्टर डेव्हलपमेंट) बांधकाम क्षेत्रातील शापुरजी पालनजी रिअल इस्टेट, रिलायन्स ४ आयआर रियल्टी डेव्हलपमेंट लिमिटेड आणि जेएसडब्ल्यू रियल्टी अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या तीन नामवंत कंपन्यांनी इच्छा प्रदर्शित केली आहे. अंधेरी पश्चिमेकडील सी. डी. बर्फीवाला रोड लगतच्या परिसरात हा समूह विकास प्रकल्प राबवण्यात येणार आहे. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने (एसआरए) सुरू केलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये या



तीन बड्या कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.

या कंपन्यांनी दिलेल्या प्रस्तावांच्या तांत्रिक मुल्यमापनाचे काम सध्या सुरू आहे. उच्चस्तरीय समितीकडून मंजुरी मिळाल्यानंतर निविदा खुल्या केल्या जाणार आहेत.

हा संपूर्ण प्रकल्प एकूण १०१.३६ एकरच्या भूखंडावर होणार आहे. त्यापैकी ६१.४० एकर भूखंडावर झोपडपट्टी आहे. सांताक्रूझचे विमानतळ या ठिकाणापासून जवळ असल्याने इमारतींच्या उंचीवर मर्यादा असणार आहे.

# मुंबईतील खासगी पाणी टँकर संघटनेचा सेवा बंदचा इशारा

■ मुंबई

**केंद्रीय** भूजल प्राधिकरण नियमांच्या अंमलबजावणीमुळे टँकर व्यवसाय अडचणीत असून, यावर तातडीने



तोडगा काढला नाही तर उद्या रात्री १२ वाजल्यापासून मुंबईतील सर्व खासगी पाणी टँकर सेवा बंद करतील, असा इशारा मुंबई वॉटर टँकर असोसिएशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून दिला आहे.

मुंबई वॉटर टँकर असोसिएशनचे सेक्रेटरी जनरल अमोल मांढरे यांनी सांगितले की, पालिका, जिल्हाधिकारी कार्यालयाने सीजीडब्ल्यूए नियमांचे पालन करण्यासाठी नोटिसा दिल्या आहेत. भूजल उपसा नियंत्रित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना असोसिएशनचा पाठिंबा आहे. पण, काही नियम आणि अटींची पूर्तता करणे, टँकर चालक आणि विहीर मालकांसाठी अत्यंत कठीण आहे.

सध्या मुंबईत १० टक्के पाणीकपात सुरू असून अनेक भागांमध्ये उन्हाळ्यात आणि जलवाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे केली जात आहेत. या काळात खासगी टँकरद्वारे मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा केला जातो.

# अहमदाबाद विमान अपघात प्रत्यक्षदर्शीची ८ महिन्यांनी साक्ष

■ नवी दिल्ली

**एअर** इंडियाच्या विमानाला अहमदाबादमध्ये झालेल्या अपघाताला येत्या १२ जून रोजी वर्षे पूर्ण होत आहे. या अपघाताबाबत एक संतापजनक माहिती समोर आली आहे की, अपघाताच्या एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराकडे या तपास यंत्रणांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. या अपघाताला आठ महिने उलटेपर्यंत तपास यंत्रणांनी या साक्षीदाराची साधी मुलाखत घेतली नव्हती. आठ महिन्यांनंतर यंत्रणांना जाग आली आणि त्यांनी साक्षीदाराची मुलाखत घेतली. मात्र, अजून अधिकृतरित्या



ती मुलाखत तपासामध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही. त्याने अपघातानंतर टीव्ही वाहिन्यांशी बोलताना सांगितलेल्या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे तपासाला निश्चित दिशा मिळू शकली असती. मात्र भारतीय तपास यंत्रणांना त्या गोष्टी महत्त्वाच्या वाटल्या नाहीत.

१२ जून २०२५ रोजी अहमदाबाद विमानतळावरून लंडनसाठी

» पान २ वर

# देशभरातील एटीएममध्ये खडखडाट केवळ ५५ टक्के रोकड उपलब्ध

■ मुंबई

**देशात** एकीकडे चलनाचा साठा विक्रमी पातळीवर असल्याचा दावा केला जात असताना, सामान्य नागरिकांना एटीएममधून पैसे काढताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. मागणीच्या तुलनेत केवळ सुमारे ५५ टक्केच रोकड उपलब्ध होत असल्याने एटीएममध्ये पैशांचा तुटवडा जाणवत आहे.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांतील ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागांमध्ये एटीएम रिकामे असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. कॉन्फेडरेशन ऑफ एटीएम इंडस्ट्रीजने भारतीय बँक संघ (आयबीए) आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) यांना पत्र लिहून एटीएम सेवा विस्कळीत होण्याचा इशारा दिला आहे. एटीएम ऑपरेटर्सच्या माहितीनुसार, मार्च आणि एप्रिल महिन्यांत देशभरातील एटीएमसाठी सुमारे ९४,००० कोटी रुपयांची गरज होती. मात्र बँकांकडून मार्चमध्ये केवळ ६१,००० कोटी आणि एप्रिलमध्ये ५४,००० कोटी रुपये उपलब्ध झाले. त्यामुळे मागणी आणि पुरवठ्यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. या रोकड टंचाईचा सर्वाधिक फटका महाराष्ट्रातील ग्रामीण भागाला बसत आहे. पेरणीच्या हंगामात बियाणे व खतांसाठी रोख पैशांची गरज असताना एटीएममध्ये पैसे नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

# छोट्या जाहिराती
संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

लेथ मशीन टर्नर, ड्रिलिंग टॅपिंग व हँडप्रेस पॉवरप्रेस मेटलशीट व मेटल बफिंग, बेंडिंग व प्लास्टिक इंजेक्शन मोल्डिंग मशीनचे हुशार कारागीर, हेल्पर मुले/मुली व एम्ब्रोडरी मशीन ऑपरेटर पाहिजेत. २४० शांती इंडस्ट्रियल इस्टेटजवळ, तांबे नगर, एसएन रोड, मुलुंड वेस्ट, मुंबई - 400080. दिलीप पांचाळ **9221232176** {NC260684}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260790}

पेशंटकेअरसाठी आया, बाई, पुरुष त्वरित पाहिजेत. संपर्क: **9321205984** {NC260803}

मुलुंडयेथे गारमेंट ऑफिससाठी Account Assistant (Tally knowledge) आणि प्युन पाहिजेत. **9920563855 / 8104614956.** {NC260764}

**ठाणे येथील सुसंस्कृत कुटुंबास २४ तासासाठी स्वयंपाकीण बाई पाहिजे. संपर्क - 9867086273, 9987546590 {NC260739}**

लेबल फॅक्टरीसाठी हेल्पर पाहिजे. दहिसर पूर्व पांडुरंग वाडी मेट्रो स्टेशनजवळील - **9594642004** {NC260818}

एक सामाजिक संस्थेला संपूर्ण महाराष्ट्रामध्ये विभागवारी प्रतिनिधी पाहिजेत. प्रशांत- **8286590054** {NC260821}

भांडूप येथे सीडी मशीनसाठी फिडरमन, बॉयलर, पंचिंग ऑपरेटर, बाईंडर पाहिजे. संपर्क: **9820930362/ 9930589715** {NC260801}

मालाड वेस्टमध्ये इमिटेशन ज्वेलरी कामासाठी मुले/मुली पाहिजे संपर्क- **9819123920.** {NC260788}

दादर पोर्तुगीज चर्चजवळ पार्ट टाईम अकाऊंटंट आणि बिलिंग करण्यासाठी योग्य व्यक्ती पाहिजे. संपर्क:- **9969923699** {NC260828}

रत्नागिरी मधील हॉटेलमध्ये नाश्ता कूक- 22 ते 25 हजार. किचन हेल्पर- 15000/- वेटर- 15 ते 18 हजार वेतन. कामगार पाहिजेत. वेतन वेळेवर, सुटी, जेवण राहणे व्यवस्थित. इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा- **8805520300** {NC260830}

## पाहिजेत

चेंबूरमध्ये घरात सकाळी 10 ते 12 स्वयंपाकासाठी महिला पाहिजे. **9930808810** {NC260827}

टूकलर हेडलबर्ग प्रिंटिंग ऑपरेटर आणि पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. श्रद्धा प्रिंटर्स-घाटकोपर- **9821084215** {NC260831}

स्त्री पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा **7040206848** {NC260835}

## Situation Vacant

REQD. Office Boy Santacruz. Whatsapp **9820098103**, kajariaclasses@gmail.com {NC260804}

2 Driver, 2 Salesman, 5 Helper, 1 Account - Contacts **9320005454, 9320325454** {NC260815}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC260552}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर सर्वजाती, मुलींना फ्रि, कल्याण- **9869868620** {NC260820}

## व्यसन मुक्ती

दारू सोडवा : दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट, औषधे उपलब्ध. डॉ., नागरगोजे- **9765609769** {NC260716}

**-: वाचकांना सूचना :-**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. **-मॅनेजर, 'नवाकाळ'**


# फुले वाड्यात वटसावित्री साजरी करण्यावर बंदी घाला

**पुरातत्त्व खात्याची पोलिसांना विनंती**

■ पुणे

**पुण्यातील** गंज पेठेतील ऐतिहासिक फुले वाड्यात वटसावित्री साजरी करण्यावर बंदी घाला, अशी विनंती पुरातत्व आणि संग्रहालय महासंचलनालयाने पुणे पोलीस आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.



महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक सुधारणांसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. समाजात रुढ असलेल्या अनिष्ट प्रथा आणि अंधश्रध्देला त्यांनी नेहमीच आव्हान दिले. त्यांच्या कार्याची दखल जगाने घेतली आहे. त्यामुळे दरवर्षी हजारो लोक फुले वाड्याला भेट देतात. फुले वाडा हा सरकार संरक्षित सांस्कृतिक वारसा वास्तू आहे. या ठिकाणी वडाचे झाड आहे. वटसावित्रीच्या सणाला विवाहित महिला वडाच्या झाडाला धागा गुंडाळून पूजा करतात. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांनी आयुष्यभर जपलेल्या सुधारणावादी दृष्टीकोनाला अशा प्रकारची अंधश्रद्धा मान्य नाही. त्यामुळे फुले वाड्यात वटसावित्री साजरी करण्यास मनाई करावी, असे पुरातत्त्व विभागाने पत्रात म्हटले आहे.

# वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिक संतप्त महावितरणाच्या तीन कर्मचाऱ्यांना मारहाण

■ वसई

**वीजपुरवठा** खंडित झाल्याने संतप्त झाल्याने महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना वसईत घडली. याप्रकरणी माणिकपूर पोलिसांनी ३ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. बुधवारी रात्री वसई पूर्वेच्या रामदास नगरमध्ये रोहित्राचा स्फोट होऊन आग लागली होती.

स्फोटामुळे परिसरातील वीज पुरवठा खंडित झाला होता. महावितरणच्या नवघर शाखेतील कर्मचाऱ्यांनी आग विझवली. त्यानंतर दुरूस्तीचे काम सुरू

**३ जणांविरोधात गुन्हे दाखल**

होते. यावेळी काही तरुण महावितरणच्या कार्यालयात आले आणि त्यांनी उपस्थित कर्मचाऱ्यांना जाब विचारत मारहाण केली. या तरुणांनी तंत्रज्ञ रमेश मुकळे, सहकारी निखिल इजकर यांना मारहाण केली. त्यांच्या मदतीसाठी सुरक्षारक्षक प्रकाश तांडेल हे भांडण सोडवण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांच्या हातातील जड कड्याने तांडेल यांच्या डाव्या कानावर प्रहार केला. त्यात तांडेल जखमी झाले. या प्रकरणी माणिकपूर पोलिसांनी अभिषेक रवी कदम (२५), अक्षय रवी कदम (२४) आणि श्लोक पेंढारी (२५) या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# सावंतवाडीत भाजपा शहराध्यक्षांसह संपूर्ण कार्यकारिणीचा राजीनामा

■ सावंतवाडी

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील सावंतवाडी शहर भाजपामध्ये मोठी राजकीय घडामोड घडली असून, शहराध्यक्ष तथा नगरसेविका मोहिनी मडगावकर यांच्यासह संपूर्ण शहर कार्यकारिणीने आपल्या पदांचे तडकाफडकी राजीनामे दिले आहेत. पक्षांतर्गत वाद आणि जिल्हा नेतृत्वाकडून होत असलेल्या कथित दबावामुळे हा निर्णय घेतल्याचा दावा राजीनामा दिलेल्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

मोहिनी मडगावकर यांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या राजीनाम्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी महिला जिल्हाध्यक्ष श्वेता कोरगावकर, जिल्हा सरचिटणीस महेश सारंग आणि जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांच्यावर गंभीर आरोप केले. पक्षातील काही नेते जाणीवपूर्वक आपल्याविरोधात राजकारण करत असल्याचा दावा त्यांनी केला. मोहिनी मडगावकर म्हणाल्या की, माझ्या जागी दुसऱ्या व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मला मिळाली. या संपूर्ण घडामोडीमागे महेश सारंग यांची प्रमुख भूमिका असल्याचा मला संशय आहे. माझ्यासोबत अशा प्रकारची वागणूक दोन वेळा झाली आहे.

# नालासोपाऱ्यात दोन वाहनांच्या धडकेत ५ जण जखमी

■ नालासोपारा

**नालासोपारा-विरार** लिंक रोडवरील शनिवारी संध्याकाळी दोन वाहनांमध्ये झालेल्या भीषण अपघातात पाच जण जखमी झाले. अपघातात दोन पोलीस किरकोळ जखमी झाले असून, दुसऱ्या वाहनातील एकाची प्रकृती गंभीर आहे.

नालासोपारा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी संध्याकाळी ४ च्या सुमारास नालासोपारा-विरार लिंक रोडवरून हुंडाई व्हेन्यू ही कार विरारहून नालासोपाऱ्याच्या दिशेने जात होती. त्याचवेळेस हुंडाई आय-२० ही गाडी नालासोपाऱ्याच्या दिशेने वळत होती.

# नारिंगी पूल खुला! फाटक मात्र बंद ग्रामस्थांकडून आंदोलनाचा इशारा

■ विरार

**विरारमधील** नारिंगी उड्डाणपूल वाहतुकीला खुला झाला असला तरी ग्रामस्थांचा येण्या जाण्याचा मार्ग असलेला फाटकाचा रस्ता रेल्वेने बंद केला आहे. यामुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असून, फाटक खुले न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. विरार शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटावी यासाठी रेल्वेकडून नारंगी येथे रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. मागील महिन्यात पूल वाहतुकीसाठी खुला झाला असला तरी ग्रामस्थांना कोणतीही पूर्व कल्पना न देता रेल्वे प्रशासनाने या ठिकाणी लोखंडी खांब उभारून येण्या जाण्याचा मार्ग बंद केला आहे. त्याला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. या मार्गाचा वापर दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक करत असल्याने फाटक बंद झाल्याने गावकऱ्यांना मोठा फटका बसणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. रेल्वे प्रशासनाने नागरिकांची गैरसोय टाळून पर्यायी व्यवस्था करावी, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. रस्ता बंद करण्याबाबत रेल्वे प्रशासनाचे कोणतेही अधिकृत आदेश नसल्याची माहिती मिळाली आहे.

# 'कॉकरोच पार्टी'चे पहिले आंदोलन अयशस्वी

पान १ वरून

शरीरावर झुरळांचे मुखवटे लावून आले होते. काहींच्या हातात तिरंगा झेंडा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो होता. त्यांच्या हातात फलकही होते. धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या, धर्मेंद्र प्रधान तुम्हाला जमणार नाही, पेपर लीक होणार नाही अशा परीक्षेची प्रतीक्षा आहे, अशा घोषणा या फलकांवर लिहिल्या होत्या. आंदोलनस्थळी काल सायंकाळपासूनच पोलीस बंदोबस्त कडक ठेवण्यात आला होता. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी विमानतळ, मुख्य रेल्वे स्थानक, बस स्थानके आणि दिल्लीच्या सीमा भागांत सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली होती. विविध ठिकाणी १,००० हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. अभिजित जंतरमंतरवर पोहोचताच समर्थकांनी घोषणाबाजी सुरू केली. नही डरेंगे डरेंगे, धर्म की राजनीती बंद करो अशा घोषणा समर्थक देत होते. कोकरोच पार्टीने लगेच आपल्या एक्स अकाऊंटवर या आंदोलनाची माहिती देत पोस्ट केली की, झुरळे कधीही कोणाला घाबरत नाहीत आणि ती कधीही संपत नाहीत. दरम्यान, कोकरोच पार्टीचे काही विरोधकही जंतरमंतरवर जमा झाले. त्यांनी आंदोलकांवर कारवाईची मागणी केली. एक जण झुरळ मारण्याचा कीटकनाशक स्प्रे घेऊन तिथे आला होता. मात्र कोकरोच पार्टीच्या समर्थकांनी त्याला हाकलून दिले. सकाळी मैदानात गर्दी कमी होती, नंतर ती हळूहळू वाढली, पण तरी जी अपेक्षा होती तेवढी गर्दी झाली नाही. आज एक बडा नेता पक्षात प्रवेश करणार अशी घोषणा करण्यात आली होती. मात्र कोणत्याच नेत्याचा प्रवेश झाला नाही. लडाखचे नेते सोनम वांगचूक दुपारी उशिरा मैदानात आले आणि त्यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. एकूण स्थिती पाहून अभिजितने ३ वाजताच आंदोलन समाप्त केले.

कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थकांसमोर भाषण करताना अभिजित म्हणाला की, हा लढा अत्यंत मोठा आणि दीर्घकालीन आहे. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आम्ही गेल्या महिनाभरापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने करत आहोत. परंतु, हे प्रशासन इतके संवेदनशून्य आणि निर्लज्ज झाले आहे की, परीक्षा पद्धतीतील त्रुटींवर ठोस कारवाई करण्याऐवजी ते आमचे लक्ष विचलित करण्याचे प्रयत्न करत आहेत. आमची अधिकृत खाती हॅक करणे आणि आमचे सोशल मीडियावरील निषेधाचे पोस्ट हटवणे यातच हे लोक व्यस्त आहेत. मी सरकारला स्पष्ट सांगू इच्छितो की, तुम्ही आमचे डिजिटल संदेश नक्कीच हटवू शकता, परंतु या जंतरमंतरवरून आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून आमचे प्रत्यक्ष अस्तित्व तुम्ही कधीही पुसू शकणार नाही.

अभिजित पुढे म्हणाला की, मी जेव्हा अमेरिकेला गेलो, तेव्हा माझी आई रडत होती. पण ती त्यावेळी जेवढी रडली नव्हती तेवढी ती मी परत येताना रडली. दोन-तीन दिवसांपासून माझी आई आणि बहीण रडत आहेत. कारण त्यांना भीती आहे की, मी परत आलो तर मला तुरुंगात टाकतील. ही माझ्या आईची एकटीची भीती नाही, तर या देशात जो विद्यार्थी, जो तरुण सरकारविरोधात बोलत आहे, त्यांच्या आईचीही हीच भीती आहे. आपल्या मुलाला तुरुंगात टाकतील, अशी भीती त्यांनाही वाटत आहे. पण किती दिवस आपण भीतीखाली जगणार? एकदा त्यांना दाखवून देऊ या की, आम्ही तुमच्या भीतीच्या राजकारणाला घाबरत नाही. धर्माचे राजकारण बंद करा. हिंदू-मुस्लीम राजकारण बंद करा. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आंदोलन स्थळी पोहोचल्यावर म्हणाल्या की, २०२१ पासून आतापर्यंत सगळ्या परीक्षेत तोच तोच गोंधळ झाला आहे. त्यामुळे निष्क्रिय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे. आम्ही अतिशय शांततेत आंदोलन करत आहोत. हे आंदोलन नेपाळसारखे नाही. आम्ही व्यवस्था बदलण्यासाठी आंदोलन करत आहोत. सरकार आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत आहे. या आंदोलनाला कव्हरेज देऊ नका, असे सरकारने पत्रकारांना सांगितले आहे. पण आम्ही शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेतल्याशिवाय थांबणार नाही. या आंदोलनात कुठलीही सुसुत्रता नव्हती. आंदोलनात कोण कोण सहभागी होणार आहे, याची माहितीही मिळत नव्हती. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत या आंदोलनाला परवानगी देण्यात आल्याचे सांगण्यात येत होते. परंतु साडेतीन वाजता अभिजित व कोकरोच पार्टीचे समर्थक जंतरमंतर मैदानावर निघून गेले. परंतु आंदोलन मागे घेण्याचे कोणतेही कारण देण्यात आले नाही. कुठलीही पत्रकार परिषद झाली नाही. अभिजित दीपके पुढे कोणती पावले उचलेल याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## त्याने मला-भावाला बोलावले नाही दीपकेच्या काकांनी खंत व्यक्त केली

छत्रपती संभाजीनगर - कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके भारतात परतला आहे. त्यामुळे छत्रपती संभाजीनगर येथील मूळ निवासस्थानी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला आहे. संभाव्य गर्दी आणि सार्वजनिक आकर्षण लक्षात घेऊन दीपके कुटुंबियांनी खबरदारीचा उपाय म्हणून तात्पुरत्या स्वरूपात अन्यत्र स्थलांतर केले. त्याच्या सुरक्षिततेबाबत कुटुंबियांनी काळजी व्यक्त केली आहे. त्याने मला किंवा भावाला बोलावले नाही, अशी खंत व्यक्त करत अभिजित दीपकेचे काका विलास दीपके यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. तर आई अनिता दीपके यांनी आंदोलन करू नको, असा सल्ला दिला आहे. अभिजित यांचे काका विलास दीपके यांनी भावनिक प्रतिक्रिया देताना सांगितले की, अभिजित परत आला ही चांगली गोष्ट आहे. आजचा दिवस आमच्यासाठी चिंतेचा आहे. तो आमच्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा आहे. त्याच्या काळजीमुळे आम्हाला झोप लागत नाही. सरकार काय करेल याचा अंदाज नाही. त्याला अटक होईल अशी भीती वाटते. तसे होऊ नये, ही आमची इच्छा आहे. अभिजितशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. तसेच दिल्लीला जाऊन त्याला पाठिंबा देण्याचीही इच्छा होती, पण तसे होऊ शकले नाही. अभिजित यांची आई अनिता दीपके यांनी मुलाने राजकारण आणि आंदोलनाच्या वाटेवर न जाता आपल्या व्यावसायिक कारकिर्दीकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्या म्हणाल्या की, अभिजितने आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करावे, अशी आमची इच्छा आहे. यापूर्वी तो आम आदमी पक्षासोबत काही वर्षे कार्यरत होता. त्यावेळीही आम्ही त्याला राजकारणापासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता. परदेशात किंवा पुणे-दिल्लीसारख्या शहरांत काम करावे, असेही सांगितले होते. मात्र त्याने आपल्या आवडीनुसार मार्ग निवडला. त्याने हे आंदोलन करू नये, असे आमचे मत आहे. आम्ही त्याच्या आंदोलनाला पाठिंबा देणार नाही. त्याने राजकारणापासून दूर राहून कुटुंबासोबत राहावे.

# लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | • प्रभालक्ष्मी विकली लॉटरी • | सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SP-02 : 1332 | रॉयल एजन्सी - आंकली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1268 श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई | 4125 | 5858 | 6311 | 6698 | 7532 | 7569 | 7824 | 7826 | 9861 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0326 | 2948 | 3250 | 3717 | 4032 | 5864 | 6264 | 6728 | 6834 | 7089 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1137 | 2565 | 2971 | 3273 | 7040 | 7249 | 8326 | 9020 | 9043 | 9547 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस | 0974 | 1814 | 2912 | 4366 | 5425 | 5967 | 7472 | 8805 |
| रु. 300/- | 1061 | 1903 | 3197 | 4410 | 5433 | 6222 | 7562 | 8820 |
| 0011 | 1071 | 1940 | 3453 | 4444 | 5484 | 6236 | 7587 | 8823 |
| 0058 | 1101 | 2129 | 3537 | 4463 | 5505 | 6349 | 7782 | 8840 |
| 0079 | 1161 | 2138 | 3608 | 4524 | 5513 | 6600 | 7907 | 8848 |
| 0095 | 1176 | 2219 | 3736 | 4655 | 5532 | 6638 | 7919 | 9110 |
| 0252 | 1192 | 2302 | 3737 | 4658 | 5572 | 6682 | 8349 | 9289 |
| 0361 | 1197 | 2419 | 3770 | 4683 | 5619 | 6928 | 8489 | 9293 |
| 0375 | 1245 | 2603 | 3903 | 4724 | 5631 | 7062 | 8568 | 9597 |
| 0465 | 1305 | 2620 | 4078 | 4784 | 5658 | 7204 | 8588 | 9669 |
| 0732 | 1308 | 2632 | 4213 | 4854 | 5775 | 7298 | 8618 | 9707 |
| 0750 | 1421 | 2672 | 4256 | 4889 | 5945 | 7357 | 8667 | 9903 |
| 0929 | 1564 | 2819 | 4349 | 5355 | 5954 | 7407 | 8692 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्रलक्ष्मी

महाराष्ट्र राज्य लॉटरी | विकली लॉटरी | सोडत दर शनिवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 23 सोडत दिनांक 06/06/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | ML-03 : 7396

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- | पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी 7396 | चॅम्पियन ऑनलाईन - माझगाव लॉटरी भांडार - नागपूर

दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2865 | श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1143 | 1591 | 1686 | 1719 | 2560 | 5152 | 6050 | 9728 | 9873 | 9957 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1425 | 1621 | 3162 | 4054 | 4596 | 4693 | 4926 | 5297 | 5715 | 6695 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0220 | 0393 | 1355 | 1616 | 3535 | 3676 | 4128 | 4545 | 5139 | 9159 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1437 | 1526 | 1814 | 1892 | 2819 | 3873 | 7130 | 7795 | 7828 | 8389 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1130 | 2127 | 2839 | 3498 | 4180 | 4914 | 5448 | 6069 | 6791 | 7752 | 8573 | 9232 |
| | | 1135 | 2132 | 2863 | 3514 | 4200 | 4916 | 5455 | 6110 | 6796 | 7768 | 8578 | 9233 |
| | | 1151 | 2198 | 2899 | 3527 | 4208 | 4930 | 5485 | 6113 | 6816 | 7774 | 8583 | 9240 |
| | | 1194 | 2212 | 2921 | 3580 | 4224 | 4934 | 5514 | 6163 | 6893 | 7801 | 8628 | 9286 |
| | | 1219 | 2220 | 2950 | 3604 | 4246 | 4940 | 5517 | 6165 | 6928 | 7809 | 8633 | 9318 |
| 0001 | 0628 | 1225 | 2224 | 2961 | 3638 | 4301 | 4944 | 5534 | 6174 | 6950 | 7818 | 8642 | 9362 |
| 0007 | 0638 | 1231 | 2255 | 2982 | 3645 | 4317 | 4945 | 5558 | 6229 | 6958 | 7840 | 8648 | 9393 |
| 0008 | 0640 | 1257 | 2260 | 2984 | 3653 | 4345 | 4966 | 5575 | 6306 | 6997 | 7878 | 8691 | 9396 |
| 0017 | 0664 | 1273 | 2278 | 2999 | 3690 | 4350 | 4982 | 5612 | 6364 | 7056 | 7880 | 8740 | 9421 |
| 0019 | 0671 | 1306 | 2287 | 3033 | 3700 | 4382 | 5065 | 5625 | 6372 | 7070 | 7967 | 8767 | 9462 |
| 0023 | 0703 | 1346 | 2295 | 3063 | 3711 | 4394 | 5075 | 5642 | 6404 | 7078 | 7977 | 8822 | 9474 |
| 0030 | 0708 | 1347 | 2298 | 3066 | 3731 | 4400 | 5080 | 5643 | 6441 | 7128 | 8027 | 8839 | 9485 |
| 0060 | 0728 | 1371 | 2319 | 3126 | 3732 | 4412 | 5095 | 5662 | 6449 | 7144 | 8044 | 8848 | 9516 |
| 0070 | 0755 | 1421 | 2328 | 3178 | 3751 | 4431 | 5104 | 5667 | 6456 | 7147 | 8062 | 8858 | 9519 |
| 0077 | 0767 | 1466 | 2344 | 3221 | 3762 | 4440 | 5117 | 5685 | 6461 | 7158 | 8078 | 8883 | 9564 |
| 0079 | 0784 | 1473 | 2403 | 3237 | 3820 | 4443 | 5126 | 5715 | 6464 | 7162 | 8080 | 8887 | 9568 |
| 0086 | 0809 | 1589 | 2429 | 3242 | 3833 | 4445 | 5136 | 5750 | 6472 | 7172 | 8083 | 8888 | 9593 |
| 0089 | 0820 | 1610 | 2482 | 3253 | 3836 | 4465 | 5145 | 5755 | 6480 | 7176 | 8113 | 8895 | 9616 |
| 0150 | 0905 | 1617 | 2491 | 3265 | 3858 | 4475 | 5152 | 5781 | 6488 | 7179 | 8119 | 8898 | 9678 |
| 0161 | 0910 | 1618 | 2538 | 3297 | 3863 | 4485 | 5155 | 5782 | 6518 | 7232 | 8188 | 8913 | 9695 |
| 0172 | 0960 | 1631 | 2539 | 3310 | 3911 | 4488 | 5160 | 5785 | 6530 | 7300 | 8214 | 8914 | 9698 |
| 0185 | 0968 | 1650 | 2540 | 3323 | 3913 | 4491 | 5195 | 5786 | 6545 | 7303 | 8218 | 8948 | 9710 |
| 0192 | 0970 | 1671 | 2559 | 3325 | 3917 | 4493 | 5200 | 5795 | 6548 | 7321 | 8219 | 8989 | 9729 |
| 0266 | 0973 | 1724 | 2562 | 3327 | 3919 | 4494 | 5227 | 5815 | 6559 | 7336 | 8250 | 8991 | 9776 |
| 0288 | 0976 | 1727 | 2572 | 3332 | 3946 | 4524 | 5232 | 5871 | 6563 | 7361 | 8258 | 8998 | 9778 |
| 0295 | 0990 | 1776 | 2608 | 3333 | 3970 | 4527 | 5255 | 5875 | 6579 | 7371 | 8263 | 9000 | 9792 |
| 0301 | 1001 | 1782 | 2613 | 3350 | 3972 | 4553 | 5257 | 5892 | 6589 | 7373 | 8282 | 9020 | 9849 |
| 0320 | 1011 | 1811 | 2621 | 3355 | 3976 | 4575 | 5258 | 5929 | 6593 | 7398 | 8296 | 9043 | 9865 |
| 0329 | 1042 | 1835 | 2622 | 3366 | 4004 | 4614 | 5277 | 5935 | 6606 | 7483 | 8297 | 9045 | 9871 |
| 0340 | 1046 | 1841 | 2626 | 3368 | 4016 | 4694 | 5280 | 5953 | 6614 | 7498 | 8308 | 9049 | 9898 |
| 0389 | 1047 | 1855 | 2628 | 3374 | 4023 | 4740 | 5308 | 5954 | 6616 | 7507 | 8322 | 9054 | 9909 |
| 0390 | 1103 | 1900 | 2641 | 3377 | 4034 | 4760 | 5345 | 5995 | 6620 | 7547 | 8356 | 9059 | 9923 |
| 0400 | 1111 | 1916 | 2642 | 3383 | 4037 | 4788 | 5354 | 6004 | 6642 | 7583 | 8363 | 9062 | 9929 |
| 0446 | 1113 | 1930 | 2673 | 3385 | 4049 | 4795 | 5355 | 6005 | 6653 | 7622 | 8371 | 9137 | 9933 |
| 0449 | 1116 | 1998 | 2712 | 3387 | 4070 | 4796 | 5361 | 6007 | 6660 | 7645 | 8376 | 9144 | 9934 |
| 0500 | 1117 | 2009 | 2730 | 3388 | 4104 | 4826 | 5374 | 6036 | 6663 | 7661 | 8387 | 9151 | 9935 |
| 0515 | 1118 | 2025 | 2789 | 3432 | 4119 | 4829 | 5405 | 6038 | 6672 | 7677 | 8442 | 9159 | 9954 |
| 0540 | 1122 | 2044 | 2811 | 3437 | 4146 | 4871 | 5413 | 6045 | 6673 | 7708 | 8465 | 9174 | 9958 |
| 0546 | 1126 | 2081 | 2815 | 3450 | 4161 | 4872 | 5417 | 6046 | 6689 | 7731 | 8508 | 9199 | 9988 |
| 0586 | 1129 | 2112 | 2837 | 3471 | 4173 | 4892 | 5439 | 6047 | 6776 | 7747 | 8561 | 9207 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी समृद्धी

निकाल | गणेशलक्ष्मी समृद्धी विकली लॉटरी | सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/06/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-05 : 3306

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- | 2302

तिसरे बक्षिस रु. 2000/- | 6392 | कपिल असोसिएट्स, कोल्हापूर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0165 | 1935 | 1978 | 2105 | 2890 | 4439 | 5473 | 7999 | 8031 | 9733 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0034 | 3668 | 4263 | 4636 | 5516 | 6432 | 6603 | 8772 | 9299 | 9349 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1290 | 1309 | 1442 | 1934 | 1973 | 3702 | 5604 | 6262 | 6857 | 8212 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | 1411 | 2120 | 3323 | 4245 | 4936 | 5754 | 6685 | 7781 | 8941 |
| | | 1417 | 2182 | 3368 | 4326 | 4948 | 5856 | 6766 | 7897 | 8980 |
| | | 1429 | 2221 | 3375 | 4343 | 5052 | 5985 | 6776 | 7927 | 9035 |
| 0061 | 1118 | 1478 | 2274 | 3423 | 4344 | 5071 | 6066 | 7067 | 7971 | 9083 |
| 0093 | 1120 | 1483 | 2280 | 3430 | 4349 | 5087 | 6108 | 7089 | 8020 | 9161 |
| 0100 | 1149 | 1510 | 2295 | 3431 | 4364 | 5111 | 6160 | 7216 | 8158 | 9169 |
| 0145 | 1151 | 1661 | 2326 | 3533 | 4398 | 5226 | 6237 | 7286 | 8208 | 9201 |
| 0233 | 1170 | 1795 | 2413 | 3544 | 4401 | 5233 | 6304 | 7287 | 8320 | 9302 |
| 0267 | 1173 | 1820 | 2421 | 3632 | 4407 | 5242 | 6369 | 7297 | 8508 | 9331 |
| 0282 | 1175 | 1832 | 2482 | 3643 | 4418 | 5244 | 6416 | 7379 | 8534 | 9356 |
| 0403 | 1182 | 1835 | 2502 | 3651 | 4433 | 5262 | 6491 | 7392 | 8584 | 9487 |
| 0490 | 1195 | 1900 | 2525 | 3701 | 4441 | 5287 | 6541 | 7430 | 8612 | 9494 |
| 0500 | 1209 | 1921 | 2666 | 3702 | 4471 | 5314 | 6570 | 7472 | 8732 | 9498 |
| 0501 | 1216 | 1959 | 2724 | 3708 | 4515 | 5358 | 6601 | 7495 | 8735 | 9526 |
| 0550 | 1218 | 1967 | 2726 | 3827 | 4538 | 5512 | 6627 | 7542 | 8841 | 9652 |
| 0638 | 1225 | 1981 | 2970 | 3930 | 4544 | 5547 | 6630 | 7546 | 8883 | 9697 |
| 0680 | 1227 | 2022 | 3090 | 3937 | 4608 | 5584 | 6631 | 7573 | 8888 | 9716 |
| 0900 | 1257 | 2025 | 3235 | 3990 | 4644 | 5618 | 6633 | 7687 | 8889 | 9725 |
| 0905 | 1304 | 2050 | 3262 | 4080 | 4666 | 5656 | 6651 | 7751 | 8891 | 9907 |
| 1100 | 1353 | 2052 | 3290 | 4163 | 4852 | 5671 | 6652 | 7753 | 8907 | 9916 |
| 1112 | 1387 | 2107 | 3310 | 4194 | 4864 | 5691 | 6664 | 7766 | 8923 | 9949 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी

निकाल | महाराष्ट्र राज्य लॉटरी | महाराष्ट्र गजलक्ष्मी शनि विकली लॉटरी | सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर शनिवार • सोडत क्रमांक 23 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/06/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-03 : 7894

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 1213 | 1637 | 2025 | 3868 | 4013 | 4587 | 5526 हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा | 6580 | 8251 | 9211 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1023 | 1632 | 1748 | 3885 | 6046 | 7089 | 8101 | 8132 | 9388 | 9671 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2052 | 2770 | 5581 | 5888 | 8166 | 8515 | 8638 | 8711 | 9134 | 9364 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1132 | 1206 | 4514 | 4629 | 6123 | 6585 | 6644 | 7008 | 7364 | 9632 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस रु. 100/- | | 1427 | 2247 | 3123 | 3898 | 4649 | 5625 | 6465 | 7576 | 8438 | 9099 |
| | | 1459 | 2251 | 3148 | 3924 | 4745 | 5627 | 6467 | 7604 | 8449 | 9157 |
| 0002 | 0571 | 1475 | 2252 | 3154 | 4042 | 4801 | 5645 | 6571 | 7628 | 8538 | 9194 |
| 0024 | 0715 | 1507 | 2256 | 3183 | 4105 | 4841 | 5652 | 6624 | 7713 | 8605 | 9197 |
| 0064 | 0769 | 1587 | 2260 | 3243 | 4146 | 4864 | 5665 | 6645 | 7722 | 8617 | 9254 |
| 0070 | 0776 | 1588 | 2268 | 3303 | 4224 | 4919 | 5697 | 6680 | 7746 | 8632 | 9319 |
| 0083 | 0899 | 1619 | 2284 | 3337 | 4243 | 4923 | 5710 | 6716 | 7753 | 8654 | 9388 |
| 0105 | 0932 | 1739 | 2354 | 3352 | 4247 | 5038 | 5755 | 6724 | 7788 | 8659 | 9498 |
| 0112 | 1011 | 1791 | 2392 | 3357 | 4317 | 5053 | 5877 | 6841 | 7829 | 8681 | 9520 |
| 0119 | 1065 | 1833 | 2474 | 3364 | 4330 | 5054 | 5880 | 6956 | 7833 | 8747 | 9727 |
| 0160 | 1110 | 1860 | 2652 | 3378 | 4449 | 5115 | 5889 | 6966 | 7874 | 8752 | 9767 |
| 0222 | 1125 | 1874 | 2721 | 3413 | 4451 | 5160 | 5905 | 6968 | 7879 | 8761 | 9809 |
| 0242 | 1140 | 1905 | 2742 | 3473 | 4457 | 5253 | 5928 | 6969 | 7899 | 8788 | 9843 |
| 0301 | 1167 | 1912 | 2743 | 3548 | 4474 | 5309 | 6069 | 7122 | 7928 | 8860 | 9879 |
| 0310 | 1170 | 1971 | 2802 | 3563 | 4476 | 5363 | 6073 | 7137 | 7981 | 8876 | 9894 |
| 0340 | 1194 | 2054 | 2887 | 3587 | 4478 | 5425 | 6168 | 7173 | 8071 | 8882 | 9898 |
| 0390 | 1197 | 2182 | 2925 | 3591 | 4542 | 5433 | 6237 | 7255 | 8081 | 8904 | 9902 |
| 0479 | 1210 | 2184 | 2940 | 3723 | 4549 | 5458 | 6238 | 7305 | 8187 | 8920 | 9908 |
| 0501 | 1212 | 2202 | 2981 | 3812 | 4552 | 5524 | 6262 | 7378 | 8252 | 8942 | 9948 |
| 0504 | 1277 | 2207 | 2988 | 3833 | 4602 | 5535 | 6268 | 7407 | 8307 | 8951 | 9952 |
| 0514 | 1310 | 2223 | 3029 | 3850 | 4624 | 5542 | 6288 | 7507 | 8384 | 9044 | 9994 |
| 0542 | 1372 | 2225 | 3114 | 3892 | 4645 | 5555 | 6386 | 7572 | 8422 | 9081 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# बॅलटवर निवडणुका नाही तोवर बहिष्कार टाका

पान १ वरून

निवडणुका घ्याव्यात आणि त्या मतपत्रिकेवर (बॅलेट पेपरवर) घ्याव्यात, अशी मागणी मुनगंटीवार यांनी आपल्या पक्षाकडे करावी.

आज राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही विधान परिषद निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात घोडेबाजार झाल्याचा दावा केला करत अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी लोकसभेत विधेयक मांडण्याचा निर्धार बोलून दाखवला. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राज्यात विधान परिषदेच्या ८ जागांवर मविआच्या उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यामध्ये काही जण काँग्रेसचे सुज्ञ आहेत ना. घोडेबाजार होऊ नये म्हणून आम्ही पुण्याचा निर्णय घेतला. सरपंच निवडीपासून ते थेट लोकसभा निवडणुकीपर्यंत सर्वच ठिकाणी गुप्त मतदानाऐवजी हात वर करून जाहीर मतदान पद्धत लागू झाली पाहिजे, यासाठी आपण संसदेत बिल आले तर त्यांचे स्वागत करू. पारदर्शकपणे निवडणूक झाल्यास त्या निवडणुकीत मजा येते. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना उत्तर देताना म्हटले की, माणसे पैशांपेक्षा प्रेमाने जिंकता येतात. हे समजले तर अशा प्रकारचे विधेयक आणण्याची गरजच पडणार नाही. निवडणूक प्रक्रियेत सुधारणा झाली पाहिजे. माझा त्याला विरोध नाही. निवडणूक व्यवस्थेत आवश्यक ते बदल झाले पाहिजेत. या संदर्भात कोणी विधेयक आणत असेल तर त्याला आमचा विरोध नाही.

# महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा स्थगित

पान १ वरून

सूचना आणि हरकती नोंदवण्यासाठी ५ जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. या मसुद्यावर मोठ्या प्रमाणात आक्षेप आणि सूचना प्राप्त झाल्याने सरकारने सध्या तो स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

देवस्थाने, हिंदुत्ववादी संघटना आणि इतर संबंधित घटकांमध्ये या कायद्याबाबत काही संभ्रम निर्माण झाला आहे. हा संभ्रम दूर करून सर्व संबंधित पक्षांची मते जाणून घेणे आवश्यक आहे. नव्या कायद्याच्या तयारीसाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत दोन विभागीय आयुक्त, दोन जिल्हाधिकारी, तीन उपसचिव आणि १५ देवस्थान प्रतिनिधींचा समावेश असेल. तसेच देवस्थानांच्या हक्कांसाठी न्यायालयात लढा देणाऱ्या कायदेतज्ज्ञांनाही समितीत स्थान दिले जाणार आहे. विविध घटकांच्या सूचनांचा विचार करून १५ सप्टेंबरपर्यंत नव्या कायद्याचा मसुदा तयार केला जाणार आहे.

# अहमदाबाद विमान अपघात! प्रत्यक्षदर्शीची ८ महिन्यांनी साक्ष

पान १ वरून

उड्डाण केलेले एअर इंडियाचे विमान १७१ उड्डाणानंतर काही क्षणांतच कोसळले आणि आगीचा आगडोंब उसळला. या भीषण अपघातात विमानातील प्रवासी आणि कर्मचारी असे एकूण २५९ लोक होरपळून मरण पावले. अपवाद फक्त विश्वास कुमार रमेश या एका प्रवाशाचा होता. भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक विश्वास कुमार रमेश विमान कोसळल्यावर विमानातून अगदी चालत बाहेर पडले. त्यांचा तो व्हिडिओ अख्ख्या जगाने पाहिला. रमेश हे अपघाताचे एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. अनेक खासगी वृत्तवाहिन्यांनी त्यांच्या मुलाखती घेतल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून अनेक बड्या नेत्यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली.

अपघातात मरण पावलेल्यांमध्ये रमेश यांचा एक भाऊ आहे. त्याची ओळख पटवण्यासाठी रमेश यांनी डॉक्टरांना डीएनए चाचणीसाठी सहकार्य केले. अपघातानंतर बरेच दिवस ते भारतातच होते. त्यानंतर ते पुन्हा ब्रिटनला निघून गेले. आश्चर्यजनक बाब म्हणजे रमेश या अपघाताचे एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असूनदेखील त्यांची सविस्तर मुलाखत घ्यावी, असे तपास यंत्रणांना वाटले नाही. ही बाब खरेतर गंभीर आहे.

त्याचे कारण अपघातानंतर अनेक वाहिन्यांशी बोलताना रमेश यांनी दिलेली माहिती अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अपघात होण्यापूर्वी आपल्याला हिरव्या व पांढऱ्या रंगाच्या लाईट लकाकताना दिसल्या होत्या आणि त्यानंतर एक मोठा स्फोटाचा आवाज आपण ऐकला होता, असे रमेश यांनी सांगितले आहे. वैमानिकांच्या संघटनेच्या मते हिरवी-पांढरी लाईट लागणे म्हणजे विमानातील मुख्य वीजपुरवठा यंत्रणा बंद पडली असून, विमान आपत्कालीन पुरवठा यंत्रणेकडून वीज घेत आहे याचे संकेत असतात. मोठा आवाज आला म्हणजे वीजपुरवठा यंत्रणेचा स्फोट झाला असावा. मात्र त्या दृष्टीने तपासच झालेला नाही.

# सावंतवाडीतील शवगृह सेवा प्रशासनाच्या तत्परतेमुळे पूर्ववत

## फ्रीजरची दुरुस्ती यशस्वीरित्या पूर्ण

■ सावंतवाडी

**सावंतवाडी** उपजिल्हा रुग्णालयातील शवगृहातील फ्रीजर बुधवारी रात्री अचानक बंद पडल्याने निधन झालेल्या व्यक्तींचे मृतदेह सुरक्षित ठेवण्याबाबत गंभीर अडचणी निर्माण झाल्या होत्या. या घटनेची माहिती मिळताच रुग्णालय प्रशासनाने तत्काळ हालचाली सुरू करून संबंधित देखभाल-दुरुस्ती करण्यासाठी कंपनीशी संपर्क साधला.

गुरुवारी सकाळी उपजिल्हा रुग्णालयाकडून कंपनीला अधिकृत पत्र पाठविण्यात आले. तसेच दूरध्वनीद्वारे परिस्थितीची माहिती देत तातडीने दुरुस्तीची मागणी करण्यात आली. प्रशासनाच्या पाठपुराव्यानंतर कंपनीच्या तंत्रज्ञांनी रुग्णालयात भेट देऊन फ्रीजरची सखोल तपासणी केली आणि आवश्यक दुरुस्तीचे काम हाती घेतले. तंत्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे काल फ्रीजरची दुरुस्ती यशस्वीरित्या पूर्ण झाली. त्यामुळे शवगृहातील सेवा पुन्हा सुरळीत सुरू झाली असून, निधन झालेल्या व्यक्तींचे मृतदेह सुरक्षित ठेवण्याची सुविधा पूर्ववत उपलब्ध झाली आहे. यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांसह नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबत माहिती देताना जीवन रक्षा वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजू मसूरकर यांनी सांगितले की, फ्रीजर बंद पडल्याची माहिती मिळताच संबंधित कंपनीशी तातडीने संपर्क साधण्यात आला. प्रशासनाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कंपनीने तत्परतेने दुरुस्तीचे काम पूर्ण केले. भविष्यात अशा प्रकारची अडचण निर्माण होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात येणार असून, नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता रुग्णालय प्रशासनाकडून घेतली जात आहे.

# अंदमान समुद्रातील विहिरीत नैसर्गिक वायूचा शोध

■ नवी दिल्ली

**भारताच्या** समुद्री ऊर्जा संशोधनात एक ऐतिहासिक घटना घडली आहे. ऑईल इंडिया लिमिटेडने अंदमान समुद्रात खोदलेल्या एका संशोधन विहिरीत नैसर्गिक वायूचा शोध लावला आहे, अशी घोषणा केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप पुरी यांनी केली आहे. हा शोध 'श्री विजयपूरम-३' या संशोधन विहिरीत लागला आहे.

नैसर्गिक वायूचा साठा सापडलेली विहीर अंदमान बेटांच्या पूर्व किनाऱ्यापासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर आहे. ही विहीर १९०० मीटरहून अधिक खोलीपर्यंत खोदण्यात आली. ही उत्खनन 'इओसीन फॉर्मेशन'मध्ये केले होते.

इथे सुरुवातीच्या उत्पादन चाचणीदरम्यान सतत वायू जळत असल्याचे दिसून आले. हा नैसर्गिक वायूच्या अस्तित्वाचा स्पष्ट पुरावा आहे.

# सुप्रीम कोर्टाच्या निर्देशाला केराची टोपली

## म्हाडाने सुमारे ३०० कुटुंबांना वाऱ्यावर सोडले



■ मुंबई

**उच्च** न्यायालयाच्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर बीयूडीपीअंतर्गत १९९४ साली मंजूर केलेले उत्तर मुंबईतील मालवणी, मालाड येथील दहा भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थांना देण्यात सीआरझेडची सबब देऊन म्हाडाचे अधिकारी दिरंगाई करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. २१ डिसेंबर १९९१ रोजी आराखडा मंजूर केल्यानंतर म्हाडाने ३० ऑक्टोबर १९९४ रोजी २१ मीटर्स, २५ मीटर्स, ३० मीटर्स आणि ४० मीटर्स आकाराचे भूखंड जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविल्या जाणाऱ्या बॉम्बे अर्बन डेव्हलपमेंट प्रोजेक्टअंतर्गत मंजूर केले होते. आतापर्यंत या भूखंडावर ८४ टक्के पायाभूत सुविधांचे काम पूर्ण झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने सव्वा वर्षांपूर्वी २५ फेब्रुवारी २०२५ ला सदर भूखंड १९८७-१९९४ या काळात मंजूर झाले होते आणि रस्ते आणि पायाभूत सुविधांचे काम फार पूर्वी पूर्ण झाले होते. या भूखंडांवर झालेल्या विकासकामामुळे आता ५० मीटर्सचा बफर झोन बनविणे जवळ जवळ अशक्य आहे. शिवाय हे काम मुंबई उच्च न्यायालयाने ०६ ऑक्टोबर २००५ रोजी दिलेल्या अंतरिम स्थगिती अगोदर झाले होते.

सुरुवातीला केंद्रीय पर्यावरण आणि वन मंत्रालयाने हा भूखंड १९ फेब्रुवारी १९९१ रोजी सीआरझेड नियम लागू झाल्यानंतर वितरीत करण्यात आल्याचे नमूद केले होते. मात्र म्हाडाने सादर केलेल्या माहितीच्या आधारे या भूखंडांना १० नोव्हेंबर २००५ रोजी मंजुरी देण्यात आली.

सीआरझेड-१ प्रमाणे १००० स्क्वेअर मीटर्स पेक्षा जास्त जागेवर तिवराचे जंगल असल्यास ५० मीटर्सचा बफर झोन बनविणे आवश्यक आहे. सीआरझेड-२ प्रमाणे महानगरपालिका अंतर्गत क्षेत्राला रस्ते, सांडपाणी आणि इतर पायाभूत सुविधा दिल्या असल्यास असे क्षेत्र, विकसित क्षेत्र मानले जाते. म्हणून वरील भूखंड सीआरझेड-२ मध्ये मोडतात.

म्हाडाने १९८७, १९८८, १९८९ आणि १९९४ मध्ये प्रसिध्द केलेल्या माहिती पत्रकांनुसार काही सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून दहा टक्के अनामत रक्कम घेऊन त्यांना भूखंड देण्यात आले. मात्र खालील संस्थांना मंजूर भूखंड अजूनही देण्यात आले नाहीतः १. मालवणी स्वप्नपूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ३७), २. मालवणी लक्ष्मीनारायण सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत(भूखंड क्रमांक ३८), ३. मालवणी सागर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत(भूखंड क्रमांक ४१), ४.मालवणी सहारा सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ४२), ५. मालवणी तिरंगा सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ४४), ६. मालवणी प्रबोधन सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ४५), ७. मालवणी सुखसागर सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ५३), ८. मालवणी स्वप्न साकार सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ५४), ९. मालवणी मातोश्री सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ५६) आणि १०. मालवणी आनंद दीप सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित(भूखंड क्रमांक ५७).

म्हाडाचे अधिकारी सीआर झेडचे कारण सांगून बरीच वर्षे भूखंड वितरीत करीत नसल्यामुळे २०११ मध्ये या सोसायट्यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. नंतर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. शेवटी २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने सदर भूखंड वितरीत करण्यास अनुकूलता दर्शविली. तरीही म्हाडाचे अधिकारी भूखंड वितरीत करण्यात दिरंगाई करीत आहेत. यामुळे ३०० हून अधिक लाभधारक ३० वर्षांहून अधिक काळ प्रतीक्षेत आहेत. म्हाडाने भूखंडांचे वितरण त्वरीत केले नाही, तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन न केल्याबद्दल अवमान याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती संस्थांना दिली.

# मुक्त विद्यापीठाचा अभिनव उपक्रम

## एआय कॅमेऱ्यांच्या निगराणीत परीक्षा

■ नाशिक

**नाशिकच्या** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त परीक्षा प्रक्रियेसाठी एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणालीचा अवलंब केला आहे. अशी प्रणाली वापरणारे ते राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

मे-जून २०२६ च्या उन्हाळी परीक्षांसाठी राज्यातील ५५८ परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका डाऊनलोडिंग व उत्तरपत्रिका सीलिंग कक्षांमध्ये एआय-आधारित कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच पहिल्या टप्प्यात ८४ निवडक केंद्रांवरील परीक्षा कक्षांमध्येही ही व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे. नाशिक येथील मुख्य नियंत्रण कक्षातून सर्व केंद्रांवर नजर ठेवली जात असून, संशयास्पद हालचाली किंवा गैरप्रकार आढळल्यास एआय प्रणाली तत्काळ अलर्ट देते. या उपक्रमामुळे परीक्षा प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि सुरक्षितता निर्माण झाली आहे.

विद्यापीठाची परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त करण्यासाठी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार एआय-आधारित सीसीटीव्ही देखरेख प्रणाली लागू करण्यात आली आहे. राज्यातील ५५८ परीक्षा केंद्रांवर प्रश्नपत्रिका डाऊनलोडिंग कक्ष आणि उत्तरपत्रिका सीलिंग कक्षांमध्ये अवघ्या दहा दिवसांत एआय-आधारित कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मुंबई, नागपूर, नांदेड, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, पुणे आणि नाशिक या आठ विभागीय केंद्रांमधून परीक्षा प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जात आहे. २० एलईडी स्क्रीन आणि एक एआय अलर्ट स्क्रीनच्या माध्यमातून सर्व परीक्षा केंद्रांवर सतत नजर ठेवली जाते.

# जुहू चौपाटीवर १६ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

■ मुंबई

**जुहू** चौपाटीवर मित्रांसोबत फिरायला गेलेल्या १६ वर्षीय मुलाचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, सांताक्रूझ पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सरफराज खान असे मृत मुलाचे नाव असून, अंधेरीत राहायला होता. तो आपल्या मित्रांसोबत जुहू चौपाटीवर गेला असताना समुद्राच्या पाण्यात खेळत होता. यावेळी पाण्याचा अंदाज घेण्यासाठी तो पुढे गेला असता अचानक आलेल्या मोठ्या लाटेने त्याला खोल पाण्यात ओढले. मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यश आले नाही. त्यांनी जीवरक्षक आणि पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर सुरू करण्यात आलेल्या शोधमोहिमेत दुसऱ्या प्रयत्नात सरफराजला बाहेर काढण्यात आले. त्याला तातडीने कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# सरसकट कर्जमाफीसाठी १२ जूनपासून रोहित पवारांचे पंढरपुरात बेमुदत उपोषण

■ पंढरपूर

**राज्यातील** शेतकरी गेल्या तीन-चार वर्षांपासून सातत्याने आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा दर यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांना २ लाख पर्यंत कर्जमाफी जाहीर झाली आहे. पण त्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे १२ जूनपासून पंढरपूर येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन करणार आहेत. रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करून आंदोलनाची घोषणा केली. सरकारने जाहीर केलेल्या




कर्जमाफी योजनेतील जाचक अटींमुळे मोठ्या संख्येने शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

रोहित पवार यांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील ५० हजार रुपयांच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची मागणी करण्यात आली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम आधी भरण्याची अट न घालता दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्यात यावी, अशीही त्यांची मागणी आहे. याशिवाय प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग दोन वर्षे नियमित कर्जफेडीची अट रद्द करावी, २०१७ च्या कर्जमाफीसाठी पात्र असूनही कागदपत्रांच्या त्रुटींमुळे लाभापासून वंचित राहिलेल्या सुमारे ६.५६ लाख शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.



मोसमी पावसाचे तळ कोकणात आगमन झाले असताना मुंबईच्या आभाळात ढगांची गर्दी झाली आहे.

# पालिकेने बेकायदेशीर गोशाळा तोडली

## पालिका मुख्यालयातच गायी बांधल्या

■ विरार

**नालासोपारा** येथील बेकायदा गोशाळेवर केलेल्या कारवाईमुळे वाद निर्माण झाला आहे. शुक्रवारी गोसेवकांनी अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवत तीन गायी आणि तीन वासरे थेट वसई-विरार महानगरपालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वाराला बांधली. नालासोपारा पश्चिम येथील शनी मंदिर परिसराशेजारी असलेल्या एका गोशाळेवर वसई-विरार महापालिकेने कारवाई केली. या कारवाईत अनेक गायी बेघर झाल्या आहेत तर एक गाय जखमी झाली होती. यामुळे वाद निर्माण झाला आहे. गोशाळा हटवण्यापूर्वी पालिकेने जनावरांच्या पुनर्वसनाची तसेच चारा आणि पाण्याची कोणतीही योग्य व्यवस्था करण्यात आली नव्हती. या कारवाईचा निषेध करण्यासाठी गायींना पालिका मुख्यालयाबाहेर आणून ठेवले होते.

# एचपीव्ही लसीकरण मोहिमेला अत्यल्प प्रतिसाद

■ वसई

**वसई-विरार** महापालिकेच्या विशेष एचपीव्ही लसीकरण मोहिमेला अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत केवळ १ हजार २२७ मुलींचे लसीकरण पूर्ण झाले.

एचपीव्ही म्हणजे 'ह्युमन पॅपिलोमाव्हायरस' हा एक विषाणू आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्यामागे ९५ टक्क्यांहून अधिक प्रकरणांमध्ये या विषाणूचा संसर्ग कारणीभूत आढळतो. त्यामुळे ८ मार्च पासून राज्यस्तरीय एचपीव्ही लसीकरण मोहिमेला सुरुवात झाली होती. वसई-विरार महापालिकेने आपल्या कार्यक्षेत्रातील १४ वर्षे वयोगटातील मुलींसाठी ही लसीकरण मोहीम सुरू केली होती. मात्र जनजागृतीचा अभाव असल्याने तीन महिन्यांत केवळ १ हजार २२७ इतक्या मुलींचे लसीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

# मिरा-भाईंदर शहरात तीव्र पाणीटंचाई! नागरिकांचे हाल

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** शहरात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातही तीव्र पाणी टंचाई भेडसावत आहे. अनेक प्रभागांत ३ ते ४ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेला उल्हास नदी स्त्रोतातून स्टेम प्राधिकरणाकडून ८४ आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून १२५ दशलक्ष लीटर असा एकूण २०९ दशलक्ष लीटर पाणी मंजूर आहे.

शहराची लोकसंख्या वाढून १५ लाखांहून अधिक झाली आहे. त्यामुळे सध्याची पाण्याची मागणी २५० दशलक्ष लीटर एवढी वाढली आहे. पाण्याची मागणी व पुरवठा यात ५० दशलक्ष लीटर पाण्याची तफावत आहे. त्यामुळे शहरात मोठी पाणीटंचाई निर्माण झाली आहे. अनेक प्रभागांमध्ये सलग ३ ते ४ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. पाणी आलेच तर ते अत्यंत कमी दाबाने व अनियमित वेळेत येते. पाणी टंचाईमुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असून, पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. उन्हाची तीव्र झळ असताना महापालिका नागरिकांना पाणी देण्यासाठी असमर्थ ठरत आहे, असा आरोप शिवसेनेने केला आहे.

# ४९८अ कलमाच्या गैरवापर प्रकरण

## पतीच्या नातेवाईकांवरील कोर्टाकडून रद्द

■ मुंबई

**वैवाहिक** वादातून पतीच्या संपूर्ण कुटुंबाला अडकवण्याच्या वाढत्या प्रवृत्तीवर उच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आणि एका प्रकरणात विवाहितेच्या सासरच्या लोकांना मोठा दिलासा दिला.

केवळ मोघम आणि सरसकट आरोपांच्या आधारे पतीच्या नातेवाईकांना फौजदारी खटल्यात खेचणे हा कायद्याचा गैरवापर आहे, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने पतीच्या आई-वडिलांसह भाऊ, भावजयीच्या विरोधातील गुन्हा रद्द केला. नवी मुंबईच्या कामोठे पोलीस ठाण्यात विवाहितेने पती नजीम सय्यद याच्यासह सासू, सासरे, दीर आणि जाऊ यांच्याविरोधात हुंडाबळी, छळ व अमानुष मारहाणअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. पीडितेच्या आरोपानुसार लग्नानंतर तिचे दागिने सासूने काढून घेतले आणि नातेवाईकांनी तिला शारीरिक-मानसिक त्रास दिला. या गुन्ह्याविरोधात पतीच्या नातेवाईकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या एकलपीठाने सुनावणी घेतली आणि संपूर्ण वस्तुस्थितीची पडताळणी केल्यानंतर पतीच्या नातेवाईकांविरोधातील गुन्हा रद्द करीत त्यांना मोठा दिलासा दिला. विवाहितेचे दीर आणि जाऊ हे पुण्यात नोकरी करत असून, ते स्वतंत्र राहतात. कथित घटनेच्या दिवशी ते पुण्यात त्यांच्या कार्यालयात उपस्थित असल्याचे हजेरी अहवालावरून सिद्ध झाले. पती-पत्नीच्या वादात नातेवाईक केवळ मूकदर्शक राहिले किंवा त्यांनी कोणतीही बाजू घेतली नाही, तर त्याचा अर्थ त्यांनी छळ केला असा होत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# जासई तलावात बुडून तीन मुलींचा मृत्यू

■ उरण

**पावसाळ्याची** सुरुवात होत असताना उरण तालुक्यातील जासई गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तलावात अंघोळीसाठी गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा पाण्याची खोली लक्षात न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण उरण तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून, जासई गावावर शोककळा पसरली आहे.

आज दुपारी अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. हरियाणा रमजान परवीन (८), रवीना रमजान परवीन (७) आणि सौम्या कन्हैया प्रजापती (१३) या तीन मुली जासई गावातील तलावात अंघोळीसाठी गेल्या होत्या. खेळता-खेळता त्या तलावातील खोल पाण्यात गेल्या. पाण्याचा अंदाज न आल्याने तिघीही बुडू लागल्या व काही क्षणांतच काळाने त्यांच्यावर झडप घातली. मुलींचा आरडाओरडा ऐकून स्थानिक नागरिक व नातेवाईक घटनास्थळी धावून आले. अथक प्रयत्नांनंतर तिन्ही मुलींना बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

# काळ खूप मोठा शिक्षक आहे! बाळ मानेंचे स्टेटस पुन्हा चर्चेत

**रत्नागिरी** - कोकण विधान परिषद निवडणुकीत ऐनवेळी माघार घेतल्यानंतर शिवसेना उबाठाचे उमेदवार बाळ माने यांचे सोशल मीडियावरील स्टेटस सलग दुसऱ्या दिवशीही चर्चेचा विषय ठरले आहे. 'काळ खूप मोठा शिक्षक' असा संदेश त्यांनी स्टेटसवर ठेवला असून, त्यामागचा नेमका रोख कुणाकडे आहे, याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधान परिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असलेल्या बाळ माने यांनी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी आपली उमेदवारी मागे घेतली होती. त्यांनी भाजपा नेते नितेश राणे यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन अर्ज मागे घेतल्याने मोठी राजकीय खळबळ उडाली होती. या निर्णयानंतर उबाठाने त्यांची हकालपट्टी केली.

देवाभाऊ सहकार टॅक्सी

जाहीर आवाहन

*ड्रायव्हर नाही, भागीदार बना!*

*देवाभाऊ सहकार टॅक्सी सेवेत ड्रायव्हर पार्टनर म्हणून सहभागी व्हा!*

*स्वतःचे वाहन असलेले चालक आणि नवीन वाहन घेऊन ॲप आधारित टॅक्सी सेवा देण्याची इच्छा असलेल्या तरुण/ तरुणींसाठी सुवर्णसंधी ! ! !*

▪ वैशिष्ट्ये ▪

- ✔ सहकार तत्वावर पारदर्शक कामकाज
- ✔ नवीन वाहनासाठी कर्ज सुविधा
- ✔ नवीन व विद्यमान टॅक्सी चालकांचे स्वागत
- ✔ विमा व कल्याणकारी सुविधा प्रस्तावित
- ✔ ड्रायव्हर पार्टनरला सन्मान
- ✔ सुरक्षित, विश्वासार्ह प्लॅटफॉर्म
- ✔ भागीदार बनण्याची संधी

♦ मर्यादित नोंदणी ♦



*आजच devabhausahakartaxi.com वर जाऊन फॉर्म भरा किंवा क्यूआर स्कॅन करुन नोंदणी करा!*

*"फक्त चालक नाही, तर सहकार टॅक्सीचा भागीदार बना !"*

**प्रवीण दरेकर**

*अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे*

*अध्यक्ष, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित*

**देवदत्त सहकारी पर्यटन व वाहतुक संस्था मर्यादित**

मो.नं. : 9076190011 / ईमेल : support@devabhausahakartaxi.com

# भांडूप-कल्याण परिमंडलात महावितरण वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ कल्याण

**महावितरणचा** २१ वा वर्धापन दिन आज भांडुप परिमंडलात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भांडुप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील होते. यावेळी सहाय्यक महाव्यवस्थापक प्रवीण रहांगदळे, सहाय्यक महाव्यवस्थापक नमिता गझदर, प्रणाली विश्लेषक कीर्ती जोशी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र बागुल तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक विद्युत सुरक्षा शपथ घेऊन करण्यात आली. यानंतर उपस्थितांना संबोधित करताना मुख्य अभियंता संजय पाटील यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी व जनमित्रांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तर महावितरणच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून कल्याण परिमंडळातील २१ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रक्तदान करून आदर्श निर्माण केला. रोटरी क्लब डोंबिवली आणि चिदानंद चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात रक्तदान शिबिराचे आयोजन आले. तेजश्री या प्रशासकीय इमारतीत मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी अधीक्षक अभियंता रविंद्र आव्हाड, मोहन काळोखे, कार्यकारी अभियंता देवाशिष दत्ता, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले, रोटरी क्लब डोंबिवलीचे राकेश मेहता, चिदानंद चॅरिटेबल ट्रस्टचे डॉ. निलम गुप्ता, तेजस्वीनी धोत्रे, सोनाली गुप्ता, पूजा गौड, पीजा शहा, किसन गुप्ता उपस्थित होते.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# एसटीला सापत्न वागणूक का ?

**अलिकडेच** मुख्यमंत्र्यांनी मुंबईतल्या बेस्ट उपक्रमाच्या आधुनिकीकरणासाठी एक स्वतंत्र बैठक बोलवली होती. मुंबईचे आंतरराष्ट्रीय महत्त्व सगळ्यांनाच मान्य आहे. मुंबईच्या धकाधकीच्या जीवनामध्ये आणि प्रचंड गर्दी असलेल्या या महानगरात सार्वजनिक परिवहन व्यवस्था अधिक भक्कम आणि कार्यक्षम असणे हेदेखील तितकेच महत्त्वाचे ठरते. विकसित महाराष्ट्र २०४७ च्या आराखड्यानुसार बेस्ट उपक्रम सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा सरकारचा विचार दिसतो. प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांनी या विषयात लक्ष घालून बेस्टच्या सुधारणांविषयी पुढाकार घ्यावा ही गोष्ट निश्चितच चांगली आहे. बेस्टची सुधारणा हे जर विकसित महाराष्ट्राच्या आराखड्यातला भाग असेल तर मग महाराष्ट्रासाठी तितकीच महत्त्वाची असलेली राज्य परिवहन मंडळाची बससेवादेखील सुधारली पाहिजे. अशाच प्रकारची बैठक मुख्यमंत्र्यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या सर्वांगिण सुधारणेसाठी घेतली पाहिजे. अलिकडे त्यांनी घेतलेल्या बैठकीत राज्य परिवहन मंडळात पुढच्या दोन तीन वर्षामध्ये अधिकाधिक इलेक्ट्रीक बसेस सुरू करण्यावर भर दिला आणि राज्यात अधिकाधिक चार्जींग स्टेशन उभारण्यासाठी कार्यक्रम हाती घेण्याचेही निर्देश दिले. परंतु केवळ इलेक्ट्रीक बसेसच्या खरेदीतून राज्य परिवहन मंडळाची परिस्थिती सुधारणार नाही. कारण आज या महामंडळाची जी काही दूरावस्था आहे. त्यात एसटी बसेस, आगारांची अस्वच्छता, कर्मचाऱ्यांच्या वेतनापासून ते त्यांच्या पोषाखापर्यंत त्यांच्या अरेरावीपर्यंत बऱ्याच सुधारणांची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातल्या एसटी बसेस त्यांचे वेळापत्रक या सगळ्याच गोष्टी इतक्या धन्य स्वरूपाच्या आहेत की, प्रामुख्याने ग्रामीण भागातील एसटीचा कारभार हा रामभरोसे चालत असल्याचेच म्हणावे लागते. बेस्टच्या आधुनिकीकरणासाठी घेतला गेलेला पुढाकार आणि एसटी महामंडळाकडे होत असलेले दुर्लक्ष यातली तफावत नाकारता येणार नाही. बेस्टला मिळणारी खास वागणूक आणि एसटीबाबतचा हा सापत्न भाव मुख्यमंत्र्यांनीच लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. जवळपास शंभर वर्ष जुनी असलेली महाराष्ट्राच्या एसटी बससेवा, एसटी बस व्यवस्थापनामध्ये आणि नियोजनामध्ये अमूलाग्र परिवर्तनाची वेळ आलेली आहे.

**विकसित महाराष्ट्र आणि ग्रामीण भाग**

विकसित महाराष्ट्राचे चित्र रंगवताना ते वारंवार शहर आणि महानगर केंद्रीत होते आहे. शहरांची लोकसंख्या अपुऱ्या पडणाऱ्या सेवासुविधा, रोजगारासाठी शहरांकडे धावणारे लोंढे नियोजनाचाच अभाव असल्याने या महानगरांना येणारा बकालपणा, या सगळ्या गोष्टी लक्षात घ्याव्याच लागतात. तरीदेखील राज्याच्या विकास कार्यक्रमावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा विचार केला तर पुन्हा एकदा ग्रामीण भाग कमालीचा दुर्लक्षित होत असल्याचे सिद्ध होते. पायाभूत सुविधांच्या नावाखाली शहरांवर विकासनिधीचा पाऊस पडत असतो, तर ग्रामीण भागात मूलभूत सुविधांसाठी याच निधीचा दुष्काळ असतो. समतोल विकासाचे केवळ बुजगावणे दाखवले जाते. परंतु योजनापूर्वक खेडी तालुका किंवा जिल्ह्याची ठिकाणेसुद्धा मूलभूत सुविधांनी परिपूर्ण झाली पाहिजेत. असे नियोजन विकसित महाराष्ट्राच्या ध्येयधोरणात दिसत नाही. मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर, याच मोजक्या शहरांवर विकासकामांची बरसात होते आहे. मग इथल्या मेट्रो सेवा, सार्वजनिक बससेवा किंवा अगदी आता तर पॉड टॅक्सीसारखा प्रकार मुंबईत सुरू केला जातो आहे. त्यासाठीसुद्धा बऱ्याच मोठ्या निधीची तरतूद केली जाते आहे. अगदी समृद्धी महामार्ग तयार करताना मुंबई आणि नागपूरचाच प्रामुख्याने विचार झाला आणि या राजधानी उपराजधानीतल्या प्रवासाचा वेळ वाचावा एवढाच उद्देश ठेवला गेला. या महामार्गाला लागून असलेली खेडीसुद्धा विकसित होती असेदेखील मधाचे बोट लावले गेले होते. परंतु या महामार्गावरच्या छोट्या गावांच्या विकासासंदर्भात अजूनही कोणतीच ठोस योजना मांडली गेलेली नाही. केवळ महानगरांच्या समृद्धीवर अधिक लक्ष दिले जाते आहे. तोच प्रकार मुंबईच्या विविध विकासकामांबाबत म्हणता येईल. आज अगदी नाशिकमधली शहर बससेवासुद्धा सुधारता आलेली नाही. खाजगी कंपनीच्या भरोशावर तिथली सार्वजनिक परिवहन सेवा सोडून दिली गेलेली आहे. बेस्टची सुधारणा झाली पाहिजे. पण संपूर्ण राज्याच्या विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवत असताना राज्य परिवहन महामंडळ जे सामान्य माणसासाठी सर्वाधिक महत्त्वाचे ठरलेले आहे. त्यासंदर्भात तितक्याच प्राधान्याने विचारविनिमय झाला पाहिजे.

**बेस्टची स्थिती समाधानकारक**

आज राज्य परिवहन महामंडळाकडे स्वतःची आगारे आहेत. लाखो एकर जागा या आगारांनी व्यापलेली आहे. परंतु आज राज्यात एकही आदर्श बसस्थानक दाखवता येत नाही. केंद्र सरकारने सामान्य माणसाचा विचार करूनच रेल्वे सेवेमध्ये अमूलाग्र सुधारणा केल्या. देशभरातल्या रेल्वे स्थानकांचे चेहरे मोहरे बदलत आहेत. नव्या आधुनिक पद्धतीच्या गाड्या येत आहेत. अगदी तिकीट बुकिंगसुद्धा सहजपणे घरबसल्या होते आहे परंतु रोज जवळपास दीड ते दोन कोटी प्रवाशांची ने-आण करणाऱ्या एसटी बससेवेकडे लक्ष द्यायला सरकारला वेळ नाही. डिजिटल महाराष्ट्राचे कौतुक करताना राज्य परिवहन सेवेत अजूनही डिजिटल कारभार पूर्णपणे जुळलेला नाही. तालुका जिल्हा स्तरावर आरक्षणाबाबतीत प्रचंड गोंधळ असतो. वेळापत्रक तर कधीच पाळले जात नाही. आधुनिकता आणि एसटी बससेवा यांचा दूरान्वये संबंध नाही असेच आजचे चित्र पाहायला मिळते. एसटीच्या तुलनेमध्ये मुंबईची बेस्ट सेवा ही कितीतरी कार्यक्षम आणि सुधारलेली आहे. राज्य सरकारने युद्धपातळीवर राज्य परिवहन मंडळाच्या कारभारात सुधारणा करायला हवी. अजूनही एसटी बसमधल्या आसनांच्या बाजूला आमदार किंवा खासदारांसाठी राखीव असे लिहिलेले असते. परंतु एकही लोकप्रतिनिधी किंवा अगदी नगरसेवक, सरपंचसुद्धा आता एसटीने प्रवास करत नाही. याचा अर्थ एसटीच्या व्यवस्थापनामध्ये किती अगदी मुळापासूनच सुधारणा कराव्या लागणार आहेत. लोकांचा विश्वास असलेली आणि लोकांची गरज असलेली एसटी सेवा जाणीवपूर्वक दुर्लक्षित ठेवली जाते आहे.

## सुविचार


**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

विश्वास असेल तर मौनातलंही कळतं, नाही तर शब्दांनीही गैरसमज होतात. विश्वास हा दोघांच्या संबंधांचा आत्मा असतो.

## पंचांग



**रविवार, ७ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** अधिक ज्येष्ठ कृष्ण सप्तमी**
**नक्षत्र : धनिष्ठा**



**रवी उदय- ०६-०२**
**रवी अस्त- १९-१३**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कुंभ**

**भानुसप्तमी**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### मटण कलेजी मसाला



★ **साहित्य :** २-४ जणांसाठी, २५० ग्रॅम मटण कलेजी, २ कांदे, २ टेबलस्पुन टोमॅटो प्युरी, १ टेबलस्पुन आले-लसुण पेस्ट, १-२ टेबलस्पुन कोथिंबीर, १ टेबलस्पुन घरगुती मसाला, १ टेबलस्पुन धणे पावडर, १/४ टिस्पुन हळद, चवीनुसार मीठ, १ टेबलस्पुन तेल

★ **कृती :** बाऊलमध्ये स्वच्छ केलेली कलेजी घेऊन त्यात आले-लसुण पेस्ट, हळद, घरगुती तिखट, धने पावडर, चिरलेला कांदा, कोथिंबीर सर्व कलेजीला १० मिनिटे मॅरिनेट करून झाकून ठेवा. मिक्सर जारमध्ये कांदा, हळद, तिखट, धने पावडर घेऊन नंतर त्यात टोमॅटो प्युरी मिक्स करा. सर्व मिश्रणाची पेस्ट करून घ्या. पॅनमध्ये तेल गरम झाल्यावर त्यात तयार पेस्ट मिक्स करून थोडे मसाल्याचे पाणीही मिक्स करा व तेल सुटेपर्यंत परता. नंतर त्यात कलेजी मिक्स करा. मिरच्या उभ्या चिरून टाका. पॅनमधील कलेजी सतत परतत शिजवा. वरून थोडी कोथिंबीर मिक्स करा. चवीनुसार मीठ मिक्स करा. नंतर झाकण ठेवून १५-२० मिनिटे शिजवा. आपली मटण कलेजी मसाला रेडी. प्लेटमध्ये गरमागरम मटण कलेजी मसाला वरून कोथिंबीर पेरून सोबत पोळ्या व कांदा, टोमॅटो स्लाईज व लिंबाची फोड देऊन डिश सर्व्ह करा.




# पहिल्या दिवशी भारतीय संघ भक्कम स्थितीत

## गिल व राहुलच्या शतकांपुढे अफगाणिस्तान गारद



**चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग क्रिकेट स्टेडियममध्ये आज अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारतीय संघाने दमदार सुरुवात करुन ३ बाद ३६८ धावा ठोकल्या. सलामीवीर के.एल.राहुल आणि कर्णधार शुभमन गिल यांनी शतकी खेळी करुन अफगाणिस्तानच्या गोलंदाजांना चांगलेच जेरीस आणले. दिवसअखेर गिल आणि ऋषभ पंत अनुक्रमे १०३ आणि ५० धावा करुन नाबाद राहिले. अफगाणिस्तानकडून मोहम्मद सलीमने २ गडी बाद केले.**

■ चंदीगड

**भारताने** नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघाची धावसंख्या ११.५ षटकांत ४१ वर पोहोचताच यशस्वी जयस्वालला २४ धावा करून झेलबाद केले. त्याला मोहम्मद सलीमने माघारी धाडले. मग साई सुदर्शनच्या साथीत सलामीवीर के.एल.राहुलने संघाच्या धावसंख्येला आकार दिला. सुदर्शन हा राहुलपेक्षा जलदगतीने फलंदाजी करत होता. त्याने ६७ चेंडूंत अर्धशतक ठोकले आणि राहुलने ८६ चेंडूंत ५० धावा पूर्ण केल्या. या जोडीने संघाला ४३ व्या षटकांत १८० धावांवर पोहोचले. मग साई सुदर्शन शतक पूर्ण करेल, असे वाटत असताना मोहम्मद सलीमने त्याला ८१ धावांवर झेलबाद केले. मग राहुल आणि कर्णधार गिल यांनी संघाचा डाव पुढे नेला. मात्र राहुलने १६४ चेंडूत शतक पूर्ण करताच त्याला झियाउर रहमानने तंबूचा रस्ता दाखवला. ऋषभ पंतची साथ घेऊन गिलने चांगली फलंदाजी केली. त्याने ६८ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्यासोबत पंतनेही दमदार फटकेबाजी करुन अफगाणिस्तानची लय बिघडली. गिलने १३८ चेंडूंत १ षटकार आणि ११ चौकारांसह १०० धावा पूर्ण केल्या. शेवटपर्यंत या जोडीने आपली विकेट न गमावता संघाला ३ बाद ३६८ धावांवर पोहोचवले. शुभमन गिल नाबाद १०३ धावा आणि ऋषभ पंत नाबाद ५० धावांवर खेळत आहे. ११ व्या षटकात राहुलने बॅकफुटला जाऊन कट शॉट मारण्याचा प्रयत्न केला. मात्र बॉल बारीकसा बॅटला लागून विकेट किपरकडे गेला. त्यानंतर अंपायरने राहुलला 'नॉट-आऊट' घोषित केले. मात्र यष्टीरक्षकने आवाज न आल्याचे सांगितल्यामुळे डीआरएस घेतलाच नाही.

आणि जेव्हा त्याचा रिप्ले पाहण्यात आला, तेव्हा राहुल आउट असल्याचे दिसून येत होते.

## भारताच्या प्रज्ञानंदने इतिहास रचला प्रतिष्ठित नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकली

■ ओस्लो



**भारतीय** बुद्धिबळपटू व ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने प्रतिष्ठित नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धा जिंकून इतिहास रचला. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत जर्मनीच्या व्हिन्सेंट केमरला पराभूत करून त्याने ही कामगिरी साधली व ही स्पर्धा जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला. २० वर्षीय प्रज्ञानंदने अंतिम दिवशी प्रचंड दबावाखाली खेळून एक क्लासिकल विजय मिळवला आणि पूर्ण ३ गुण पटकावले. या विजयासह त्याने १८ गुणांसह अव्वल स्थान आणि विजेतेपद मिळवले. दिवसाची सुरुवात त्याने १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर केली होती. परंतु अंतिम फेरीतील दमदार कामगिरीमुळे त्याने इतर सर्वांना मागे टाकले. या विजयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे प्रज्ञानंदने या स्पर्धेत जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या मॅग्नस कार्लसेनला क्लासिकल सामन्यांमध्ये दोनदा पराभूत केले. कोणत्याही तरुण खेळाडूसाठी ही कामगिरी खूप विशेष मानली जाते.

## विश्वचषकासाठी इराण संघाला अमेरिकेचा व्हिसा मिळाला

■ न्यूयॉर्क

**अमेरिका** आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे फिफा विश्वचषकातील इराण फुटबॉल संघाच्या सहभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मात्र आता इराणच्या संघाला या स्पर्धेसाठी अमेरिकेचा व्हिसा मिळाला. अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, इराणी संघातील खेळाडू, प्रशिक्षक, ट्रेनर आणि काही सपोर्ट स्टाफ यांना व्हिसा जारी करण्यात आले. त्यांना अंकारा येथील मेक्सिकन दूतावासाकडून आधीच व्हिसा मिळाले आहेत. इराण आपले पहिले दोन सामने कॅलिफोर्नियातील इंग्लेवुड येथे खेळेल. पहिला सामना १५ जून रोजी न्यूझीलंडविरुद्ध, तर दुसरा सामना सहा दिवसांनंतर बेल्जियमविरुद्ध होईल. त्यानंतर संघ सिएटलला जाईल, जिथे २६ जून रोजी त्यांचा सामना इजिप्तशी होईल.

## खो-खो स्पर्धा! धाराशिव आणि सांगलीने विजेतेपद पटकाविले

■ सोलापूर

**महाराष्ट्र** खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत धाराशिवच्या कुमार संघाने सलग तिसरे विजेतेपद पटकावले. तर मुलींच्या गटात सांगलीने सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद कायम राखले.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात धाराशिवने मुंबई उपनगरवर ३२-२६ अशी ६ गुणांची मात करत २.५० मिनिटे राखून विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. मध्यंतरालाच दोन ड्रीम रनच्या जोरावर १८-१२ अशी निर्णायक आघाडी घेऊन धाराशिवने सामन्यावर पकड मजबूत केली.

## पोलंडच्या माजा च्वालिन्स्काने फ्रेंच टेनिसचा किताब जिंकला

■ पॅरिस



**फ्रेंच टेनिस** ओपन या ग्रँडस्लॅम स्पर्धेतील महिला एकेरी प्रकारातील अंतिम फेरीत पोलंडच्या माजा च्वालिन्स्काने मिरा आंद्रेव्हावर ६-३, ६-२ असा विजय मिळून या स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. यासह या स्पर्धेत च्वालिन्स्काने सर्वात तरुण महिला एकेरी विजेती बनण्याचा मान मिळवला. हा सामना १ तास आणि २२ मिनिटे चालला. मिरा आंद्रेव्हाने संपूर्ण स्पर्धेत अप्रतिम खेळ करत केवळ एकच सेट गमावला होता. मात्र अंतिम सामन्यात पोलंडच्या माजा च्वालिन्स्काने कडवा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र आंद्रेव्हाच्या आक्रमक खेळापुढे तिचा निभाव लागला नाही. च्वालिन्स्काने जागतिक क्रमवारीतील ११४ व्या स्थानावरून पात्रता फेरी खेळत थेट अंतिम फेरीपर्यंत धडक मारून एक ऐतिहासिक विक्रम नोंदविला होता.

## १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने तेंडुलकरचा विक्रम मोडला

■ मुंबई



**क्रिकेटच्या** इतिहासातील महान फलंदाजांपैकी एक मानला जाणारा सचिन तेंडुलकर १९८९ च्या पाकिस्तान दौऱ्यासाठी भारतीय संघात पहिल्यांदा निवडला गेला होता, तेव्हा त्याचे वय १६ वर्षे आणि १८१ दिवस होते. सचिनने वयाच्या १६ वर्षे आणि २०५ दिवसांत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करुन इतिहास रचला होता, पण आता १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने त्याहूनही कमी वयात भारतीय वरिष्ठ संघात स्थान मिळवून हा विक्रम मोडला.

आयपीएल २०२६ मध्ये वैभवने २३७.३० च्या स्ट्राईक रेटने ७७६ धावा केल्या आणि ऑरेंज कॅप जिंकली. या मोसमात त्याच्या शेवटच्या चार डावांपैकी तीन डावांमध्ये तो तणावामुळे ९० धावांवर बाद झाला. केवळ ३२७ चेंडूंचा सामना करुन वैभवने ७२ षटकारांसह १३५ वेळा चेंडू सीमारेषेबाहेर पाठवला. त्याने ३६ चेंडूंतील शतकासह सहा वेळा ५० किंवा त्याहून अधिक धावा केल्या. या सहा मोठ्या डावांपैकी चार डावांमध्ये त्याने १६ किंवा त्याहून कमी चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले.

## आज चेंबूरमध्ये मुंबई महापौर क्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धा

■ मुंबई

**चेंबूरच्या** श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतनमध्ये मुंबई महापालिका पुरस्कृत मुंबई महापौर चषक निमंत्रित क्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक्स स्पर्धेचे उद्या ७ जून रोजी आयोजन करण्यात आले. क्रीडा विश्वात मानाच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेचे मुख्य आयोजन 'स्पोर्ट्स क्रोबॅटिक्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' यांच्या वतीने करण्यात आले असून मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक संघटना, 'लोकमान्य शिक्षण संस्था' व 'सुकहारा स्पोर्ट्स अकॅडमी' हे या स्पर्धेचे सहआयोजक आहेत.या स्पर्धेचे उद्घाटन मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी उपमहापौर संजय घाडी, आमदार तुकाराम काते, सना मलिक, नगरसेवक महादेव शिगवण हे मान्यवर देखील उपस्थित राहणार आहेत.

# वैयक्तिक खराब फॉर्ममुळे सूर्यकुमार यादवला वगळले

■ मुंबई




निवड समितीचे प्रमुख अजित आगरकरचे वक्तव्य

**बीसीसीआयच्या** निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर यांनी सूर्यकुमार यादवला वगळण्याबाबत मोठे वक्तव्य केले. आज झालेल्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत आगरकर यांनी सांगितले की, सूर्यकुमारला संघातून वगळण्याचा निर्णय घेणे आमच्यासाठी कठीण होता. त्यामागे त्याचा वैयक्तिक खराब फॉर्म हे एक कारण होते. पुढील दोन वर्षांचा विचार करून आम्हाला वाटले की, हा निर्णय संघाच्या भविष्यासाठी अधिक योग्य ठरेल. श्रेयस या संधीचा पूर्णपणे हकदार आहे.

अजित आगरकरने म्हटले की, श्रेयस अय्यरने गेल्या काही वर्षांत विविध फ्रँचायझींचे नेतृत्व करत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याने एका संघाला विजेतेपद मिळवून दिले आणि वैयक्तिक कामगिरीही चांगली राहिली. तो विश्वचषक संघात स्थान मिळवण्याच्या खूप जवळ होता आणि कर्णधारपदासाठी सर्वात तो दावेदार होता.

वैभव सूर्यवंशीबद्दल आगरकर यांनी सांगितले की, वैभवने आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे आम्हाला त्याची निवड करण्यास भाग पाडले. सलग दोन आयपीएल हंगामांत त्याने आपली प्रतिभा सिद्ध केली आहे. मात्र त्याच्यासमोरील पुढे मोठी आव्हाने कठीण असतील, त्याने उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःला सिद्ध केले आहे. तो अजून खूप लहान आहे आणि त्याचा प्रवास नुकताच सुरू झाला आहे. देशांतर्गत हंगाम सुरू झाल्यावर आम्ही त्याचा खेळ पाहू. मात्र सध्या टी-२० संघासाठी काय योगदान देऊ शकतो, यावर आमचे लक्ष आहे.

# शिवकुमार मंत्रिमंडळातून नाराज मंत्र्याचा दुसऱ्याच दिवशी राजीनामा

■ बंगळुरू



**कर्नाटकात** ३ दिवसांपूर्वी स्थापन झालेल्या डी.के. शिवकुमार सरकारमधील जलसंपदा मंत्री रामलिंगा रेड्डी यांनी आज राजीनामा दिला. मुख्यमंत्री शिवकुमार यांनी कालच मंत्र्यांचे खातेवाटप केले होते. मात्र, आपल्या मनासारखे खाते न मिळाल्याने नाराज रेड्डी यांनी दुसऱ्याच दिवशी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

रेड्डी यांना बंगळुरु विकास खाते हवे होते, परंतु त्यांना जलसंपदा खाते देण्यात आले होते. रेड्डी यांनी पत्रकारांना सांगितले की, मी मंत्रिपदाचा राजीनामा दिला असला तरी अजूनही काँग्रेसमध्येच आहे. मी पक्षाचा राजीनामा दिलेला नाही. ५३ वर्षांत अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.कधीही कोणाकडे मंत्रीपद मागितले नाही.

रेड्डी यांच्या राजीनाम्याबाबत शिवकुमार म्हणाले की, जलसंपदा विभागात खूप प्रवास करावा लागणार असल्याने काम करता येणार नाही, असे त्यांना वाटत आहे. त्यांना दुसरे खाते हवे आहे. मी त्यांच्याशी यावर बोलून हा प्रश्न सोडवेन.

# इंडिगोची सहा आंतरराष्ट्रीय उड्डाणे १ जुलैपासून तात्पुरती बंद

■ मुंबई

**देशातील** सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोने आपल्या आंतरराष्ट्रीय नेटवर्कमध्ये महत्त्वपूर्ण बदल करत सहा परदेशी मार्गावरील उड्डाणे तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. कमी होत असलेली प्रवासी संख्या, वाढता ऑपरेशनल खर्च आणि आंतरराष्ट्रीय हवाई क्षेत्रावरील निर्बंध यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. इंडिगोकडून १ जुलैपासून मलेशियातील लंगकावी, थायलंडमधील क्राबी, व्हिएतनाममधील हो ची मिन्ह सिटी, तसेच चीनमधील हाँगकाँग आणि शांघाय या मार्गावरील उड्डाणे बंद करण्यात येणार आहेत. याशिवाय कंबोडियातील सीएम रीप मार्गावरील सेवा ३ जुलैपासून स्थगित केली जाणार आहे. कंपनीच्या माहितीनुसार, या सर्व मार्गावरील उड्डाणे ३० सप्टेंबरपर्यंत बंद राहणार आहेत. आगामी तिमाहीत आंतरराष्ट्रीय प्रवासाची मागणी तुलनेने कमी राहण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# फ्रँकफर्ट विमानतळावर पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या बोईंगचा अपघात

■ फ्रँकफर्ट



**जर्मनीतील** फ्रँकफर्ट विमानतळावर पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या लुफ्थांसा एअरलाइन्सच्या बोईंग ७८७-९ ड्रीमलाइनर विमानाला अपघात झाला. विमानाचे नोज लँडिंग गिअर अचानक निकामी झाल्याने विमानाचा पुढील भाग थेट जमिनीवर आदळला. या दुर्घटनेत काही कर्मचारी जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही घटना काल दुपारच्या सुमारास डिपार्चर गेटजवळ घडली. संबंधित विमान फ्रँकफर्टहून लॉस एंजेलिसकडे रवाना होणार होते. उड्डाणासाठी अंतिम तयारी सुरू असतानाच नोज लँडिंग गिअर अनपेक्षितपणे आत ओढले गेल्याने विमान पुढे झुकले आणि त्याचा पुढील भाग जमिनीवर आदळला. अपघातावेळी विमानात प्रवासी नव्हते. मात्र, क्रू मेंबर्स आणि ग्राउंड स्टाफ विमानात तसेच परिसरात उपस्थित होते. या घटनेत काही कर्मचारी जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच विमानतळावरील आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. जखमींना मदत करण्यात आली. तसेच परिसर सुरक्षित करण्यात आला. लुफ्थांसा एअरलाइन्सने जखमी कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू असल्याची माहिती दिली आहे. विशेष म्हणजे, अपघातग्रस्त बोईंग ७८७-९ ड्रीमलाइनर हे तुलनेने नवीन विमान असून जानेवारी २०२६ पासूनच नियमित सेवेत दाखल करण्यात आले होते.

देश विदेश

# गुगलने आणखी काही कर्मचाऱ्यांना कमी केले

■ वॉशिंग्टन

**कृत्रिम** बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानामध्ये गुंतवणूक वाढवत चाललेल्या गुगलने मागील दोन आठवड्यात आणखी अनेक कर्मचाऱ्यांना फारसा गाजावाजा होऊ न देता कामावरून कमी केले आहे.

गुगलच्या सुरक्षा विभागातील सर्वात अव्वल स्थानी असलेल्या थ्रेट इंटेलिजन्स ग्रुपमधील कर्मचाऱ्यांचा मागील दोन आठवड्यांत कमी करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये समावेश आहे. त्याचबरोबर २०२२ मध्ये विकत घेतलेल्या मॅन्डियंट या कंपनीतही गुगलने मोठी कामगार कपात सुरू केली आहे. एआयच्या आगमनामुळे जगभरातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर अशाप्रकारे बेरोजगारीची नामुष्की येऊ लागली आहे.

# टेराडाटा कंपनीने 'एआय'मुळे कर्मचाऱ्यांना पगारवाढ दिली नाही

■ न्यूयॉर्क

**कृत्रिम** बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील क्लाउड सॉफ्टवेअर कंपनी टेराडाटाने २०२६ सालासाठीची कर्मचाऱ्यांची वार्षिक पगारवाढ न देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निधी एआय तंत्रज्ञानातील गुंतवणुकीसाठी वळवण्यात येणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्टीव्ह मॅकमिलन यांनी कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या अंतर्गत संदेशात सांगितले की, वेगाने बदलणाऱ्या एआय बाजारपेठेत स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे यंदा वेतनवाढीसाठी राखून ठेवलेला निधी संशोधन, उत्पादन विकास आणि तज्ज्ञ मनुष्यबळासाठी वापरण्यात येणार आहे. या निर्णयाचा परिणाम कंपनीतील ५,१०० कर्मचाऱ्यांवर होणार आहे. टेराडाटा कंपनीत दरवर्षी साधारण २ ते ४ टक्के पगारवाढ दिली जात होती.

# नीलकंठ मिश्रा वर्ल्ड बँकेत भारताचे कार्यकारी संचालक

■ नवी दिल्ली




**प्रसिद्ध** अर्थशास्त्रज्ञ नीलकंठ मिश्रा यांची वर्ल्ड बँकेत भारताचे कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने त्यांच्या नावाला मंजुरी दिली आहे. ते वॉशिंग्टन येथे तीन वर्षांच्या कालावधीसाठी भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. मिश्रा हे सध्याचे कार्यकारी संचालक परमेश्वरन अय्यर यांची जागा घेणार आहेत. ते पदभार स्वीकारेपर्यंत अय्यर यांचा कार्यकाळ वाढवण्यात आला आहे.

कार्यकारी संचालक म्हणून मिश्रा वर्ल्ड बँकेच्या संचालक मंडळावर भारताचे प्रतिनिधित्व करतील. हे मंडळ कर्जवाटप, विकास प्रकल्प आणि आर्थिक धोरणांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेत असते. त्यामुळे हे पद भारताच्या आर्थिक मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते. नीलकंठ मिश्रा सध्या ॲक्सिस बँकेचे मुख्य अर्थशास्त्रज्ञ असून ॲक्सिस कॅपिटलमध्ये ग्लोबल रिसर्चचे प्रमुख आहेत. यापूर्वी त्यांनी क्रेडिट सुइसमध्ये दीर्घकाळ काम करत त्यांनी विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. तसेच ते पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे अर्धवेळ सदस्यही आहेत. विविध सरकारी समित्यांमध्येही त्यांनी काम केले आहे. वर्ल्ड बँक ग्रुपमध्ये २५ कार्यकारी संचालक असतात, जे १८९ सदस्य देशांचे प्रतिनिधित्व करतात. भारताच्या प्रतिनिधीकडे सहसा काही शेजारी देशांचाही कार्यभार असतो.

# रत्नागिरीतील कोयना पूल लवकरच वाहतुकीस खुला

■ रत्नागिरी



**खेडजवळ** उभारण्यात आलेला कोयना पूल लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार आहे. यामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील संपर्क आणखी मजबूत होणार आहे.

आतापर्यंत डोंगरांगा, घाटमार्ग आणि कोयना जलाशयामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या दोन भागांमधील थेट संपर्क मर्यादित होता. त्यामुळे प्रवाशांना मोठा वळसा घेऊन प्रवास करावा लागत असे. मात्र आता कोयना पूल पूर्ण झाल्यानंतर हे चित्र पूर्णपणे बदलणार आहे. १७५ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेला हा भव्य पूल कोयना जलाशयाच्या बॅकवॉटरवर बांधण्यात आला. ५४० मीटर लांब आणि १४ मीटर रुंद असलेल्या या पुलामुळे खेड-महाबळेश्वर मार्गावरील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सोयीस्कर होणार आहे. आजपर्यंत महाबळेश्वर किंवा सातारा भागातून कोकणात जाणाऱ्या वाहनांना आंबेनळी घाटाचा लांबचा मार्ग वापरावा लागत होता. मात्र कोयना पूल सुरू झाल्यानंतर खेड आणि महाबळेश्वरमधील अंतर जवळपास ५० किलोमीटरने कमी होणार आहे.

# मराठा-कुणबी मंत्रालयाला मुख्यमंत्र्यांची मान्यता

■ जालना **जरांगेंचा दावा**

**मराठा** -कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली आहे,असा दावा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी आज केला. मराठा समाजाला ओबीसी समाजाप्रमाणे सुविधा देण्याबाबत सरकारने निर्णय घेतल्यानंतर जरांगे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, सरकार मराठा समाजाच्या मागण्यांकडे लक्ष देत आहे, ही चांगली बाब आहे. काही निर्णय घेण्यात आले आहेत, तर काही निर्णय अद्याप प्रलंबित आहेत. मात्र, जे निर्णय झाले आहेत त्याबद्दल मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानतो

# सुनियोजन करून अंमलबजावणी केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील

**महापारेषण अध्यक्षांच्या कर्मचाऱ्यांना सूचना**

■ मुंबई



**महापारेषणच्या** अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २० वर्षांत चांगले काम केले आहे. आता ऊर्जा संक्रमणामध्ये राईट ऑफ वे, हवामान बदल आणि अक्षय ऊर्जेसाठी काम करावे लागणार आहे. यासाठी अधिकाऱ्यांनी सुनियोजन करून अंमलबजावणी केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे (महापारेषण) अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी केले.

वांद्रे येथील प्रकाशगंगा इमारतीत महापारेषणचा २१ वा वर्धापनदिन दूरदृश्य प्रणालीव्दारे उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजिलेल्या राज्यस्तरीय पारितोषिक वितरण समारंभात डॉ. संजीव कुमार बोलत होते. संजीव कुमार म्हणाले, महापारेषणचे राज्यात चांगले काम सुरू आहे. तांत्रिक मुद्यापेक्षा राईट ऑफ वे मुळे प्रकल्प प्रलंबित राहत आहेत. त्यासाठी अधिकाऱ्यांनी सर्वांशी संवाद वाढविला पाहिजे. विशेतः प्रकल्पांच्या कामात सुनियोजन केल्यास प्रकल्प वेळेत पूर्ण होतील.

# विनय आपटेंच्या ७५ व्या जयंतीनिमित्त १७ जूनला एकांकिका महोत्सव

■ ठाणे



**दिवंगत** अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते विनय आपटे यांच्या ७५ व्या जयंतीनिमित्त विनय आपटे प्रतिष्ठानतर्फे विशेष एकांकिका महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १७ जून रोजी रात्री ८ वाजता ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे हा महोत्सव रंगणार असून, राज्यातील विविध स्पर्धांमध्ये गाजलेल्या दोन पुरस्कारप्राप्त एकांकिकांचे सादरीकरण यावेळी करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या महोत्सवात विलेपार्ले येथील म.ल.डहाणूकर महाविद्यालयाची 'जब वी मेट' ही एकांकिका सादर होणार आहे. सवाई एकांकिका स्पर्धा, मृणालताई करंडक, स्पंदन एकांकिका स्पर्धा आणि लोकांकिका यांसारख्या प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये या एकांकिकेने प्रथम क्रमांकासह विविध पुरस्कार पटकावले आहेत. महोत्सवातील दुसरी एकांकिका ठाण्यातील जोशी-बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाची मढ निघालय अनुदानाला ही आहे. आयएनटी, अटल करंडक, रंगायतन करंडक, कोकण चषक आणि अमर हिंद एकांकिका स्पर्धेसह अनेक नामांकित स्पर्धांमध्ये या एकांकिकेने विविध पारितोषिके मिळवली आहेत.

# गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता कामातील मोठा अडथळा दूर

■ मुंबई

**पूर्व** आणि पश्चिम उपनगरांना जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता प्रकल्पाच्या मार्गातील मोठा अडथळा दूर करत मुंबई महापालिकेने मुलुंडमधील अमर नगर आणि खिंडीपाडा परिसरातील एकूण २३४ अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.

या कारवाईमुळे प्रकल्पाचा मार्ग मोकळा होऊन कामाला गती आली आहे. या गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्याची एकूण लांबी १२.२० किलोमीटर इतकी आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम एकूण चार वेगवेगळ्या टप्प्यांत पूर्ण केले जाणार आहे. यामध्ये प्रशस्त रस्ता, भूमिगत बोगदा आणि उड्डाणपूल अशा मोठ्या कामांचा समावेश आहे. मात्र,'टी' विभागाच्या हद्दीत येणाऱ्या अमर नगर आणि खिंडीपाडा परिसरातील सुमारे ३८४ बांधकामांमुळे या रस्त्याच्या कामात मोठा अडथळा निर्माण होत होता. हा अडथळा दूर करण्यासाठी पालिकेने काही दिवसांपूर्वीच पावले उचलण्यास सुरुवात केली होती.

अडथळा ठरणाऱ्या या ३८४ बांधकामांपैकी सुमारे १५० व्यावसायिक आणि रहिवासी बांधकामे गेल्याच आठवड्यात हटवण्यात आली होती. त्यानंतर आता उरलेल्या २३४ बांधकामांवर काल शुक्रवारी पालिकेने थेट हातोडा चालवून ही जागा पूर्णपणे खुली केली आहे. ही मोठी कारवाई परिमंडळ-६ च्या उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक आयुक्त योगिता कोल्हे यांच्या थेट नेतृत्वाखाली पार पडली. कारवाई दरम्यान कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

# घणसोलीत इमारतीला आग

**नवी मुंबई** - नवी मुंबईतील घणसोली सेक्टर २१ परिसरातील कुबेर अपार्टमेंट या निवासी इमारतीला भीषण आग लागली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. इमारतीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील घरांना आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन जवानांनी रात्री उशिरा आग विझवली.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the society has received an application of transfer of membership and share certificate number 1 (Distinctive shares 1 to 10) from Mr Footermal B Mehta to Mr Mohamed Amin Furniturewala for godown 1A, Gr floor, New Saqlainia tower co-operative housing society ltd.

The society hereby invites claims or objections (in writing) for transfer of membership and share certificate within the period of 30 days from the publication of this notice. If no claims/objections are received during this period the society shall be free to transfer the membership and share certificate.

For and on behalf of
New Saqlainia Tower Co-operative
Housing Society Ltd
(Hon. Secretary).

Date : 07-06-2026
Place : Mumbai

# नाफेड व एनसीसीएफकडून थेट बाजार समित्यांमधून कांदा खरेदी

**कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा**

■ नाशिक

**कांदा** उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत, नाफेड आणि एनसीसीएफ या संस्थांकडून आता थेट कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कांदा खरेदी केली जाणार आहे. हा निर्णय नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जिल्हा प्रशासन, नाफेड, एनसीसीएफ आणि बाजार समित्यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या निर्णयानुसार येत्या सोमवारपासून, म्हणजेच ८ जूनपासून नाशिक जिल्ह्यातील विविध बाजार समित्यांमध्ये थेट खरेदी प्रक्रिया सुरू होणार आहे. नाफेड आणि एनसीसीएफकडून कांद्याला प्रतिक्विंटल १,५८० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. शासकीय यंत्रणांकडून थेट खरेदी सुरू झाल्याने खुल्या बाजारातील दरात सुधारणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांकडून नाफेड आणि एनसीसीएफने थेट बाजार समित्यांमध्ये खरेदी करावी, अशी मागणी करण्यात येत होती.

# टीसीएस प्रकरणात धर्मांतरासाठी तारिक जमीलच्या व्हिडिओंचा वापर

■ नाशिक

**नाशिकमधील** टीसीएस कंपनीशी संबंधित कथित धर्मांतर आणि महिला अत्याचार प्रकरणातील तपासाला वेग आला असून न्यायालयात सादर करण्यात आलेल्या आरोपपत्रातील काही दाव्यांमुळे या प्रकरणाची पुन्हा चर्चा सुरू झाली. पीडितांपैकी एका महिलेने दिलेल्या जबाबानुसार, तिच्यावर धार्मिक प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यासाठी इस्लामी धर्मोपदेशक तारिक जमील व झाकीर नाईक यांचे व्हिडिओ दाखविण्यात आल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला.

आरोपपत्रानुसार, ही संपूर्ण घटना पूर्वनियोजित कटाचा भाग असल्याचा तपास यंत्रणांचा आरोप आहे. पीडित महिलेने दिलेल्या जबाबात तिला विशिष्ट धार्मिक विचार स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करण्याचा प्रयत्न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच भजन ऐकू नये, मंदिरात जाऊ नये आणि 'अल्लाह सर्व पापे माफ करेल' अशा प्रकारची विधाने करण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणातील नऊ गुन्ह्यांची सुनावणी मंगळवारपासून नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात सुरू होणार आहे.

**दस्तऐवज हरवले आहेत**

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, नव श्याम सदन को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड ("संस्था"), भूखंड क्र. ३८, रस्ता क्र. २, सीटीएस क्र. ६५९ए, पेस्तोम सागर, टिळक नगर, चेंबूर, मुंबई - ४०००८९ ("मालमत्ता") यांचे सदर मालमत्तेच्या संदर्भातील खालील मूळ शीर्षक दस्तऐवज हरवले/गहाळ झाले आहेत आणि अत्यंत परिश्रमपूर्व शोध घेऊनही ते सापडत नाहीत:-

१) एचएच फॉर्म दिनांक २९.०४.१९४८ के के फॉर्म २) अभिहस्तांतरण करारनामा दिनांक ११.१२.१९६२ ३) अभिहस्तांतरण करारनामा दिनांक ०४.०७.१९६४, ४) दि. ०५.०२.१९६५ रोजीचे करारपत्र, ५) करारनामा दिनांक १३.११.१९६५, ६) विक्री करारनामा दिनांक १८.०६.१९७०, ७) अभिहस्तांतरण करारनामा दिनांक ०२.०४.१९७१, ८) गहाणखत करारनामा दिनांक ०२.०४.१९७१. संस्थेचे अध्यक्ष यांनी त्याकरिता टिळक नगर पोलीस स्टेशनकडे अ-दखलपात्र तक्रार दाखल केली आहे.

अध्यक्षांनी पुष्टी केली आहे की, हरवलेले दस्तऐवज हरवले आणि/किंवा गहाळ झाले आहेत आणि संस्थेद्वारे अत्यंत परिश्रमपूर्वक शोध घेऊन देखील सापडत नाहीत आणि अशा हरवलेल्या दस्तऐवजांच्या हरवल्या/गहाळ झाल्याची नोंद अध्यक्षांद्वारे टिळकनगर पोलीस स्टेशनमध्ये गहाळ अहवाल क्र. ४७९३४/२०२६ या दि. १२ मे, २०२६ रोजीच्या तक्रारीद्वारे केली आहे. अध्यक्षांनी अशीही पुष्टी केली आहे की, संस्थेने असे कोणतेही गहाळ दस्तऐवज कोणत्याही व्यक्ती, बँक किंवा वित्तीय संस्थेकडे तारण किंवा अन्य कशासाठीही जमा केलेले नाहीत. सर्व व्यक्तींना याद्वारे सूचित करण्यात येते की, गहाळ दस्तऐवजांच्या आधारे किंवा त्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्ती किंवा व्यक्तींसह कोणताही व्यवहार करू नये. जर कोणी यापूर्वीच केला असेल किंवा मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाविरुद्ध किंवा संदर्भात गहाळ दस्तऐवजांच्या आधारे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हिस्सा, दावा किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी त्याबाबत मला सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह याखाली नमूद केलेल्या पत्ता आणि ईमेल-आयडीवर येथील दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करण्याची विनंती करण्यात येत आहे. असे न केल्यास, अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा किंवा दावे, जर असल्यास, सर्व हेतू आणि कारणांकरिता सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि कसल्याही प्रकारच्या कोणत्याही पद्धतीने बंधनकारक नसतील आणि माझ्या अशिलाद्वारे मालमत्तेच्या संबंधातील व्यवहार पूर्ण करण्यात येईल.

सही/-
ॲडव्होकेट दिवाकर द्विवेदी
दिनांक ७ जून, २०२६
००२, जयश्री सदन, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९
मोबाईल क्र. ९८२१०८९९०० । ईमेल: adv.diwakardwivedi@gmail.com

# राणी बागेतील पर्यटकांसाठी आता ९ आसनी इलेक्ट्रिक बग्गी

■ मुंबई

भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालय अर्थात राणी बाग येथे पर्यटकांसाठी ९ आसनी इलेक्ट्रिक बग्गी सुरू करण्यात आली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि दिव्यांग पर्यटकांना बागेचा सहज व आरामदायक फेरफटका मारता यावा, यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच लहान मुलांसाठी १५ आसनी डबलडेकर बस व बांबूपासून बनवलेले बॅरिकेडस तयार करण्यात आले आहेत. या सुविधेमुळे पर्यटकांना चालण्याचा त्रास न होता बागेतील सर्व प्राणी आणि विस्तीर्ण निसर्गाचा आनंद घेता येईल. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पालिकेतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचा एक भाग म्हणून सुविधा सुरू केली आहे. या सुविधांचे लोकार्पण नुकतेच महापौर रितू तावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# चर्चगेट स्थानकावर प्रवाशांसाठी विशेष मोफत वाचनालय सुरू

■ मुंबई

**प्रवाशांचा** प्रवास आनंददायी आणि वाचनाची सवय वाढवण्यासाठी पश्चिम रेल्वेने 'प्रकल्प मुंबई' च्या सहकार्याने चर्चगेट रेल्वे स्थानकावर 'लायब्ररी जंक्शन' नावाचे विशेष मोफत वाचनालय सुरू केले आहे. या वाचनालयाचे उद्घाटन जागतिक पर्यावरण दिनानिमित्त चर्चगेट स्टेशनच्या साऊथ कॉनकोर्स परिसरात दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू आणि कर्णधार एबी डिव्हिलियर्सच्या हस्ते रेल्वे आणि पालिका अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

हे वाचनालय सोमवार ते शनिवार सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत खुले राहणार असून, रविवारी बंद राहील. याठिकाणी लहान मुलांच्या पुस्तकांपासून ते कादंबऱ्या, आत्मचरित्रे आणि मॅगझिनपर्यंत सुमारे १२०० पुस्तके उपलब्ध आहेत. ही पुस्तके मराठी, हिंदी, इंग्रजी आणि गुजराती या चार भाषांमध्ये आहेत.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळवण्यात येते की, नेरळ, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील जुन्या सर्वे क्रमांक २४९/१B, २९८/0, ३१२/0, ३१४/२, ३१५/0, ३१६/३ आणि ३१६/५ आणि नवीन सर्वे क्रमांक २१७/५, २१७/३, २१६, २१३, २१५/२ आणि आनंदवाडी सर्वेक्षण क्रमांक ५६/१/b/१ आणि ९६ सध्या कायदेशीर वादामध्ये (litigation) आहे. सदर मालमत्तेच्या मालकाने दिनांक ३० जुलै २०२४ रोजीच्या कायदेशीर नोटिस द्वारे, विकास करार (नोंदणी क्रमांक KJA ३००८/२०१३/४/१०१) आणि कै. जितेंद्र देवीप्रसाद परदेशी यांनी दिलेले मुखत्यारपत्र (नोंदणी क्रमांक KJA ३००९/२०१३/१/३८) हे दोन्ही रद्द केले आहेत. हे प्रकरण सध्या 'रेरा' (RERA) न्यायालयासमोर प्रलंबित असून, तक्रार क्रमांक "CC१२४००२०४'' असा आहे. तसेच, Commencement Certificate-CC रद्द करण्याबाबत 'म्हाडा' (MHADA) कडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, पंतप्रधान कार्यालय (PMO), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (Anti-Corruption Bureau of Investigation) आणि महाराष्ट्र लोकआयुक्तांकडेही तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. विकासक 'Sarah Builder and Developer Pvt. Ltd., हे या प्रकल्पाची जाहिरात GREEN CITY, NERAL, PEHLA GHAR LOTTERY", "PROJECT UNDER PRADHAN MANTRI AWAS YOJANA" आणि "SARAH GREEN CITY" या नावांनी करत आहेत; तसेच हा प्रकल्प 'रेरा'(RERA) अंतर्गत नोंदणीकृत असून, त्याचा प्रकल्प क्रमांक "P५२०००००५५७०६'' असा आहे. या मालमतेसंदर्भात कोणत्याही व्यक्तीने कोणतेही व्यवहार किंवा उलाढाली केल्यास, त्या त्यांनी स्वत:च्या जोखमीवर कराव्यात; कारण सदर प्रकल्प कायदेशीर वादामध्ये मोडत आहे.

दिनांक : ०७/०६/ २०२६

DIPALI R. SHINDE (B.L.S.LL.B.)
ADVOCATE HIGH COURT & NOTARY
Uma Kedar, Neral Road, Kiravali, Tal. Karjat-Raigad, 410201.
Mob : 9011716001/9561719494

**शीर्षकाचा शोध**

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, **नव श्याम सदन को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड** (सदर संस्था) याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेचे ("सदर मालमत्ता") एकमेव आणि संपूर्ण मालक आणि योग्य आणि पुरेसे हक्कदार आहेत. माझ्या अशिलांनी मला सदर मालमत्तेच्या शीर्षकाची तपासणी करण्याचे आणि शीर्षक प्रमाणपत्र पारित करण्याकरिता जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर मालमत्तेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, भेट, न्यास, प्रभार, देखभाल, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार या मार्गे किंवा अन्यथा कोणत्याही स्वरुपाचा कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना त्याबाबत लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना येथील दिनांकापासून १४ दिवसांच्या आत याखाली उल्लेखिलेल्या पत्त्यावर सूचित करण्याची याद्वारे विनंती करण्यात येत आहे. असे न केल्यास अशा व्यक्तीचा दावा सोडून दिला आणि/किंवा त्याग केला किंवा माफ केला असे समजण्यात येईल आणि तो त्यानंतर विचारात घेण्यात येणार नाही.

**वरील उल्लेखित मालमत्तेची अनुसूची**

मुंबई शहर आणि मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील गाव-चेंबूर, तालुका-चेंबूर, एम.एस.डी. चा सीटीएस क्र. ६५९ए धारण केलेल्या आणि शीर्षक करारनाम्यानुसार मोजमाप १४५९.८० चौरस मीटर्स किंवा साधारण तेवढेच आणि मालमत्ता कार्डनुसार १४३४.८० चौ.मी. जमिनीचे सर्व खंड किंवा तुकडे, व त्यासह सीटीएस क्र. ६५९ए, भूखंड क्र. ३८, रस्ता क्र. २, पेस्तोम सागर, टिळक नगर, चेंबूर, मुंबई-४०००८९ येथे वसलेल्या असलेल्या आणि स्थित "नव श्याम सदन सीएचएसएल" ही त्यावर उभी २ विंग असलेली एक इमारत. आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे म्हणजेच,

पूर्वेस किंवा त्या दिशेने: शासकीय जमीन
पश्चिमेस किंवा त्या दिशेने: रस्ता क्र. २, पेस्तोम सागर
उत्तरेस किंवा त्या दिशेने: भूखंड क्र. ३७
दक्षिणेस किंवा त्या दिशेने: भूखंड क्र. ३९

सही/-
ॲडव्होकेट दिवाकर द्विवेदी
दिनांक ७ जून, २०२६
००२, जयश्री सदन, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९
मोबाईल क्र. ९८२१०८९९०० । ईमेल: adv.diwakardwivedi@gmail.com

शहरीकरणाच्या वेगवान प्रक्रियेमध्ये भारतातील शहरांचा विस्तार अवाढव्य पद्धतीने होत आहे. उंचच उंच इमारती, आधुनिक पायाभूत सुविधा आणि आर्थिक प्रगतीची चकचकीत रूपे डोळे दिपवणारी असली, तरी या विकासाच्या गर्द छायेत सुरक्षेचे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. अलिकडच्या काळात देशातील विविध प्रमुख शहरांमध्ये घडणाऱ्या आगीच्या भीषण दुर्घटना आपल्या संपूर्ण नागरी नियोजन प्रणालीतील गंभीर त्रुटींचे निदर्शक आहेत. देशाची राजधानी असणाऱ्या दिल्लीमध्ये घडलेल्या अग्निकांडाने २२ जणांचा बळी घेतला. यामध्ये परदेशी नागरीकही होते ही अधिक चिंताजनक बाब आहे. सरकार, प्रशासन, स्थानिक संस्था आणि नागरीक या सर्वच पातळ्यांवर सुरक्षेविषयीचा बेजबाबदारपणा असेल तर असे अग्निकांड टळणार कसे?

# अग्निसुरक्षेबाबतच्या अनास्थेचा परिपाक



शहरीकरणाच्या वेगवान प्रवासात आज आपली शहरे टोलेजंग इमारतींनी आणि आधुनिक सोयी-सुविधांनी नटलेली दिसत असली, तरी या चकाकीला सुरक्षिततेचे कोंदण आहे का, याचा विचारही आपण करत नाही. अलिकडच्या काळात देशातील विविध भागांत घडणाऱ्या दुर्घटनांवर नजर टाकल्यास एक गोष्ट प्रकर्षाने समोर येते, ती म्हणजे अनियोजित बांधकाम हे थेट मानवी जिवावर उठले आहे. शहरी भागातील अनिर्बंध बेकायदेशीर आणि सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवून केलेले बांधकाम आज मोठ्या अपघातांना उघडपणे आमंत्रण देत आहे.

राष्ट्रीय राजधानी दिल्लीसह देशातील अनेक मोठ्या शहरांमध्ये अशा अनियोजित विकासामुळे शेकडो निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. नुकतीच दिल्लीतील मालवीय नगर भागातील 'फ्लरिश स्टे' हॉटेलमध्ये लागलेली भीषण आग हे याचे ताजे आणि अत्यंत धक्कादायक उदाहरण आहे. या एकाच दुर्घटनेत तब्बल २१ लोकांचा होरपळून मृत्यू झाला, ज्यात १७ परदेशी नागरिकांचा समावेश होता. या घटनेच्या अवघ्या दोन दिवस आधी एक इमारत कोसळून ६ लोकांचा मृत्यू झाला होता. गेल्या अवघ्या सहा महिन्यांच्या आकडेवारीचा विचार केला, तर एकट्या दिल्लीत अशा दुर्घटनांमुळे ७० हून अधिक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. हे आकडे केवळ संख्या नसून, प्रशासकीय अनास्था आणि मानवी हव्यासापोटी उद्ध्वस्त झालेली कुटुंबे आहेत.



**सूर्यकांत पाठक,**
राष्ट्रीय सदस्य, अ.भा. ग्राहक पंचायत

मालवीय नगरमधील हॉटेलला लागलेल्या आगीला अकस्मात घडलेली दुर्घटना मानणे घोडचूक ठरेल. वास्तविक पाहता, हे आपल्या संपूर्ण प्रशासकीय व्यवस्थेतील, गृहनिर्माण प्रणालीतील आणि सुरक्षा यंत्रणेतील गंभीर दोषांचे आणि वर्षानुवर्षे साचलेल्या ढिसाळपणाचे भेदक प्रदर्शन आहे. सर्वात संतापजनक आणि विचार करायला लावणारी बाब म्हणजे, ज्या हॉटेलमध्ये ही एवढी मोठी दुर्घटना घडली आणि जिथे परदेशी पाहुणे मुक्कामास होते, त्या हॉटेलकडे अग्निशमन दलाचे साधे ना-हरकत प्रमाणपत्र म्हणजेच 'फायर एनओसी' देखील नव्हते. अत्यंत आवश्यक असलेली सुरक्षा प्रमाणपत्रे नसतानाही अशी व्यावसायिक प्रतिष्ठाने भरवस्तीत आणि प्रशासनाच्या नाकाखाली वर्षानुवर्षे कशी सुरू राहू शकतात, हा खरा कळीचा मुद्दा आहे. कारण संबंध देशभरात अशा प्रकारची स्थिती आहे. यातून आपली तपासणी यंत्रणा आणि स्थानिक प्रशासन किती सुस्त आणि भ्रष्ट आहे, हे उघड होते. आज ही समस्या केवळ दिल्लीपुरती मर्यादित राहिलेली नाही. मुंबई, हरियाणा, नागपूर आणि आंध्र प्रदेश यांसारख्या आर्थिक आणि औद्योगिकदृष्ट्या प्रगत समजल्या जाणाऱ्या राज्यांमध्ये आणि शहरांमध्येही अशाच प्रकारच्या अनियोजित बांधकामांचे आणि दुर्घटनांचे सत्र सातत्याने सुरू आहे.

शहरांची लोकसंख्या कमालीच्या वेगाने वाढत आहे, तशी जमिनीची उपलब्धता अत्यंत मर्यादित होत चालली आहे. या मर्यादित जागेतून जास्तीत जास्त आर्थिक नफा कमावण्याच्या अस्वस्थ आणि आंधळ्या शर्यतीमुळे सर्व नियम आणि कायदे केवळ कागदावरच मर्यादित राहिले आहेत. विकासक, बिल्डर्स आणि घरमालक यांच्या नफेखोरीच्या वृत्तीमुळे शहरांमध्ये अनेक मजली इमारती तर उभ्या राहत आहेत, परंतु त्या इमारतींमधील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था मात्र पूर्णपणे कोलमडलेली पाहायला मिळते. अनेक इमारतींमध्ये आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध नसतात. अनेक ठिकाणी बसवलेली अग्निशमन यंत्रे निकामी झालेली असतात, तर काही ठिकाणी आग विझवण्यासाठी आवश्यक असलेल्या पाण्याची पुरेशी साठवणूक आणि व्यवस्था नसते. जोपर्यंत सर्व काही सुरळीत चालू असते, तोपर्यंत या गंभीर त्रुटी कोणाच्याही लक्षात येत नाहीत किंवा त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते. परंतु, जशी एखादी दुर्दैवी घटना किंवा अपघात घडतो, तेव्हा या अक्षम्य चुकांची आणि निष्काळजीपणाची किंमत निष्पाप नागरिकांना स्वतःच्या जिवाने मोजावी लागते. ज्या इमारतींनी मानवी सुरक्षेच्या मानकांचे काटेकोरपणे पालन करणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे, त्या इमारती आज स्वतःच धोक्याचे आणि मृत्यूचे मुख्य केंद्र बनल्या आहेत, हा अत्यंत मोठा विरोधाभास आहे.

या संपूर्ण समस्येमध्ये आणखी एक अत्यंत चिंतेची बाब म्हणजे आपल्या अग्निशमन दलाची मर्यादित क्षमता आणि संसाधनांची कमतरता ही आहे. आजकाल शहरांमध्ये १०, १५ आणि अगदी २० मजल्यांपेक्षा अधिक उंचीच्या टोलेजंग इमारती उभारल्या जात आहेत. परंतु, त्या तुलनेत आपल्या अग्निशमन दलाची सज्जता अत्यंत तोकडी आहे. अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये अग्निशमन दलाकडे केवळ चार ते पाच मजल्यांपेक्षा जास्त उंचीवर पोहोचू शकतील अशा आधुनिक हायड्रॉलिक प्लॅटफॉर्म गाड्या किंवा स्कायलिफ्ट उपलब्ध नाहीत. जेव्हा एखाद्या बहुमजली इमारतीमध्ये आग वेगाने पसरते, तेव्हा तिथले बचाव कार्य हे थेट काळाशी आणि वेळेशी चाललेली एक अत्यंत कठीण लढाई ठरते. अशा बिकट परिस्थितीत शहरातील अरुंद गल्ल्या, बेशिस्त आणि अस्ताव्यस्त पार्किंग आणि रस्त्यांवर झालेले अवैध बांधकाम या बचाव कार्यात मोठे अडथळे निर्माण करतात. यामुळे अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळापर्यंत वेळेत पोहोचू शकत नाहीत आणि जोपर्यंत त्या पोहोचतात, तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो आणि जीवितहानी टाळणे अशक्य होते. या संपूर्ण अराजकाची आणि निष्काळजीपणाची जबाबदारी केवळ सरकारी यंत्रणा किंवा प्रशासनावर ढकलून सामान्य नागरिकांना मोकळे होता येणार नाही. कारण यात सामान्य नागरिक आणि घरमालक यांचीही जबाबदारी तितकीच मोठी आहे.

गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण हा प्रत्येक बालकाचा घटनात्मक अधिकार आहे. शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेचे केंद्रबिंदू असल्यामुळे त्यांची गुणवत्ता सुनिश्चित करणे ही राज्याची जबाबदारी आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सेवेत असलेल्या शिक्षकांना पात्रता परीक्षेतून सवलत देण्याची मागणी अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केली आहे. परिणामी देशातील सुमारे २५ लाख शिक्षकांसमोर आता अभ्यास करून परीक्षा उत्तीर्ण होण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय उरलेला नाही. या निर्णयाचे शिक्षण व्यवस्थेवर, शिक्षकांच्या सेवाशर्तींवर आणि पदोन्नती प्रक्रियेवर दूरगामी परिणाम होणार आहेत. 'परीक्षा उत्तीर्ण नाही तर पदोन्नती नाही' हे तत्त्व आता जवळपास अंतिम स्वरूपात स्वीकारले गेले आहे.

# शिक्षकांच्या गुणवत्तेची 'परीक्षा'



सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील विविध शिक्षक संघटना आणि राज्य सरकारांनी दाखल केलेल्या पुनर्विचार याचिका फेटाळून सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) अनिवार्य असल्याचा निर्णय कायम ठेवला आहे. या निर्णयामुळे देशातील लाखो शिक्षकांसमोर उभा राहिलेला संभ्रम दूर झाला असला, तरी त्याचवेळी एक नवे आव्हानही निर्माण झाले आहे. न्यायालयाने शिक्षकांना काहीसा दिलासा देताना पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आणखी एका वर्षाची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे देशभरातील प्राथमिक शिक्षकांना ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहणार आहे. मात्र या मुदतवाढीपलीकडे कोणतीही सवलत मिळण्याची शक्यता आता जवळपास संपुष्टात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेशी कोणत्याही परिस्थितीत तडजोड केली जाऊ शकत नाही, हा स्पष्ट संदेश न्यायालयाने या निर्णयातून दिला आहे.

गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण हा प्रत्येक बालकाचा घटनात्मक अधिकार आहे. शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेचे केंद्रबिंदू असल्यामुळे त्यांची गुणवत्ता सुनिश्चित करणे ही राज्याची जबाबदारी आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सेवेत असलेल्या शिक्षकांना पात्रता परीक्षेतून सवलत देण्याची मागणी नाकारण्यात आली. परिणामी देशातील सुमारे २५ लाख शिक्षकांसमोर आता अभ्यास करून परीक्षा उत्तीर्ण होण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय उरलेला नाही. या निर्णयाचे शिक्षण व्यवस्थेवर, शिक्षकांच्या सेवाशर्तींवर आणि पदोन्नती प्रक्रियेवर दूरगामी परिणाम होणार आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ ची देशभरात १ एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्याकडून भारतीय शिक्षण व्यवस्थेत व्यापक परिवर्तनाची अपेक्षा होती. या कायद्याने केवळ विद्यार्थ्यांचे अधिकार निश्चित केले नाहीत, तर शिक्षकांची कर्तव्ये, शाळांच्या जबाबदाऱ्या आणि शिक्षण व्यवस्थेचे निकषही निश्चित केले. शाळांमध्ये आवश्यक असलेल्या किमान भौतिक सुविधा, शाळा व्यवस्थापन समित्या, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा, अभ्यासक्रमाची अंमलबजावणी आणि शिक्षकांची भूमिका यासंदर्भात स्पष्ट तरतुदी करण्यात आल्या. गेल्या १५ वर्षांत या कायद्याची अंमलबजावणी देशभरात विविध स्तरांवर झाली असून त्यासाठी प्रत्येक राज्याने स्वतंत्र नियमावली तयार केली.

या कायद्यांतर्गत राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक प्राधिकरण निश्चित करण्यात आले. शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, प्रशिक्षण आणि व्यावसायिक गुणवत्ता याबाबतचे निकष ठरविण्याची जबाबदारी या प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली. प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी आवश्यक पदवी, पदविका आणि व्यावसायिक पात्रता निश्चित करण्यात आली. त्याचबरोबर इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या शिक्षणाला प्राथमिक शिक्षणाचा एकसंध स्तर मानून देशभरात समान निकष लागू करण्यात आले. याच प्रक्रियेचा भाग म्हणून शिक्षक पात्रता परीक्षा ही शिक्षकांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करणारी राष्ट्रीय पातळीवरील यंत्रणा म्हणून स्वीकारण्यात आली.

सुरुवातीच्या काळात अनेक राज्य सरकारांनी नव्याने भरती होणाऱ्या शिक्षकांसाठी पात्रता परीक्षा अनिवार्य ठेवली. मात्र सेवेत असलेल्या शिक्षकांना त्यातून सूट देण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातही अशीच भूमिका घेण्यात आली होती. सुरुवातीला नव्याने भरती होणारे आणि सेवेत असलेले अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षकांसाठी पात्रता परीक्षा अनिवार्य करण्याचा निर्णय झाला. परंतु शिक्षक संघटनांच्या दबावानंतर सेवेत असलेल्या शिक्षकांना सवलत देण्यात आली. त्यामुळे हा प्रश्न काहीसा मागे पडल्याचे वाटत असतानाच 'अंजुमन इशात-ए-तालीम ट्रस्ट विरुद्ध महाराष्ट्र राज्य' या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला. या निर्णयात न्यायालयाने तीन महत्त्वाच्या बाबी स्पष्ट केल्या. पहिली बाब म्हणजे शिक्षक पात्रता परीक्षा ही सेवेत प्रवेशासाठी आवश्यक आहे.

दुसरी बाब म्हणजे सध्या सेवेत असलेल्या शिक्षकांनाही नोकरीत कायम राहायचे असल्यास ही परीक्षा उत्तीर्ण करावी लागेल. तिसरी आणि सर्वाधिक महत्त्वाची बाब म्हणजे पदोन्नतीसाठीदेखील पात्रता परीक्षा आवश्यक राहील. भविष्यात सेवेत येणारे सर्व शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असतील. त्यामुळे पुढील काळात ही अट स्वतंत्रपणे लागू करण्याची गरज भासणार नाही. मात्र सध्या सेवेत असलेल्या मोठ्या संख्येने शिक्षकांवर या निर्णयाचा परिणाम होणार आहे.

विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षकांसाठी या निर्णयाचे परिणाम अधिक व्यापक असतील. मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांसारख्या पदांवर पदोन्नती मिळविण्यासाठी पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे सेवाज्येष्ठ असूनही पात्रता परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या शिक्षकांच्या पदोन्नतीच्या संधी कमी होऊ शकतात. दुसरीकडे, सेवेने कनिष्ठ असलेले परंतु पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले शिक्षक पदोन्नतीच्या शर्यतीत पुढे जाऊ शकतात. शिक्षकांची संख्या मोठी आणि पदोन्नतीच्या संधी मर्यादित असलेल्या व्यवस्थेत या निर्णयाचे परिणाम अधिक तीव्रतेने जाणवू शकतात.

या प्रकरणात शिक्षक संघटनांनी मांडलेला मुद्दाही दुर्लक्षित करता येणार नाही. त्यांच्या मते, जे शिक्षक सेवेत आले त्या काळात अस्तित्वात असलेल्या नियमांनुसारच ते पात्र ठरले होते. त्यावेळी पात्रता परीक्षा देणे आवश्यक नव्हते. त्यामुळे अनेक वर्षांच्या सेवेनंतर अचानक अशी अट लागू करणे योग्य नाही, असा त्यांचा युक्तिवाद होता. कायदा पूर्वलक्षी प्रभावाने लागू करता येत नाही, असेही संघटनांचे म्हणणे होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने हा मुद्दा मान्य केलेला नाही. न्यायालयाने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमातील तरतुदी आणि भारतीय राज्यघटनेच्या कलम २१-अ मधील शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा आधार घेत विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

न्यायालयाच्या मते, शिक्षकांची नोकरी टिकविण्यापेक्षा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षणाच्या गुणवत्तेशी कोणत्याही प्रकारची तडजोड करता येणार नाही. त्यामुळे सेवेत असलेल्या शिक्षकांनाही पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना पूर्वीच्या निर्णयालाच दुजोरा दिला आहे. मात्र अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांवर या अटीची अंमलबजावणी कशी करावी, याबाबत भविष्यात मोठे घटनापीठ अंतिम भूमिका स्पष्ट करेल, असेही नमूद करण्यात आले आहे. या निर्णयामुळे देशभरातील सुमारे २५ लाख शिक्षकांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांहून अधिक कालावधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर राज्य सरकारांनी वर्षातून किमान दोन वेळा शिक्षक पात्रता परीक्षा घेण्याचे नियोजन करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे. न्यायालयाने ५३ वर्षे वय पूर्ण केलेल्या काही शिक्षकांना विशिष्ट परिस्थितीत सवलत दिली असली, तरी पदोन्नतीसाठी पात्रता परीक्षा आवश्यक राहणार आहे. त्यामुळे 'परीक्षा उत्तीर्ण नाही तर पदोन्नती नाही' हे तत्त्व आता जवळपास अंतिम स्वरूपात स्वीकारले गेले आहे. महाराष्ट्रातही या निर्णयाचे परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवतील. राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षेचा निकाल गेल्या काही वर्षांत फारसा समाधानकारक राहिलेला नाही. सुरुवातीच्या काळात केवळ १ ते २ टक्के उमेदवार उत्तीर्ण होत होते. नंतर हा आकडा ६ ते ७ टक्क्यांपर्यंत पोहोचला असला, तरी तो अद्यापही चिंताजनक मानावा लागेल. त्यामुळे सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी स्वतंत्र पद्धतीची पात्रता परीक्षा घेण्याचा विचार होणे आवश्यक आहे. वीस ते पंचवीस वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असलेल्या शिक्षकांचे मूल्यमापन आणि नुकतेच सेवेत येऊ पाहणाऱ्या

## >>> रविवार विशेष

तरुण उमेदवारांचे मूल्यमापन एकाच निकषांवर करणे कितपत न्याय्य ठरेल, हा प्रश्न उपस्थित होतो. सेवाज्येष्ठ शिक्षकांच्या अनुभवाचे स्वतंत्र मूल्य आहे. त्यांच्या अध्यापन कौशल्याचा, विद्यार्थ्यांशी असलेल्या संवादाचा आणि प्रत्यक्ष शैक्षणिक कार्यातील योगदानाचा विचार होणे आवश्यक आहे. तरुण उमेदवारांची स्मरणशक्ती, अभ्यासाची क्षमता आणि परीक्षेतील कामगिरी यांचे स्वरूप वेगळे असते. दुसरीकडे, पन्नाशीच्या आसपास असलेल्या शिक्षकांवर कौटुंबिक आणि सामाजिक जबाबदाऱ्यांचे ओझे अधिक असते. त्यामुळे सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी स्वतंत्र अभ्यासक्रम, स्वतंत्र मूल्यमापन पद्धती आणि स्वतंत्र उत्तीर्णतेचे निकष निश्चित करण्याचा पर्याय शासनाने गांभीर्याने विचारात घ्यायला हवा. अर्थात, शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत शासन आणि न्यायालय यांनी ठाम भूमिका घेण्यात काहीच गैर नाही. विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही कोणत्याही शिक्षण व्यवस्थेची मूलभूत अट आहे. मात्र या प्रक्रियेत लाखो शिक्षक आणि त्यांच्या कुटुंबांपुढे निर्माण होणाऱ्या अडचणींकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. शिक्षण क्षेत्राला शैक्षणिक पात्रतेइतकाच समृद्ध अनुभव असलेल्या शिक्षकांचाही आधार आवश्यक असतो. त्यामुळे शिक्षक पात्रता परीक्षेच्या सक्तीचा उद्देश कायम ठेवत, सेवेत असलेल्या शिक्षकांसाठी अधिक व्यवहार्य आणि मानवी दृष्टिकोन स्वीकारता येईल का, याचा गंभीर विचार करण्याची गरज आहे. शेवटी, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा आता वास्तव आहे. त्याचा अवमान करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मात्र शिक्षणाची गुणवत्ता आणि शिक्षकांचे हित या दोन्हींचा समतोल साधणारा मध्यममार्ग शोधणे ही शासन, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षक संघटना यांची सामूहिक जबाबदारी आहे. आगामी काळात हा समतोल कितपत साधला जातो, यावरच या निर्णयाचे अंतिम यश अवलंबून असेल.



**संदीप वाकचौरे**
ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

# 'एल निनो'चा भयकंप





> 'यंदाच्या वर्षी भारतीय उपखंडात पडणाऱ्या मान्सूनवर 'एल निनो'चे सावट असून, सरासरीच्या ९० टक्केच पाऊस पडेल, असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. औद्योगिक क्रांतीनंतर वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत एल निनोसारख्या नैसर्गिक घटनांचा परिणाम अधिक तीव्र स्वरूपात दिसून येऊ शकतो. समुद्राचे पाणी आधीच उष्ण असल्याने त्यात अतिरिक्त तापमानवाढ झाल्यास हवामानातील अस्थिरता वाढते. त्यामुळे 'सुपर अल निनो' स्थिती निर्माण होऊन दुष्काळ अधिक तीव्र होऊ शकतात, पूर अधिक विनाशकारी ठरू शकतात आणि उष्णतेच्या लाटा अधिक काळ टिकू शकतात.

भारतीय हवामान विभागाने यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी म्हणजेच दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. प्रशांत महासागराच्या पृष्ठभागाखाली असलेल्या उष्ण पाण्याचा प्रवाह वर येत असल्यामुळे तीव्र एल निनो निर्माण होण्यास अनुकूल परिस्थिती बनली आहे. एल निनो ही प्रशांत महासागरातील पाण्याच्या तापमानात होणाऱ्या वाढीशी संबंधित एक नैसर्गिक प्रक्रिया आहे जी दर २ ते ७ वर्षांनी उद्भवते. मात्र यावर्षी निर्माण होणारा 'एल निनो' हा नेहमीपेक्षा खूपच वेगळा आणि अत्यंत भयानक स्वरूपाचा असण्याची शक्यता शास्त्रज्ञांनी वर्तवली आहे. जेव्हा प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान सरासरीपेक्षा २ अंश सेल्सिअस किंवा त्याहून अधिक वाढते तेव्हा त्याला सुपर एल निनो म्हटले जाते. ही स्थिती जागतिक वातावरणात मोठे बदल घडवून आणते आणि त्यामुळे उद्भवणारे परिणाम नेहमीपेक्षा कितीतरी पटीने अधिक तीव्र आणि दीर्घकाळ टिकणारे असू शकतात. २०२३ मध्येही जेव्हा अल निनोचा प्रभाव वाढला होता, तेव्हा भारतातील अनेक शहरांमध्ये तापमान ४५ ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते आणि मान्सूनवर त्याचा मोठा फटका बसला होता.

सुपर एल निनोमुळे जागतिक जलसंपत्तीवर आणि पाणी पुरवठ्यावर अत्यंत गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. हवामानातील बदलांमुळे काही भागांत तीव्र दुष्काळ पडेल तर काही भागांत ढगफुटी आणि महापूर येईल, असा अंदाज व्यक्त होत आहे. युरोपियन हवामानतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, यावर्षी कॅरिबियन देश, मध्य अमेरिका, उत्तर ब्राझील, मध्य आणि उत्तर भारत, मध्य आणि दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, फिलिपिन्स आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये अत्यंत तीव्र दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते. या कोरड्या हवामानामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खालावेल आणि मोठमोठी धरणे तसेच पाण्याचे साठे कोरडे पडतील. यामुळे शेतीसाठी आणि पिण्यासाठी लागणाऱ्या पाण्याच्या उपलब्धतेवर मोठा ताण निर्माण होईल. याउलट जगातील इतर काही भागांमध्ये सरासरीपेक्षा खूप जास्त पाऊस आणि भयानक पूर येण्याचा इशारा युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्टने दिला आहे. अतिवृष्टीमुळे काही काळासाठी पाण्याचे साठे भरतील असे वाटत असले तरी प्रत्यक्षात हा पाऊस पूर परिस्थिती निर्माण करून पायाभूत सुविधांचे अतोनात नुकसान करेल आणि पाणी पुरवठ्याची संपूर्ण व्यवस्थाच उद्ध्वस्त करेल.

या वेळचा सुपर एल निनो आधीच्या वर्षांपेक्षा एका अत्यंत महत्त्वाच्या कारणाने वेगळा आणि घातक आहे. ते कारण म्हणजे हा एल निनो आधीच खूप तापलेल्या पृथ्वीवर येत आहे. गेल्या ११ वर्षांचा कालावधी हा जगाच्या इतिहासातील सर्वात उष्ण काळ म्हणून नोंदवला गेला आहे. जेव्हा आधीच तापमान वाढलेले असते तेव्हा एल निनोसारखा हवामानाचा धक्का अधिक विनाशकारी ठरतो. जास्त तापमानामुळे हवेतील आर्द्रता शोषून घेण्याची क्षमता वाढून जमीन आणि वनस्पतींमधील ओलावा वेगाने ओढला जातो. परिणामी पाऊस कमी झाला नाही तरीही जमीन लवकर सुकते, पिके जळून जातात आणि पाळीव जनावरांना छाती दडपून टाकणाऱ्या उष्णतेचा सामना करावा लागतो.

या हवामान संकटामुळे देशातील अन्नधान्योत्पादन बाधित होण्याची दाट शक्यता आहे. तसे झाल्यास आधीच महागाईने होरपळणाऱ्या जनतेला नव्या संकटांचा सामना करावा लागू शकतो. अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात इंधन आणि खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे. या तुटवड्यामुळे अन्नधान्य उत्पादनाची साखळी आधीच कमकुवत झाली आहे आणि त्यातच सुपर एल निनोची भर पडल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती आहे. प्रशांत महासागरातील पाण्याच्या अतिउष्णतेमुळे पाण्यात माशांचे प्रमाण घटते. यामुळे किनारपट्टीवरील देशांच्या अर्थव्यवस्थेला खीळ बसण्याची भीती व्यक्त होत आहे. एल निनोचा प्रभाव ओसरल्यानंतरही त्याचे दुष्परिणाम अन्न साखळीत अनेक वर्षे रेंगाळत राहतात. खतांचा कमी वापर, निकृष्ट दर्जाची कापणी, जनावरांचे मृत्यू आणि शेतकऱ्यांवर वाढणारे कर्ज यामुळे पुढील अनेक हंगामांमधील शेती उत्पादनावर याचा थेट वाईट परिणाम होत राहतो.

जगातील जंगले आणि पर्यावरण व्यवस्था यांवरही सुपर एल निनोचा अत्यंत घातक प्रभाव पडण्याची शक्यता आहे. विशेषतः या काळात जंगलांमध्ये वणवे लागण्याचा धोका अनेक पटीने वाढतो. ज्या भागांमध्ये हवामान कोरडे आणि उष्ण होते, तिथे पालापाचोळा सुकल्यामुळे अगदी किरकोळ कारणाने किंवा मानवी चुकीमुळे लागलेले वणवे वेगाने पसरतात. अमेझॉनच्या सदाहरित जंगलांना वणव्यांची सवय नसते, त्यामुळे तिथे लागणारे वणवे कार्बनचे प्रचंड मोठे साठे नष्ट करतात. जंगले जळाल्यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड वायू मोठ्या प्रमाणात मुक्त होऊन जागतिक तापमानवाढ आणखी वेगाने होते. हे दुष्टचक्र जंगलांना भविष्यातील आगीसाठी अधिक संवेदनशील बनवते. आग लागण्याव्यतिरिक्त उष्णता आणि दुष्काळामुळे झाडांची प्रतिकारशक्ती कमी होते. त्यांच्यावर कीटक आणि विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढून संपूर्ण जंगलांचे आरोग्य धोक्यात येते.




**रंगनाथ कोकणे**
पर्यावरण अभ्यासक

भारताचा विचार करता आपल्याकडील हवामानावर केवळ एल निनोचाच नाही तर इंडियन ओशन डायपोल म्हणजेच हिंद महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांचाही प्रभाव पडतो. यामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होते. यापूर्वी २०१५ आणि २०१६ मध्ये आलेल्या तीव्र एल निनोच्या काळात ऑस्ट्रेलियात भीषण दुष्काळ पडला होता आणि दक्षिण अमेरिकेत महापूर आला होता. तसेच २०२३ आणि २०२४ मधील एल निनोमुळे कॅनडामध्ये इतिहासातील सर्वात उष्ण हिवाळा नोंदवला गेला आणि तिथल्या बर्फाची चादर वितळल्यामुळे २०२३ मध्ये कॅनडाच्या जंगलांना भीषण वणव्यांचा सामना करावा लागला होता. भारताच्या बाबतीत सांगायचे तर १० पैकी ७ एल निनो वर्षांमध्ये देशात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला आहे. यामुळे भात, डाळी आणि तेलबियांच्या उत्पादनात ६ टक्क्यांपेक्षा जास्त घट होते आणि देशांतर्गत महागाई वाढते.

या संकटाचा सामना करण्यासाठी विविध देशांनी आपापसातील मतभेद विसरून हवामान बदलाच्या विरोधात एकत्र येणे गरजेचे आहे. अचूक हवामान अंदाजांचा वापर करून शेतकऱ्यांना पूर्वसूचना देणे, पाण्याचे काटेकोर नियोजन करणे, दुष्काळ सहन करू शकतील अशा पिकांची लागवड करणे आणि जंगलांमधील वणवे रोखण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उभारणे अत्यंत आवश्यक आहे. जर आताच ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यात अन्न आणि पाण्यासाठी मानवी स्थलांतराचे मोठे संकट जगासमोर उभे ठाकेल यात शंका नाही.

# नवाकाळ शब्दकोडे-१६२९



**आडवे शब्द –**

३. नाउमेद झालेला, आशा सोडलेला ६. रात्रीच्या वेळी गावाची राखण करणारा ९. कपडे शिवताना माप घेण्याचे साधन ११. आत्मविश्वासपूर्वक बोलणे १३. लुबाडणूक १४. लिंबू वर्गातले मोठे गोड फळ १५. थंडी, शैत्य १७. शान, वैभव १८. उष्णता १९. डंका २०. खतम २१. थर २३. आगाऊ घेतलेली रक्कम, उचल २५. अदमासे, अंदाजे २७. ज्योतिषातील सातवी रास २८. पोळपाटाचा जोडीदार २९. सरपणविक्रीचे दुकान ३१. त्वरित, लगेच ३४. कलंक, डाग ३५. अनुचित लाड ३६. कार्यालय, ऑफिस ३७. खोडसाळ, त्रासदायक ४०. मुकुट ४१. मोराचा देखणा अवयव ४४. दिमाख ४५. पोटातला लांबलचक अवयव, कोथळा ४७. मर्कट ४९. साखळी ५०. उतावीळ ५१. खिडकीची काच ५३. मोहरी, सरसू ५५. करवंटी, नरोटी ५६. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा ५७. कन्या, पुत्री ५९. सहावी तिथी ६०. जुन्या काळातील एक अभिनेत्री- XXXX माला ६२. वात्सल्य; मुलींचे एक नाव ६४. कठीण प्रसंग ६५. कमळाच्या बियांच्या लाह्या ६७. वजा करणे ६८. गद्दारी, शत्रूला जाऊन मिळणे ६९. अनावश्यक हस्तक्षेप ७०. देव्हाऱ्यासमोर आरती करताना वाजवण्याचे मंजुळ वाद्य ७१. निसर्गरम्य जागा ७२. मुस्लिम साधू ७४. घोडागाडी ७५. रुची, रस, गम्य ७८. चीर, भेग ८०. अजाण ८१. स्त्रियांचा एक कंठालंकार ८३. खिन्न, दुःखी ८५. चंद्राभोवती क्वचित दिसणारे वलय ८६. दुःशील, स्वेच्छाचारी स्त्री ८९. चार वेदांपैकी एक ९०. मद्यपी, तळीराम ९२. घट्ट विळखा ९४. कुडी; लसणाची पाकळी ९६. होम, यज्ञ ९८. खांद्याचा व हाताचा सांधा १००. वायू १०१. छत, चांदवा १०२. छोटे जहाज १०३. आस्था १०४. पोशाख, पेहराव १०५. चिखल १०६. चिडलेला

**उभे शब्द –**

१. एखाद्या ध्येयाने पूर्णपणे भारला गेलेला; भूतबाधा झालेला २. निर्दय ३. मालाला असलेला उठाव ४. फुटाणे ५. प्रलोभन ६. पूर्ण पोशाख ७. फळातील मगज ८. फुरसत, अवसर १०. प्रथम १२. तर्क, अंदाज १४. कामाचे पारिश्रमिक, मेहनताना १६. नवीन पालवी येण्याचा ऋतू १८. वृक्ष; बाग; अरण्य २०. आश्चर्याचा सामूहिक धक्का २२. तलाठी २४. तिखट व रुचकर २५. देव २६. वैपुल्य, चंगळ ३०. स्वयंपाकी, आचारी ३२. उपवासाचे हलके तृणधान्य ३३. मेंदी ३८. दृढ, पक्का ३९. अन्न आणून देणारा हॉटेलमधील सेवक ४०. ताडपत्री ४२. बळकट, कणखर ४३. मृदंग ४४. उडवाउडवीचे उत्तर, पोकळ खुलासा ४५. चेहरा ४६. रांजण ४८. बहरणे, फुलणे ५०. कणीक ५२. फिदीफिदी हसणे ५४. इच्छा ५६. वेग, झपाटा ५८. दिवसाचा एक भाग, प्रहर ६०. वैर, शत्रुत्व ६१. उपकरण ६३. दोस्ती, मैत्री ६४. विषय, मामला ६६. विशेष ६७. चंदनलेप ६८. पर्वा ६९. निरर्थक चर्चा, काथ्याकूट ७०. धातूचे स्नानपात्र ७१. नवरदेव ७३. शहाणा ७४. तंगडी ७५. आरूढ ७६. मारुतीचे शस्त्र ७७. मनाविरुद्ध ७९. खेळी; मोठी पळी ८०. वेगळे ८२. यश, साफल्य ८३. सूर्योदयाची जागा ८४. नेहमी ८५. संन्याशाच्या पादुका ८७. मस ८८. अमर्याद ८९. उपकृत ९१. लग्नाच्या मांडवात वधूपक्षाकडून आलेल्या भेटवस्तू ९३. दाणेदार ९५. पदवी ९७. जंगली रेडा ९९. तळपायाचा मांसल भाग १०१. जहर १०२. माज •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६२८ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. सालस ५. ताबेदारी ८. उदक ११. दावा १३. नृशंस १५. हावभाव १७. दमन १९. मवाली २०. पकड २१. नडगी २२. शर २३. जमदाड २४. जय २५. पारोसा २७. दानत २९. हर ३०. पावन ३१. क्षतज ३२. भरीत ३३. पायबंद ३५. गळ ३६. प्रेमळ ३७. मग्न ३८. द्रव ४०. दीडशहाणा ४२. पिस्ता ४३. शिष्टसंमत ४५. खोडी ४८. नीलम ५०. तग ५१. कपोत ५३. पाड ५४. लगबग ५७. लगाम ५९. रूप ६०. हेटाळणी ६२. कडू ६३. चालना ६५. गवार ६८. पागोटे ७०. कळक ७२. पामर ७३. मजल ७४. अर्ज ७५. डामडौल ७८. जावई ७९. फुटाणे ८१. रामबाण ८२. चालचलणूक ८४. माड ८५. गरजा ८६. प्राण ८७. बालक ८९. औकात ९०. नारी ९२. साबुदाणा ९४. डबर ९६. पंथ ९८. बरका ९९. जून १००. संकट १०२. मनमोहक १०३. मानवता १०५. नावाजलेला १०८. जनार्दन १०९. सैन्य ११०. रवंथ

**उभे शब्द :** १. साशंक ३. लहानसा ४. सवड ५. ताव ६. दादर ७. रीम ९. दमदाटी १०. कवाड १२. वातायन १३. नृपती १४. सडपातळ १६. भागीदारी १८. नजरबंदी २२. शत २४. जव २६. रोज २८. नतद्रष्ट २९. हय ३०. पाळणा ३१. क्षमता ३२. भग्न ३४. दडपे पोहे ३५. गहाळ ३७. मस्तानी ३९. वसंत ४१. गोडी ४३. शिमगा ४४. मगरूर ४५. खोड ४६. कलकत्ता ४७. थेंब ४९. ललना ५२. तटाक ५३. पाणी पाजणे ५५. गडू ५६. गचाळ ५८. मग ६१. खोटे ६४. लकडा ६६. वाचा ६७. समई ६९. गोल ७०. कर्जबाजारी ७१. सुडौल ७२. पावक ७३. मटार ७४. अमरनाथ ७६. मचाण ७७. लचक ७८. जाणूनबुजून ८०. खडतर ८१. राग ८३. पूल ८४. माका ८६. प्राची ८७. बाणा ८८. कडकनाथ ८९. और ९१. फरक ९३. दानत ९५. बटवा ९६. पंकज ९७. मनन ९८. बहर १०१. आले १०२. मर्द १०३. मान्य १०४. तार १०६. जथा १०७. लाठी




## मेष

**या आठवड्यात** संमिश्र ग्रहमान असणार आहे. सुरुवातीला अनपेक्षित, छोट्या प्रमाणावर लाभ होईल. घाईने निर्णय घेऊ नका. मनावर नियंत्रण ठेवून कामावर लक्ष केंद्रित केल्यास अनेक गोष्टी साध्य करता येतील. जास्त कष्टाची तयारी ठेवा. आठवड्याच्या अखेर मानसिक समाधान देईल. आर्थिक स्थिती सर्वसाधारण चांगली राहील. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे. आर्थिक गुंतवणूक करताना मोठ्या कालावधीसाठी व सावधगिरीने करावी. बोलताना मवाळ शब्दांचा वापर करा.

कौटुंबिक कारणांसाठी खर्चाची तयारी ठेवावी. विशेषतः मुलांचे हट्ट पुरवावे लागतील. घरातील वातावरण चांगले राहील. जोडीदाराचे सहकार्य मिळेल. आईशी, घरातील अन्य ज्येष्ठांशी मतभेद होऊ शकतात, काळजी घ्या.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधक सक्रिय होतील. परंतु नियोजनबद्ध कृतीने, निर्णयाने तुम्ही त्यावर मात करू शकाल. सहकारी वर्गावर विसंबून राहून चालणार नाही. स्वतःच्या क्षमतेप्रमाणे काम स्वीकारा. नोकरदारांनी वरिष्ठ दुखावणार नाहीत याची काळजी घ्यावी. प्रवासातून, नवीन व्यवहारातून फायदा होईल. कायदेशीर मार्गच योग्य ठरेल. तुमची ऊर्जा योग्य ठिकाणी, योग्य प्रकारे वापरा.

**शुभ दिनांक :** ७, ८, १२.

## वृषभ

**आठवड्याचा** पूर्वार्ध तुमच्यासाठी अतिशय चांगला राहील. उत्तरार्धात मनामध्ये दडपण जाणवेल. नियमांचे पालन करा. अति धाडसीपणा, घाई याला बंधन घालावे. कामाविषयी पूर्ण माहिती घेऊन नियोजनपूर्वक कृतीला सुरुवात करा. मुद्देसूद, स्पष्ट परंतु सौम्य बोलण्यामुळे तुम्हाला फायदा होईल. आर्थिक स्थितीही चांगली राहील. शेअर मार्केट किंवा इतर ठिकाणी गुंतवणूक करताना मोठ्या कालावधीसाठी करावी. मात्र कुठल्याही मोहाला बळी पडू नका.

घरामध्ये वातावरण योग्य राखणे तुमच्या हातात आहे. जबाबदारी घेऊन व इतरांना दिशा दाखवून पुढे जायचे आहे. वेळप्रसंगी अलिप्त राहून काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. चांगल्या प्रकारे तुम्ही ते इतरांना पटवून द्या. जोडीदाराचे वर्चस्व राहील. संततीबरोबर आनंदात वेळ घालवाल. घरातील ज्येष्ठांशी मतभेद टाळावेत.

कार्यक्षेत्रामध्ये आधी केलेल्या कामाचे चांगले परिणाम आता दिसून येतील. काही बदल, नवीन योजना प्रत्यक्षात आणू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांवर अवलंबून राहू नये. तुम्हाला स्वतःची क्षमता सिद्ध करता येईल.

वाहन चालवताना काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** ८, ९, ११.

## मिथुन

**आठवड्याची** सुरुवात मनामध्ये गोंधळ उडवणारी असेल. मन स्थिर ठेवून पुढील दिवसांचे योग्य नियोजन करा. आठवड्यानंतरचा कालावधी चांगला आहे. राशीस्वामी बुध तुमच्याच राशीत असल्यामुळे तुम्ही चांगल्या स्थितीमध्ये आहात. गुरुचे कर्क राशीतील उच्चीचे भ्रमण तुम्हाला आर्थिक दृष्टीने उत्तम ठरेल. मनाची चंचलता वाढेल. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. मौजमजेकडे कल राहील परंतु व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून प्रत्यक्ष कृतीला उशीर करू नका. लाभाचे प्रमाण चांगले राहणार आहे.

घरामधील वातावरण प्रयत्नपूर्वक चांगले, आनंदी ठेवावे लागेल. त्यात तुम्हाला यश मिळेल. जोडीदाराशी मात्र नमते घ्यावे लागेल. संततीचे हट्ट पुरवावे लागतील. मित्रपरिवार सहकार्य करेल.

वाढलेल्या जबाबदारीमुळे कामाचा ताण जाणवेल. संयम ठेवा. त्याचे सकारात्मक परिणामही लगेच दिसतील. आर्थिक फायदा होईल. नोकरदारांची कामे पूर्ण होतील. त्याचे चीजही होईल. गुंतवणूक मात्र काळजीपूर्वक करावी. भागीदाराचे वर्चस्व राहील. नवीन व्यवहार अत्यंत काळजीपूर्वक करावेत.

**शुभ दिनांक :** ९, ११, १२.

## कर्क

**या आठवड्यात** सुरुवातीला तुम्हाला कष्ट वाढवावे लागणार आहेत. सुनियोजित व स्थिर मनाने कृती करावी. आठवड्याच्या अखेरीला याचे फळ मिळेल. गुरू ग्रहाचे तुमच्या राशीतून होणारे भ्रमण पाठबळ देईल. तुमच्या कष्टाला भाग्याची साथ मिळेल. आर्थिक स्थितीचा विचार करता खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरणार आहे. आर्थिक धोरणाबाबत अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने पुनर्विचार करावा. प्रवासाचे योग आहेत. आळस सोडावा लागेल.

स्वभावामध्ये आक्रमकता वाढू शकते. मात्र कुटुंबाशी मतभेद टाळावेत. जोडीदार व संततीची प्रगती मनाला समाधान देईल. भावंडांशी जमवून घ्यावे लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये कामाची व्याप्ती वाढणार आहे. नवीन योजना प्रत्यक्षात आणताना व्यावहारिक बाजू विसरू नका. शत्रू, स्पर्धक तुल्यबळ ठरतील. त्यामुळे विचारपूर्वक पाऊल टाकावे लागेल. नोकरदारांना कार्यशैलीतील बदल उपयोगी ठरेल. व्यावसायिकांना नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाजू विसरून चालणार नाही. भांडवल उभे करताना धावपळ होईल.

**शुभ दिनांक :** ११, १२.

## सिंह

**आधी** केलेल्या कामाचे परिणाम आठवड्याच्या सुरुवातीला दिसून येतील. त्यामुळे उत्साह वाढेल. मनामधील अस्थिरता, गोंधळ यामुळे निर्णय घेण्यास उशीर होऊ शकतो. प्रयत्नांना भाग्याची साथ आहे हे विसरू नका. लाभाचे प्रमाण चांगले राहील. आर्थिक गुंतवणूक मात्र सावधगिरीने करावी. नियमांचे उल्लंघन करू नका, त्याचा फटका बसेल.

कौटुंबिक आघाडी चांगली राहील. वादविवाद टाळावे लागतील. आवश्यक तिथे कडक धोरण ठेवावे लागेल. घरातील ज्येष्ठांचे सहकार्य मिळेल. मुलांवर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करावा लागणार आहे. जोडीदाराची साथ राहील. मित्र व भावंडांबरोबर चांगला वेळ घालवाल.

कार्यक्षेत्रामध्ये अचानक जबाबदाऱ्या वाढणार आहते. त्या तुम्ही चांगल्या प्रकारे पूर्ण कराल. त्यातून तुम्हाला आर्थिक लाभही होतील.

इतरांना बरोबर घेऊन काम करायचे असल्यास तुमचे विचार त्यांना समजावून सांगावे लागतील. भागीदारीतील व्यवसायात फायदा होण्यासाठी पारदर्शक धोरण ठेवा. नवीन व्यवहार, संधी उपयुक्त ठरतील. नोकरदारांना वरिष्ठांचे धोरण मान्य करून काम केल्यास फायदा होईल.

आरोग्याच्या तक्रारी दुर्लक्षित करू नका.

**शुभ दिनांक :** ७, ८.

## कन्या

**विचारपूर्वक** व योग्य वेळी केलेली कृती यामुळे तुमचा हा आठवडा नियोजित कामे पूर्ण करणारा ठरेल. अडचणींवर मात करत पुढे जायचे आहे. द्विधा मनस्थिती राहील. आर्थिक लाभ होतील. आर्थिक गुंतवणूक दीर्घ मुदतीसाठी करावी. व्यावहारिक भूमिका व चातुर्य याचा समतोल राखा. चिकित्सक वृत्तीचा उपयोग करून घ्यावा. एकदा निर्णय घेतल्यानंतर त्यावर ठाम राहा.

जोडीदाराचा अनुभव व ज्ञान याचा तुम्हाला उपयोग होईल. जोडीदाराची प्रगती समाधानकारक राहील. मुलांच्या दृष्टीने चांगल्या घटना घडतील. प्रवासाचे योग असले तरीही आधी नियोजन आवश्यक राहील. कुटुंबाचे सहकार्य राहील. अविवाहितांचे, प्रेमीजनांचे विवाह ठरतील.

उद्योगव्यवसायात नवीन बदल घडवून आणला जाईल. फक्त स्वप्नरंजनात न रमता प्रत्यक्ष कृतीला महत्त्व द्यावे. भागीदारीतील व्यवसाय यश देतील. छुपे स्पर्धक, शत्रू ओळखून जशास तसे उत्तर द्यावे लागेल. नवीन संधीचा लाभ घेताना अडचणी आल्या तरी पुन्हा प्रयत्न करावा.

उष्णतेच्या विकारांकडे दुर्लक्ष करू नका. लागणे, जखमा इ. टाळण्यासाठी सावधगिरी बाळगावी.

**शुभ दिनांक :** ७, ८, ९.

## तूळ

**आठवड्याची** सुरुवात नियोजनासाठी वापरावी. पुढील दिवस त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करण्याचे आहेत. मनाची जिद्द कायम ठेवा. नैराश्य येऊ न देता उत्साह ठेवा. प्रयत्नांना, कष्टाला भाग्याची साथ आहे. आर्थिक उलाढाली होतील. परंतु प्रत्यक्ष, मनासारखा नफा सध्या कमी होईल. फलित नंतर मिळणार आहे. संचित धन सुरक्षित राहील. मौजमजेकडे कल असल्यामुळे खर्च विचारपूर्वक करा.

कौटुंबिक सदस्य,जोडीदार यांचे आग्रही मत तुम्हाला मान्य करावे लागेल. मुलांकडे विशेष लक्ष द्यावे. गैरसमज टाळण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. कुटुंबवृद्धीचे संकेत मिळत आहेत. व्यवसाय व कुटुंब यांच्यासाठी वेळेचा समन्वय साधावा लागेल. घरामध्ये धार्मिक कार्य होईल.

कार्यक्षेत्रामध्ये आदर मिळेल. प्रवास, नवीन व्यवहार यामुळे फायदा होईल. व्यवसायवृद्धीसाठी नवीन प्रशिक्षण जरूर घ्यावे. बदल करायचा असल्यास नोकरदारांनी प्रयत्न चालू करावे. आधीचे कामातील सातत्य, श्रम आता उपयोगी पडणार आहे. परदेशाशी संबंधित कार्यक्षेत्र असणाऱ्यांना यश मिळेल. मानसिक स्वास्थ्य सांभाळा.

**शुभ दिनांक :** ९, ११, १२.

## वृश्चिक

**भाग्यस्थानातून** होणारे गुरूभ्रमण तुम्हाला शुभ ठरणार आहे. आठवड्याची सुरुवात मनामध्ये संभ्रम निर्माण करणार आहे. अडथळ्यांवर मात करण्यासाठी तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींचा सल्ला घेऊन पुढे जा. तुमच्या क्षमतेचा पूर्ण वापर करून घ्यावा. स्पर्धक व हितशत्रू यांना जशास तसे उत्तर द्यावे लागेल. आर्थिक स्थिती सर्वसाधारणपणे चांगली राहील. सावधगिरीने केलेली आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरेल. आवश्यक तिथेच धाडस दाखवावे. प्रतिष्ठा सांभाळा. घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. ज्येष्ठ व्यक्तींचा सल्ला, सहकार्य अत्यंत उपयुक्त राहणार आहे. मुलांसाठी चांगल्या घटना घडतील. त्यांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. जोडीदार व तुमच्यामध्ये अहंकार येऊ देऊ नका. भावंडांशी चांगले नाते राहील. मित्रपरिवारापासून थोडे अंतर राहील.

व्यावसायिक क्षेत्रामध्ये नवीन योजना, प्रकल्प मार्गी लागतील. ठरलेले व्यवहार प्रत्यक्षात उतरतील. आर्थिक लाभ चांगले होतील. खर्चावर मात्र नियंत्रण ठेवा. घाईगडबडीत निर्णय न घेता सावधगिरी महत्त्वाची ठरेल. नोकरदारांची कोंडी होईल. संयम ठेवल्यास यातूनही चांगले परिणाम मिळतील. आरोग्याच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** ११, १२.

## धनु रास

**संयमाची** परीक्षा घेणारा हा आठवडा ठरेल. आठवड्याची सुरुवात धावपळीने होईल. मानसिक दबाव घेऊ नका. स्थिर बुद्धीने योग्य निर्णय घ्यावा. आर्थिक स्थिती चांगली राहील. इतर लाभाचे प्रमाणही चांगले राहील. अचानक प्रवासाचे योग येतील. नवीन व्यवहार करताना, सही करताना सावधगिरी बाळगा. कागदपत्रांची काळजी घ्यावी.

कौटुंबिक कर्तव्य व्यवस्थित पार पाडता येतील. वडिलोपार्जित संपत्तीसंबंधी प्रश्न मार्गी लावता येतील. सगळ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील. संततीच्या प्रगतीच्या दृष्टीने खर्चाची तरतूद करून ठेवावी. जोडीदाराचा व्यावहारिक सल्ला उपयोगी पडेल. घरातील ज्येष्ठांचे सहकार्य मिळेल. मित्रपरिवाराशी मतभेद टाळावेत.

कार्यक्षेत्रामध्ये नवीन ओळखींचा उपयोग होईल. कार्य पूर्ततेच्या दृष्टीने नियोजनपूर्वक श्रम वाढवावे लागतील. प्रतिष्ठा सांभाळा. झटपट लाभाचा मोह टाळावा. भागीदारीतील व्यवसायात सावधगिरी बाळगून पुढे जावे. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. मानसिक व शारीरिक आरोग्याकडे लक्ष द्या.

**शुभ दिनांक :** ७, ८.

## मकर

**या आठवड्यात** चढउतार जाणवत राहील. राशीस्वामी शनिवारी गुरूची कृपादृष्टी आहे. त्यामुळे तुमच्या प्रयत्नांना नक्की यश मिळेल. मानसिक दबाव न घेता निर्णय घ्यावेत. बोलताना योग्य शब्दांची निवड करावी. श्रमाबरोबरच लाभाचे प्रमाण वाढेल. निर्णय स्थिर मनाने घ्यावा. शंका-कुशंका असल्यास अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या. योग्य मार्गदर्शन आणि मदत मिळेल. आर्थिक गुंतवणूक करायची असल्यास दीर्घ मुदतीची करावी.

घरामधील वातावरण थोडे तप्त राहील. कौटुंबिक गैरसमज टाळावेत. जोडीदाराशी नाते चांगले होईल. मुलांकडे मात्र लक्ष द्यावे लागेल. त्यांचे हट्ट पुरवताना तारांबळ उडेल. भावंडांना मदत करावी. कुठलेही निर्णय घेताना भावना व व्यवहार याचा समन्वय साधा. घाईगडबडीत निर्णय त्रासदायक ठरतील. बाहेरील व्यक्तींमुळे घरामध्ये वाद निर्माण होऊ शकतात. सावधगिरी बाळगावी.

कार्यक्षेत्रामध्ये गुप्त शत्रूंपासून सावध राहा. वरिष्ठांशी मतभेद वाढू देऊ नका. कागदपत्रांची काळजी घ्यावी. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाबी पूर्ण तपासून घ्या.

**शुभ दिनांक :** ९, १०, ११.

## कुंभ रास

**एकंदरीत** हा आठवडा चांगला जाईल. साडेसातीचा प्रभाव असला तरीही राशीस्वामी शनीवर गुरूची कृपादृष्टी असल्यामुळे अडचणीतून सहज मार्ग निघेल. लाभ वाढणार आहेत. आठवड्याची सुरुवात आनंदात होईल. परंतु विनाकारण मानसिक अस्वस्थता राहील. आर्थिक अंदाज चुकू नये यासाठी पूर्ण माहिती व तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. खर्चावर नियंत्रण ठेवावे. बोलताना काळजी घ्या. स्वभाव धाडसी होईल. तुमच्या चिकित्सक वृत्तीचा फायदा करून घ्यावा.

घरातील वातावरण मात्र तप्त राहू शकते. अहंकार बाजूला ठेवून सर्वांना सांभाळून घ्यावे लागेल. कुटुंबाची जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडता येईल. जोडीदाराशी संघर्ष टाळा. मुलांच्या दृष्टीने समाधान व आनंद देणारी घटना घडेल. भावंडांचे सौख्य राहील.

कार्यक्षेत्रामध्ये चांगल्या वर्तणुकीने शत्रूवर मात कराल. पराक्रमाला वाव मिळणार आहे. धडाडी व योग्य नियोजनामुळे नव्या संकल्पना राबवता येतील. क्रियाशीलता वाढेल. नोकरदारांना आर्थिक लाभ होतील.

अनुवंशिक आजार व पोटाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करू नका.

**शुभ दिनांक :** ७, ८, १२.

## मीन

**साडेसातीचा** प्रभाव तुमच्यावर जास्त आहे. परंतु आता राशीस्वामी गुरू चांगल्या स्थानी व उच्च राशीत आलेले आहेत. त्यांची कृपादृष्टी तुमचा त्रास कमी करेल. या आठवड्यात तुमच्या कष्टाला यश येईल. नियमांचे मात्र पालन अवश्य करा. कुठलाही मोह टाळा. नैराश्य व मनाचा हळवेपणा नियंत्रणात ठेवावा. आर्थिक स्थिती चांगली राहील. संचित धन वाढेल. भाग्याची साथ राहणार आहे. अचानक धनलाभ होऊ शकतो. तरीही आर्थिक गुंतवणूक सावधगिरीने करा. बोलताना सौम्य शब्द वापरा.

घरामध्ये आनंदी वातावरण राहील. जोडीदार व मुलांबरोबर चांगला वेळ घालवाल. मात्र आक्रमक बोलण्याने, वागण्याने दुसऱ्यांची मने दुखावली जातील. काळजी घ्या.

व्यवसायात पुढाकार घेऊन व्यवहार पार पाडता येईल. नवीन, आधुनिक कार्यशैली उपयोगी पडेल. विरोधकांवर मात करता येईल. कार्यक्षेत्रामध्ये अलिप्त धोरण ठेवल्यास व्यावहारिक निर्णय घेता येतील. कार्यशैलीतील कल्पकता प्रत्यक्षात उतरवता येईल. वरिष्ठांशी वाद टाळावेत.

**शुभ दिनांक :** ९, १०, ११.

- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे

नवा काळ

• मुंबई । रविवार ७ जून, २०२६ • पान -८

# ऑस्ट्रेलियात १ लाखाहून अधिक जिवंत झुरळे जप्त

**कॅनबेरा** - भारतात 'कॉकरोच जनता पार्टी' ने सोशल मीडियात सर्वत्र जोरदार चर्चा सुरू असताना ऑस्ट्रेलियात आता खऱ्याखुऱ्या कॉकरोचचा मुद्दा पेटला आहे. ऑस्ट्रेलियाच्या न्यू साऊथ वेल्समध्ये एका व्यक्तीकडून १ लाखाहून अधिक जिवंत झुरळे जप्त केली आहेत. आतापर्यंत झालेली ही देशातील सर्वात मोठी कारवाई आहे. जप्त करण्यात आलेल्या या झुरळांमध्ये मादागास्कर हिसिंग आणि डुबिया प्रजातींचा समावेश आहे. त्याची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात अंदाजे २ लाख ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतकी आहे. ऑस्ट्रेलियात



झुरळ पाळणे आणि विकणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. त्यामुळे हवामान बदल आणि पर्यावरण विभागाने मे महिन्यात न्यू साऊथ वेल्समधील बाथर्स्ट येथे ही धाड टाकली. मादागास्कर हिसिंग कॉकरोच हे जगातील सर्वात मोठे झुरळ मानले जातात.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# शिवराज्याभिषेक दिन संपूर्ण भारतात साजरा केला जावा

**राज ठाकरेंची पोस्ट**

■ मुंबई

**शिवराज्याभिषेक** दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांबाबतच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. समस्त हिंद प्रांताला स्वराज्याचा विचार देणाऱ्या शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात राष्ट्रीय सण म्हणून साजरा व्हायला हवा, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

राज ठाकरे यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, ६ जून १६७४ रोजी जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला त्यावेळचे वातावरण किती आनंदी, उत्साही असेल. छत्रपती



शिवाजी महाराजांच्या आधी काही शतके फक्त महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण हिंद प्रांत परकियांच्या आक्रमणाने पूर्ण खचला होता. आक्रमकांच्या फौजांपुढे आपला टिकाव लागणारच नाही हे गृहीत धरून जवळपास प्रत्येक जण आक्रमकांना शरण गेला होता. अशावेळी स्वराज्य असावे असे स्वप्न बघायचे, वयाच्या १५ व्या वर्षी स्वराज्याची शपथ घ्यायची आणि पुढे एका वर्षात तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवायची. पुढे जवळपास २९ वर्षे झुंज देऊन एक असे राज्य जिथे आपली संस्कृती, आपली भाषा याला कुठलाही अटकाव नाही. आपली करपध्दती, आपली राज्यशासन पध्दती असलेले एक राज्य उभे करायचे आणि त्याची घोषणा राज्याभिषेकाच्या निमित्ताने जगासमोर करायची.

# केशकर्तन-दाढीही महागली २० टक्क्यांची दरवाढ लागू

■ मुंबई

**देशभरात** वाढत्या महागाईचा परिणाम आता सलून व्यवसायावरही झाला आहे. इंधन, वीज, भाडे, सौंदर्यप्रसाधने आणि अन्य साहित्याच्या वाढत्या किमतींमुळे महाराष्ट्र नाभिक महामंडळाने सलून सेवांच्या दरांमध्ये २० टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी केस कापणे, दाढी करणे आणि इतर सलून सेवांसाठी ग्राहकांना आता अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

सलून व्यावसायिकांच्या माहितीनुसार, वाढीव दर आजपासून लागू करण्यात आले असून, ग्राहकांना नव्या दरानुसार शुल्क भरावे लागणार आहे. दरवाढीनंतर विविध सेवांच्या शुल्कात लक्षणीय वाढ होणार आहे. उदाहरणार्थ, सध्या केस कापण्यासाठी १०० रुपये आकारले जात असतील तर त्यासाठी आता सुमारे १२० रुपये मोजावे लागतील. त्याचप्रमाणे दाढीसाठी ८० रुपये शुल्क असल्यास ते वाढून १०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

# तिसऱ्या मुंबईचा मास्टर प्लान सिंगापूरची कंपनी तयार करणार

■ मुंबई

**कर्नाळा** -साई-चिरनेर (केएसआर) मुंबई ३.० अर्थात तिसरी मुंबई म्हणून विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सर्व अद्ययावत सोयी-सुविधांनी युक्त असे हे नवे शहर उभारण्यासाठी मास्टर प्लान तयार करण्याचे काम सिंगापूरच्या सुरबाना जुरोंग इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला देण्यात आले आहे.

या संबंधीचा कार्यादेश नगर विकास खात्याने निर्गमित केला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) या कामासाठी सुरबाना समूहाची नेमणूक करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. २० जानेवारी रोजी दावोसमध्ये एमएमआरडीए आणि सुरबाना जुरोंग यांच्यात यासंबंधीचा सामंजस्य करार झाला होता. एमएमआर ग्रोथ हब इनिशिएटिव्ह या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून ही तिसरी मुंबई वसवण्यात येणार आहे. राज्य शासनाने मास्टर प्लानसाठी परवानगी देताना प्राथमिक टप्प्यावर तयारीसाठी ११.८९ कोटींचा निधी मंजूर केला आहे. तसेच प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला तत्वतः मान्यता दिली आहे. या दुसऱ्या टप्प्यात सरकार २३.१२ कोटी रुपयांचा निधी देणार आहे. मात्र त्यासाठी पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण करण्याची अट सरकारने ठेवली आहे. या दोन्ही टप्प्यांसाठी सुरबाना जुरोंगशी स्वतंत्र करार करण्याचे आदेश सरकारने एमएमआरडीएला दिले आहेत.

# 'उबाठा'च्या वैभव नाईकांमागे पुन्हा एसीबी चौकशीचा ससेमिरा

■ सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील उबाठा गटाचे माजी आमदार वैभव नाईक यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रत्नागिरी येथील भ्रष्टाचार विरोधी पथकाने (एसीबी) कणकवली नगरपंचायतीला पत्र पाठवून नाईक यांनी २००२ आणि २००६ साली खरेदी केलेल्या दुकान गाळ्यांबाबत सविस्तर माहिती मागवली आहे.

वैभव नाईक यांच्या विरोधातील ही चौकशी २०२२ सालापासून सुरू असून, अपसंपदा प्रकरणी त्यांच्या आर्थिक व्यवहारांची सखोल तपासणी केली जात आहे. याआधी एसीबीने त्यांच्या तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या बँक खात्यांची आणि इतर मालमत्तांचीही चौकशी केली होती. आता नगरपंचायतीकडून जुने खरेदी दस्तऐवज आणि बांधकामाची माहिती मागवण्यात आली आहे.

यावर प्रतिक्रिया देताना वैभव नाईक म्हणाले की, २०२२ पासून एसीबीकडून माझी चौकशी सुरू आहे. या चौकशीला माझा कोणताही विरोध नव्हता आणि आजही नाही. मात्र गेल्या काही वर्षांत वारंवार चौकशी होत असल्याने हा प्रकार अन्यायकारक वाटतो. अनेक वेळा माझ्याशी संबंधित लोकांचे जबाब घेतले गेले आहेत. अधिकारी बदलले किंवा राजकीय वातावरण बदलले की पुन्हा चौकशी सुरू होते.



जे जे च्या विद्यार्थ्यांचे मुंबईत जहांगीर दालनात प्रदर्शन. (छाया - दीपक साळवी)

# स्पेसएक्स-गुगलमध्ये तब्बल ३० अब्ज डॉलरचा क्लाऊड करार




■ न्यूयॉर्क

**इलॉन** मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने अल्फाबेट समूहातील गुगलसोबत तब्बल ३० अब्ज डॉलरचा क्लाऊड कॉम्प्युटिंग करार केला आहे. ऑक्टोबर २०२६ ते जून २०२९ या सुमारे ३३ महिन्यांच्या कालावधीसाठी हा करार लागू राहणार आहे.

या करारानुसार गुगल दरमहा सुमारे ९२० दशलक्ष डॉलर स्पेसएक्सला देणार असून, त्या बदल्यात स्पेसएक्सकडून अत्याधुनिक कॉम्प्युटिंग इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये सुमारे १,१०,००० एनव्हिडिया जीपीयू, सीपीयू, मेमरी आणि इतर आवश्यक हार्डवेअरचा समावेश आहे. ही यंत्रणा एनव्हिडिया एच-२०० चिप्सवर आधारित असून १०० मेगावॅटपेक्षा अधिक कॉम्प्युटिंग क्षमता निर्माण करू शकते. ही क्षमता साधारणतः ७५,००० घरांच्या वीज वापराइतकी असल्याचे मानले जाते. गुगलकडून सांगण्यात आले की, 'जेमिनी एंटरप्राईज' या एआय प्लॅटफॉर्मसाठी अपेक्षेपेक्षा जास्त मागणी वाढल्यामुळे अतिरिक्त ब्रिज कॅपेसिटीची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे हा करार अल्पकालीन असला तरी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या करारात एक महत्त्वाची अट ठेवण्यात आली आहे. जर ३० सप्टेंबरपर्यंत स्पेसएक्सने आवश्यक एनव्हिडिया चिप्स उपलब्ध करून दिल्या नाहीत, तर गुगलला करार रद्द करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. सुरुवातीच्या टप्प्यात कमी दरात अतिरिक्त क्षमता दिली जाणार असून, ती हळूहळू वाढवली जाणार आहे.

# कुंभमेळ्यासाठी साधुग्राम २२६७ कोटींचा निधी मंजूर

■ नाशिक

**नाशिक-त्र्यंबकेश्वर** येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर साधुग्राम उभारणीसाठी लागणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनासाठी राज्य सरकारने तब्बल २,२६७ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या प्रकल्पासाठी एकूण १९१.२१ एकर जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. नगरविकास विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, या निधीत जमिनीच्या मोबदल्यासह भूसंपादन प्रक्रियेसाठी लागणाऱ्या सुमारे ३ कोटी रुपयांच्या प्रशासकीय खर्चाचा समावेश आहे. साधू-संत आणि विविध धार्मिक आखाड्यांच्या तात्पुरत्या निवासासाठी साधुग्राम उभारण्यात येणार आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, कुंभमेळा प्रकल्पासाठी मंजूर केलेला निधी इतर कोणत्याही कारणासाठी वळविल्यास ती गंभीर आर्थिक अनियमितता मानली जाईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. नाशिक विकास आराखडा २०१७ नुसार साधुग्राम आणि संबंधित सुविधांसाठी एकूण ३७७ एकर जमीन राखीव ठेवण्यात आली होती.

# नसरापूर प्रकरणी पीडितेच्या वडिलांचे माध्यमांवरील ट्रोलिंगमुळे खच्चीकरण

■ पुणे

**नसरापूर** येथे चार वर्षांच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. या धक्क्यातून पीडित कुटुंब अद्याप सावरलेले नसतानाच, समाज माध्यमांवरील काही असंवेदनशील प्रतिक्रिया आणि टोमण्यांमुळे मुलीच्या वडिलांचे मानसिक खच्चीकरण होत असल्याचे समोर आले आहे. याबाबत त्यांनी एक भावनिक व्हिडिओ प्रसिद्ध करत कठीण प्रसंगातून जाणाऱ्या कुटुंबांबाबत संवेदनशीलता दाखवण्याची विनंती केली.

पीडितेचे वडील व्हिडिओमध्ये म्हणाले की, एखादा संदेश लिहिण्यासाठी काही सेकंद लागतात, पण तो वाचणाऱ्याच्या मनावर किती खोल परिणाम करू शकतो, याचा विचार केला पाहिजे. मी परिपूर्ण बाप नसेन, पण माझ्या मुलीवर प्रेम केले नाही किंवा तिच्यासाठी लढलो नाही, असे कोणीही म्हणू शकणार नाही. आज आमचे बाळ आमच्यात नाही. मात्र तिचे फोटो, तिच्या वस्तू, तिच्या बाहुल्या आणि तिच्या आठवणी घरात सर्वत्र आहेत. लोक आम्हाला विचारतात, पुढे काय करणार? न्याय कसा मिळवणार? पण हेच प्रश्न आम्ही स्वतःला रोज विचारत असतो. कधी न्यायाची चिंता असते, तर कधी भविष्याची. मुलीची आठवण आली की दिवस काढणेही कठीण होते. समाजातील वाढत्या असंवेदनशीलतेवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, अशा घटना केवळ एका दिवसाची बातमी नसतात. त्या संबंधित कुटुंबासाठी आयुष्यभराची जखम ठरतात. मी हे सहानुभूती मिळवण्यासाठी सांगत नाही.

# नाबार्डच्या अहवालानंतर नाशिक जिल्हा बँकेवर आरबीआयचे निर्बंध

■ नाशिक

**राष्ट्रीय** कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या (नाबार्ड) तपासणीत बँकेच्या कारभारातील गंभीर त्रुटी उघडकीस आल्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर विविध निर्बंध लादले आहेत. या कारवाईमुळे बँकेच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण येणार असून, लाभांश वाटप, देणग्या देणे तसेच मोठ्या आर्थिक खर्चांवर बंधने लागू करण्यात आली आहेत. याशिवाय १५ लाख रुपयांपेक्षा अधिक ठेवींशी संबंधित काही व्यवहारांवरही निर्बंध घालण्यात आले आहेत.

नाबार्डने केलेल्या तपासणीत बँकेच्या आर्थिक व प्रशासकीय कारभारातील अनेक त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. त्यानंतर आरबीआयने हस्तक्षेप करत बँकेला सहा महिन्यांच्या आत सविस्तर पुनरुज्जीवन आराखडा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या कालावधीत आर्थिक शिस्त प्रस्थापित करणे, व्यवस्थापनातील सुधारणा करणे व नियामक अटींची पूर्तता करणे बँकेसाठी आवश्यक ठरणार आहे. राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीच्या अनुषंगाने जिल्हा बँकेला सुमारे ५०० कोटी रुपयांचा निधी मिळण्याची अपेक्षा आहे.

# युक्रेनचा रशियावर ड्रोन हल्ला तेल रिफाईनरी-लष्करी तळ लक्ष्य

■ मॉस्को

**रशिया-युक्रेन** युद्धात आज युक्रेनने रशियातील महत्त्वाच्या ठिकाणांवर ड्रोन हल्ले केल्याचा दावा केला आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदोर झेलेन्स्की यांनी रशियाच्या दक्षिणेकडील क्रास्नोदार प्रदेशातील एका तेल रिफाईनरीवर तसेच सेंट पीटर्सबर्गजवळील एका लष्करी तळावर रात्री ड्रोन हल्ले करण्यात आल्याची पुष्टी केली.

झेलेन्स्की यांनी सांगितले की, युक्रेनच्या लांब पल्ल्याच्या ड्रोनच्या क्षमतेमुळे रशियाच्या हद्दीत सुमारे ५०० किलोमीटरपर्यंत कारवाई करणे शक्य झाले आहे. रशियाने युद्ध थांबवून जीवितहानी करणारे हल्ले बंद करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच रशियाकडून होणाऱ्या कोणत्याही पुढील कारवाईला ठोस प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

क्रास्नोदार प्रदेशातील तेल रिफाईनरीवर झालेल्या हल्ल्यानंतर मोठी आग



लागल्याचे स्थानिक प्रशासनाने सांगितले. क्रास्नोदार ऑपरेशनल सुरक्षेच्या कारणास्तव परिसरातील इमारतींमधून सुमारे ६० नागरिकांना बाहेर काढण्यात आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले असून आग विझवण्यासाठी १६७ कर्मचारी आणि ५४ यंत्रसामग्री तैनात करण्यात आली आहे.

# नितीश कुमारांच्या मुलाला विधान परिषदेची उमेदवारी

■ पाटणा

**बिहार** विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी जनता दल युनायटेडने (जदयू) आपल्या चार उमेदवारांची नावे जाहीर केली असून, त्यात माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांचा समावेश आहे.

बिहारमध्ये विधान परिषदेच्या ९ जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. तर एका जागी पोटनिवडणूक होणार आहे. निशांत कुमार यांना पटणा जिल्ह्यातून उमेदवारी देण्यात आली आहे. नितीश कुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर बिहारमध्ये सम्राट चौधरी मुख्यमंत्री बनले आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात निशांत कुमार यांना आरोग्य मंत्रिपद देण्यात आले आहे. भारती मेहता आणि शिवरानी देवी प्रजापती या अन्य दोन विधान परिषदेच्या उमेदवार आहेत. नितीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. या ठिकाणी लल्लन प्रसाद यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# राज्यसभेसाठी राष्ट्रवादीत खलबते नवनीत राणांना पक्षप्रवेशाची अट

■ मुंबई

**उपमुख्यमंत्री** सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यानंतर रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी राजकीय हालचालींना वेग आला असून, ज्येष्ठ नेते तथा मंत्री छगन भुजबळ यांच्या नावाची चर्चा सुरू असताना भाजपा नेत्या नवनीत राणा यांचे नावही चर्चेत आले आहे. मात्र त्यांना उमेदवारीसाठी राष्ट्रवादीत प्रवेश करावा लागेल अशी अट टाकण्यात आली आहे, अशी माहिती सुत्रांनी दिली. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी



अवघे दोन दिवस शिल्लक असताना पक्षातील बैठका आणि चर्चांमुळे राजकीय वर्तुळाचे लक्ष या निवडीकडे लागले आहे.

आज दुपारी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार पार्थ पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल आणि मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनी छगन भुजबळ यांच्या निवासस्थानी जाऊन आणखी एक बैठक घेतली. या घडामोडींमुळे राज्यसभेसाठी भुजबळ यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून राज्यसभा उमेदवारीसाठी काही अन्य नावांचीही चर्चा सुरू आहे.

# नालेसफाईवरून मनसेचे नाल्यात उतरून आंदोलन

■ मुंबई

**मुंबईत** नालेसफाईच्या मुद्यावरून मनसे आक्रमक झाली आहे. प्रशासनाकडून



८० टक्के नालेसफाई पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात काम अपूर्ण असल्याचा आरोप करत मनसे पदाधिकाऱ्यांनी थेट नाल्यात उतरून आंदोलन केले. तर माहीम कॉजवे येथे मनसैनिकांनी बोटीतून नालेसफाईची पाहणी केली.

साकीनाका येथील खैराणी रोड परिसरात मनसे पदाधिकाऱ्यांनी नाल्यात बसून जोरदार घोषणाबाजी केली. पालिका ८० टक्के नालेसफाई झाल्याचा दावा करत असली, तरी प्रत्यक्षात २० टक्के कामही पूर्ण झालेले नाही, असा आरोप मनसेने केला. नालेसफाई योग्य पद्धतीने न झाल्यास पावसाळ्यात मुंबईकरांना फटका बसू शकतो, असा इशाराही यावेळी देण्यात आला. स्थानिकांनीही नालेसफाईचे काम अपेक्षेप्रमाणे झाले नसल्याची नाराजी व्यक्त केली. त्याचप्रमाणे माहीम परिसरातील माहीम कॉजवे येथे मुंबई महानगरपालिकेच्या दाव्याची पडताळणी करण्यासाठी मनसेचे नगरसेवक यशवंत किल्लेदार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी बोटीतून नाल्याची पाहणी केली.

# मणिपूर हिंसाचारात तीन कुकींची हत्या

■ इंफाळ

**मणिपूरच्या** कांगपोकपी जिल्ह्यात संशयित बंडखोरांनी केलेल्या भीषण हल्ल्यात कुकी जमातीतील तीन लोकांचा बळी गेला.तर अनेक घरांची नासधूस करण्यात आली. मरण पावलेले तीन कुकी लोईबोल खेड्यातील रहिवासी होते. कुकी संघटनांनी या हल्ल्याला नागा जमातीतील बंडखोर गट जबाबदार असल्याचा आरोप केला असून, या हल्ल्याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी केली आहे. या घटनेनंतर सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली असून, संशयित हल्लेखारांचा शोध घेण्यासाठी परिसरात शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे.

# प्रतीक्षानगर-सायनमध्ये वीजपुरवठा खंडित! नागरिक संतप्त

■ मुंबई

**दक्षिण** मुंबईतील विविध भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वीज खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. उकाड्याच्या दिवसांमध्ये नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. आज सकाळी प्रतीक्षानगर-सायन परिसरात तब्बल दोन तास वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे रहिवाशांना प्रचंड उकाडा सहन करावा लागला. भर उन्हाळ्यात अचानक वीज गायब झाल्याने नागरिकांचे हाल होत असून, 'अशा परिस्थितीत लोकांची काय अवस्था होते, याचा बेस्ट प्रशासनाने विचार करावा,' अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त होत आहे.

यापूर्वीही वडाळा, दादर आणि गिरगाव भागात संध्याकाळच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाला होता. अनेक तास उलटूनही वीज पूर्ववत झाली नव्हती. आता पुन्हा प्रतीक्षानगर-सायन परिसरात वीज गेल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, २ जून रोजी बेस्ट समितीची बैठक पार पडली होती. या बैठकीत सदस्यांनी वारंवार होणाऱ्या वीज खंडितवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी २० कोटी रुपयांचा कृती आराखडा तयार करण्यात आल्याची माहिती बेस्ट उपक्रमाकडून देण्यात आली होती.

**२५ वा स्मृतिदिन**



कालकथित

**भिवा काळू लोखंडे**

जन्मः१५.१२.१९४९ मृत्यूः०७.०६.२००१

*आज २५ वर्षे झाली तरी सुद्धा तुमच्या आठवणी आमच्या हृदयात सदैव जिवंत आहेत. तुमचे प्रेम, मार्गदर्शन आणि आशीर्वाद आम्हाला नेहमीच प्रेरणा देत राहतील.*

तुमच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन

-: आपले :-

सुदा, भाई, ताई आणि बाळू तसेच समस्त लोखंडे परिवार